
ISSN-0971-8397

विकास समर्पित मासिक

# योजना

वर्ष ४१ अंक ९ पाने ७६ एप्रिल २०१४ मूल्य २० रु.



विशेषांक

## भारतीय अर्थव्यवस्था


जागतिक अर्थव्यवस्था आणि भारत
अलोक शील

उत्पादक रोजगार आणि शिक्षणाचे सक्षमीकरण: भारतीय युवकांसाठी विशेष कार्यक्रम
राघवेंद्र झा

भारतीय अर्थव्यवस्था: काल आज आणि उद्या
हेमंत देसाई

रोजगारनिर्मितीविना विकास
आर्तिका वत्स

भारताचे हरवलेले आर्थिक परिवर्तन: भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास अणि संरचनात्मक बदल
कुणाल सेन

विशेष लेख

इंटरनेटवरील मालकी अधिकार: स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय सुरक्षेवर परिणाम
सुनील अब्राहम

मराठी मासिक

# योजना

## योजना घरी आणा.
## आजच वर्गणी भरा.




विकासाचे सर्व पैलू, सर्व सामाजिक प्रश्न आणि चालू घडामोडी प्रसिध्द करणारे योजना हे एकमेव मासिक आहे. या मासिकात सर्व क्षेत्रातील तज्ज्ञांनी लिहिलेले अभ्यासपूर्ण व अचूक माहिती देणारे लेख असतात. त्यामुळे आपल्याला प्रत्येक क्षेत्रातील बिनचुक माहिती मिळते.

हे मासिक विद्यार्थीवर्ग व विद्वत्जनांचे आवडते आहे .स्पर्धात्मक परीक्षांना बसणाऱ्यांनी योजना वाचणे आवश्यक आहे. यातील माहिती साधारणत: इतरत्र प्रकाशित होण्याआधीच आपल्यापर्यंत येते.

### वर्गणीचे दर

| | |
|---|---|
| नियमित अंक मूल्य | १०.०० रुपये |
| विशेषांक | २०.०० रुपये |
| वार्षिक वर्गणी | १००.०० रुपये |
| द्विवार्षिक वर्गणी | १८०.०० रुपये |
| त्रिवार्षिक वर्गणी | २५०.०० रुपये |

वर्गणी, मनीऑर्डर, इंडियन पोस्टल ऑर्डर
किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे संपादक,योजना (मराठी)यांचे नावाने
७०१, ''बी'' विंग (७ वा मजला) केन्द्रीय सदन,
बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४
या पत्त्यावर पाठवावी.

**वर्गणी मनीऑर्डरने पाठविताना आपले नाव व पत्ता कूपनमध्ये सुवाच्य अक्षरात लिहा.**

विक्रीचे ठिकाण : ७०१ सी, ७०१बी, केंद्रीय सदन, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

योजना मासिक भारत सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे प्रसिध्द केले जाते.

# योजना

## विकास समर्पित मासिक

❖ वर्ष ४१ ❖ ❖ अंक ९ ❖ ❖ एप्रिल २०१४ ❖ ❖ मूल्य २० रु. ❖

मुख्य संपादक
**राजेशकुमार झा**

उपसंपादक
**अभिषेक कुमार**

मुखपृष्ठ
**जी.पी. धोपे**

**'योजना' हे नियोजन आयोगाच्या वतीने, केंद्र सरकारच्या माहिती व प्रसारण मंत्रालयाच्या प्रकाशन विभागातर्फे हिंदी, इंग्रजी, मराठी, गुजराती, कन्नड, तेलुगू, पंजाबी, उर्दू, बंगाली, तमिळ, मल्याळम, उडिया व आसामी भाषांतून प्रकाशित होते. देशाच्या सर्वांगीण विकासाची खुली चर्चा करणारे ते व्यासपीठ आहे. 'योजना'त प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मते त्या त्या लेखकांची असतात.**

**योजना वर्गणीचे नवे दर**

| | |
|---|---|
| **वार्षिक** | : रू. १०० |
| **किरकोळ किंमत** | : रू. १० |
| **शेजारी राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : रू. ५३० |
| **युरोप व अन्य राष्ट्रे (एअरमेल) वार्षिक** | : रू. ७३० |

## अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| **जागतिक अर्थव्यवस्था आणि भारत** | – अलोक शील | ५ |
| **भारतातील आर्थिक वाढ : कामगिरी आणि भविष्य** | – रविंद्र ढोलाकिया | ८ |
| **भारताची वाटचाल हिंदू आर्थिक वाढ दराकडे चालू आहे का?** | – कुमार गौरव, नलिन भारती व प्रियांका सिन्हा | १२ |
| **उत्पादक रोजगार आणि शिक्षणाचे सक्षमीकरण: भारतीय युवकांसाठी विशेष कार्यक्रम** | – राघवेंद्र झा | २० |
| **सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने आगामी वर्षाच्या आर्थिक नियोजनाचे निर्देशांक** | – चंद्रकांत पाटील | २८ |
| **करविषयक सुधारणा आणि जीएसटी भविष्यातील सुधारणांसाठी आव्हाने** | – महेश पुरोहित | ३८ |
| **इंटरनेटवरील मालकी अधिकार: स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय सुरक्षेवर परिणाम (विशेष लेख)** | – सुनील अब्राहम | ४४ |
| **शेतीतील पारंपरिक प्रथांचे जतन** | – बाबा मायाराम | ४९ |
| **भारतीय अर्थव्यवस्था: काल आज आणि उद्या** | – हेमंत देसाई | ५१ |
| **रोजगारनिर्मितीविना विकास** | – आर्तिका वत्स | ५८ |
| **भारताचे हरवलेले आर्थिक परिवर्तन: भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास अणि संरचनात्मक बदल** | – कुणाल सेन | |
| **भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचे योगदान** | – नितीन चौधरी | ६६ |
| **उच्च कार्यक्षमतेचा सुटसुटीत स्टोव्ह** | – व्ही. जयप्रकाश | ७१ |


योजनेसाठी लेख, वर्गणी, जाहिरात इ. सर्व पत्रव्यवहारासाठी पत्ता :
**योजना मासिक कार्यालय**
७०१, बी विंग (७वा मजला), केंद्रीय सदन, सेक्टर १०, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.
email - yngovt.patrika242@gmail.com

# संपादकीय

ब्रिटीश सत्तेच्या अंमलाखाली येण्यापासून ते आधुनिक काळातल्या आर्थिक सुधारणा स्वीकारेपर्यंत भारताच्या आर्थिक इतिहासातील विविध टप्पे ठळकपणे दिसून येतात. १७५७ साली झालेल्या प्लासीच्या लढाईनंतर भारतात औपचारिकपणे ब्रिटीशांची वसाहतवादी सत्ता अस्तित्वात येण्यापूर्वी भारत हा जगातील सर्वात श्रीमंत देशांपैकी एक होता. मोगलांच्या कालखंडातील काही अंदाजांनुसार, भारत ही जगातील दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होती आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील भारताचा वाटा जवळपास २५ टक्के इतका होता. ब्रिटीश वसाहतवादी सत्तेने दोन शतकांमध्ये केलेल्या शोषणामुळे भारतातील संपत्तीची लूट झाली आणि येथील उद्योग नष्ट करण्यात आल्याने देशातील जनतेवर फार मोठी संकटे कोसळली. या वसाहतवादी शोषणाकडे सातत्याने लक्ष वेधणारी पहिली व्यक्ती होती, महान राष्ट्रवादी नेते दादाभाई नौरोजी. त्यांनी केलेल्या विश्लेषणातूनच १९४७ साली देशाला सार्वभौमत्व मिळवून देणाऱ्या स्वातंत्र्य चळवळीचा सैद्धांतिक पाया रचला गेला.

भारताला स्वातंत्र्याच्या जोडीलाच जडत्व प्राप्त झालेली अर्थव्यवस्था मिळाली. इ.स.१९०० ते १९५० या कालखंडात भारताच्या एकूण देशांतर्गत उत्पादन वाढीचा दर जवळपास शून्य होता. स्वतंत्र भारताने नियोजनाच्या प्रारूपाचा अंगीकार करत आर्थिक पुनर्रचना आणि विकास प्रक्रियेची कास धरली. भांडवली साधनसामुग्रीचे उत्पादन करणाऱ्या उद्योगांची उभारणी करण्याचे ध्येय बाळगणाऱ्या महालनोबीस-फेल्डमन यांच्या प्रारूपाच्या आधारे भारताच्या स्वयंपूर्ण विकासाचा पाया रचण्यास सुरूवात करण्यात आली. तथापि, १९८०च्या दशकाच्या प्रारंभी जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत व्यापक स्वरुपातील आंतराष्ट्रीय आर्थिक एकीकरणाच्या रुपाने जगभर बदलाचे वारे वाहू लागले. भारताचा विकासदर, उपहासाने ज्याचा उल्लेख 'हिंदू विकासदर' केला जात असे, वर्षाकाठी ३ टक्के होता. देशातील जनतेच्या वाढत्या आशाआकांक्षा पूर्ण करण्यासाठी तो अत्यंत कमी होता. नियोजनबद्ध आर्थिक प्रक्रियेत निर्माण झालेली विकृती 'लायसेन्स परमीट राज' च्या रूपाने ठळकपणे दिसून येत होती, ज्यातून नोकरशहा-कंत्राटदार-राजकारणी यांच्या आपमतलबी वर्गाला व्यवस्थेतून अतिरिक्त लाभ उकळण्याचे हक्क प्राप्त झाले होते. आर्थिक सुधारणांच्या प्रारंभीचा तो कालखंड होता. या काळात जागतिक अर्थव्यवस्थेत वित्तीय भांडवल क्षेत्राचा विस्तार करून तातडीने कोणतीही लहान पावले उचलली जात नव्हती.

कर्जाची परतफेड करण्यासंदर्भात असलेली आंतरराष्ट्रीय बंधने पाळतानाच थकबाकीदार ठरू नये यासाठी भारताला संरचनात्मक पुर्नमांडणी करावी लागल्याने १९९०च्या दशकाच्या सुरूवातीला आर्थिक सुधारणांच्या प्रक्रियेला गती मिळाली. अर्थव्यवस्थेची दारे खुली करणे, नियंत्रणे दूर करणे आणि वित्तीय तसेच बँकींग क्षेत्रामध्ये लक्षणीय बदल करण्यासाठी अतिशय वेगाने आर्थिक सुधारणा करण्यात आल्या. सार्वजनिक क्षेत्राच्या हाती एकवटलेल्या अर्थव्यवस्थेचे बाजाराधिष्टीत मुक्त अर्थव्यवस्थेत झालेले परिवर्तन ही गुंतागुंतीची आणि बहुस्तरिय प्रक्रिया होती. वास्तवात या परिवर्तनामुळे देशांतर्गत एकूण उत्पादन वाढीचा दर १९९१-९२ ते २००३-०४ या कालावधीत पाच टक्क्यांपेक्षा जास्त आणि २००३-०४ ते २०११-१२ या कालावधीसाठी सहा टक्क्यांच्याही वर जाऊन पोहोचला. गरिबीच्या प्रमाणात झालेली घट, थेट परदेशी गुंतवणुकीत झालेली वाढ आणि परकीय चलनाच्या गंगाजळीची अधिक चांगली स्थिती हे देखील या कालावधीतील उल्लेखनीय यश आहे.

असे असले तरी, या कालावधीत देशात विषमतेच्या पातळीत झालेली वाढदेखील लक्षात घ्यावी लागेल. १९९० आणि २००० या दोन्ही दशकांच्या प्रारंभी झालेल्या अभ्यासानुसार सर्वाधिक श्रीमंत असलेल्या लोकांपैकी दहा टक्के लोकांकडे एकूण संपत्तीपैकी ५० टक्के संपत्ती होती तर सर्वात कमी श्रीमंत असलेल्या १० टक्के लोकांकडे एकूण संपत्तीपैकी जास्तीत जास्त ०.४ टक्के संपत्ती होती. जमिनीच्या बाबतीत बघितले तर सर्व बाजूने विचार करता तिच्या वाटणीत अधिक असमानता आहे. 'बहुतेक सर्व आर्थिक मालमत्ता ही एकूण लोकसंख्येपैकी एक टक्क्यांपेक्षा कमी जणांच्या मालकीची' असल्याने आर्थिक मालमत्तेची मालकी ही तर अधिक केंद्रीत झालेली आहे. स्थायी स्वरुपाच्या साधनसंपत्तीमधील विषमतेची परिणतीदेखील संधींमधील असमानतेत होते आणि त्यामुळे आर्थिक सुधारणांच्या कालखंडात भारताने आपल्या आर्थिक धोरणांचे उद्दीष्ट म्हणून स्वीकारलेल्या रोजगार निर्मितीबाबतदेखील गंभीर स्वरुपाची चिंता व्यक्त केली जात होती. वेगवान विकासदरामुळे खऱ्या अर्थाने रोजगारनिर्मिती झाली नाही. त्याचप्रमाणे, एकूण देशांतर्गत उत्पादनात उत्पादन क्षेत्राचा वाटा निव्वळ १६ टक्केच राहिल्याने भविष्यात विकासाबरोबर रोजगारनिर्मिती होण्याच्या शक्यतेवर संरचनात्मक बंधने आली.

वास्तविक, राष्ट्रीय संपत्तीच्या निर्मिती प्रक्रियेत आपण जेव्हा व्यापक स्वरूपात आणि फार मोठ्या संख्येने लोकांना त्यांचे हित व्हावे यासाठी 'भांडवलाच्या परिघात' एकत्र आणू शकतो तेव्हाच हक्कांवर आधारित समावेशक विकासाचे प्रारूप यशस्वी ठरू शकते. शेवटी, प्रसिद्ध अर्थतज्ञ जॉन रॉबिन्सन यांनी म्हटल्याप्रमाणे, 'शोषण होऊन देण्यापेक्षा सर्वात वाईट काय तर कधीच शोषण होऊ न देणे!'

**– भाषांतर : रवींद्र जोशी**




# जागतिक अर्थव्यवस्था आणि भारत

– अलोक शील

सध्याच्या काळातील जागतिक अर्थव्यवस्था गुंतागुंतींच्या चढउतारांतून जात आहे. बाह्यघटकांच्या मदतीने मागणी व पुरवठ्याचा समतोल साधण्याची धडपड अमेरिका, युरोप तसेच जपान सारख्या आर्थिक महासत्ता करीत आहेत. नुकत्याच प्रसिध्द झालेल्या जागतिक अहवालानुसार जागतिक महासत्ता असलेल्या अमेरिकेपासून ते अगदी नव्याने विकसित होणाऱ्या सर्व देशांतील अर्थव्यवस्थांना जागतिक मंदीचा फटका बसला आहे. जागतिक स्तरावर आर्थिक मंदीचे परिणाम स्पष्टपणे दिसत असतांनाच होणाऱ्या आर्थिक नुकसान भरपाईचा दर मात्र म्हणावा तितका समाधानकारक नाही.

दोन वेगवेगळ्या दृष्टीकोनांतून जागतिक आर्थिक नुकसान भरपाईचे विश्लेषण करता येईल. एका बाजूस केनेथ रोगॉफ व कार्मेन रिनहार्ट यांनी केलेल्या संशोधनानुसार, गेल्या काही वर्षांत जागतिक मंदीमुळे झालेले आर्थिक नुकसान हे विविध घटकांच्या मदतीने नुकसानाच्या समप्रमाणातच भरून निघत असल्याचे सकारात्मक चित्र आज पाहावयास मिळते. परंतु, ही नुकसान भरपाईची प्रक्रिया अतिशय संथ असल्याचेही संशोधक नमूद करतात.

दुसरी बाजू पाहता हे स्पष्ट होते की, जागतिक आर्थिक मंदीच्या परिणामांमुळे बऱ्याच देशांतील आर्थिक वृध्दीचा ढाचा कोलमडला असून त्यामुळे सध्या सर्वत्र अस्तित्वात असणारा आर्थिक वृध्दीचा खालचा दर हा येणाऱ्या काळातही पाहायला मिळेल. तसेच यूएस, चायना व युरोपियन युनियनमधील जर्मनी व इतर महत्वाच्या देशांना २००३ ते २००७ या काळात झालेले सर्वच आर्थिक लाभ हे विषम प्रमाणात किंवा असंतुलित स्वरूपाचे होते. त्या काळातील आर्थिक असमतोलमुळेच अनेक देशांच्या अर्थव्यवस्थांना आजही आर्थिक ताण सोसावा लागत असून त्यामुळेच वृध्दीचा उच्चतम दर गाठणे आवाक्याबाहेरचे लक्ष्य वाटू लागले आहे.

हार्वर्ड विद्यापीठातील तज्ञ लॉरेन्स समर्स यांच्या मते, अमेरिकेची अर्थव्यवस्था आज दीर्घकालीन गतिहिनतेच्या परिस्थितीत असल्याचे दिसते. पूर्वीचे सुगीचे दिवस परत येण्याची चिन्हे न दिसण्यामागे व्यवस्थांमधील सुधारणांचा अभाव व त्यासाठी अपुरी पडणारी राजकिय इच्छाशक्तीच कारणीभूत असल्याचे स्पष्ट होते.

वेगळ्या प्रकारे सांगायचे झाल्यास, आर्थिक नुकसान भरपाईची प्रक्रिया मंदावण्यामागे गेल्या काही काळातील प्रमुख बदल जसे, जागतिकीकरण, भांडवली बाजाराचे अर्थव्यवस्थेतील वाढते स्त्रोम, मोठ्या कॉर्पोरेट्स कंपन्याच्या आर्थिक उलाढालींच्या लेखा अहवालांतील नफा व कर्जाऊ किंमतीतील तफावत हे घटक कारणीभूत ठरले. या आर्थिक घसरणीचा सर्वाधिक फटका बसला तो जपान या राष्ट्राला. जपानप्रमाणेत जगातल्या इतर मोठ्या देशांनाही आर्थिक नुकसानीची झळ सोसावी लागली.

सध्या जागतिक वृध्दीचा दर हा ३ ते ३.५ टक्के एवढा आहे. २००३-२००७ या काळात हाच दर ५ टक्के एवढा होता. त्यामुळे आज जो वाढीचा सर्वसामान्य दर आहे तोच जर येणाऱ्या काळातही राहिला, तर आर्थिक व्यवहारांना उत्तेजना मिळण्याऐवजी आर्थिक गणिते चुकण्याचाच संभव जास्त आहे, असे धोरणकर्त्यांना वाटते. हेच चित्र वास्तवातही काही प्रमाणात पाहायला मिळते आहे.

२००३ ते २००७ या कालावधीच्या तुलनेने जगातील सर्वच राष्ट्रांमध्ये आर्थिक वृध्दीचा दर ढासाळलेला आहे. परंतु, असे असूनही जागतिक स्तरावर आर्थिक लाभांचा दर हा आर्थिक मंदीआधीच्या दहा वर्षांच्या सरासरीएवढा असल्याचे दिसते. यातील मुख्य फरक हा की, उदयोन्मुख व्यवस्था या १९९४-२००३ या काळातील सरासरीपेक्षाही जलद गतीने विकसीत होत आहेत. याउलट, विकसीत अर्थव्यवस्थांचा विकास पूर्णपणे थांबलेला आहे. त्यामुळे वर उल्लेखलेली दिर्घकालीन गतिहिनतेची समस्या सर्वच विकसीत अर्थव्यवस्था अनुभवत आहेत. २००३-२००७ या काळातील आर्थिक वृध्दीचा लाभ हा केवळ उदयोन्मुख राष्ट्रांनाच मिळाला.

असे असले तरीही, विकसनशील अर्थव्यवस्थांसाठी येणाऱ्या काळात सलग आर्थिक लाभ संभवत नाहीत, असा अहवाल जागतिक नाणेनिधीनेही दिला आहे. दरडोई उत्पन्न लक्षात घेता, विकसीत अर्थव्यवस्थांना येणा-या काळात उभारी मिळेल, असे ठामपणे म्हणता येऊ शकते.

याची ठोस कारणमीमांसा देतांना मुख्य गोष्ट पुढे येते, ती म्हणजे आजही अनेक विकसनशील अर्थव्यवस्था अनेक बाबतीत विकसीत राष्ट्रांवर अवलंबून आहेत. त्यामुळे अनेक बाबतीत जसे विकसीत राष्ट्रांना कठीण परिस्थितीतून जावे लागते आहे, तीच किंवा त्याहून बिकट आर्थिक समस्या विकसनशील अर्थव्यवस्थांना सुध्दा अनुभवावी लागेल. फक्त त्याचे स्वरूप थोडे वेगळे असेल.

भारताबद्दल विस्ताराने सांगायचे झाल्यास, भारतीय अर्थव्यवस्था सुध्दा एकप्रकारे आर्थिक कसोटीच्या काळातूनच जात आहे. आपल्या देशापुढील आव्हाने वेगळी व तितकीच आव्हानात्मक आहेत. काही वर्षांपूर्वी जी-२० राष्ट्रांच्या झपाट्याने विस्तारणाऱ्या अर्थव्यवस्थांच्या क्रमवारीत भारताचा दुसरा क्रमांक होता. आज इंडोनेशियाने भारतावर मात करत या यादीत दुसरे स्थान मिळवले आहे. १९९७ आणि २००८ या वर्षांदरम्यानचा विकासदर पाहता भारतात आर्थिक संथपणा आला असून त्याचे दुष्परिणामही दिसत आहेत.

तसे पाहता, मध्यम गतीने होणाऱ्या वृध्दीच्या काळात जागतिक आर्थिक नुकसानी भरपाई फारशी आशादायी नाही. कारण त्यासाठी मोठ्या प्रमाणावर रचनात्मक सुधारणा होणे आवश्यक आहे. भारताबाबत आजही अपेक्षेने पाहिले जाते यामागे दोन प्रमुख कारणे आहेत. त्यापैकी एक म्हणजे भारतातील वैयक्तिक स्तरावर केला जाणारी आर्थिक बचत व येणाऱ्या काळात आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी अशा लोकसंसख्येचे (युवावर्गाचे) मोठे प्रमाण. भारतात दरडोई उत्पन्नाच्या बरोबरीने मोठ्या बचतही केली जाते. त्यामुळे गेल्या आर्थिक आकडेवारीनुसार घरगुती बचतीचे प्रमाण गेल्या दहा वर्षांत १० टक्कयांनी वाढले आहे. दुसरे महत्वाची व आश्चर्यकारक बाब म्हणजे, जगभरातील देश मागण्यांवर निर्बंध घालत आहेत कारण त्यांच्या मागण्या ते इतर देशांकडूनच पूर्ण करू शकतात. भारत मात्र अनेक बाबतीत स्वयंपूर्ण आहे परंतु, इथे अंतर्गत पुरवठ्यावरूनच वितुष्ट येत आहेत.

आर्थिक तेजीचा काळ हा वाढीचा उच्च दर व त्याअनुषंगाने उद्भवणाऱ्या आर्थिक समस्या सोडवण्याचा उत्तम काळ ठरतो. परंतु, बरेचदा आर्थिक सुधारणांकडे कानाडोळा करून तेजीच्या काळात अर्थव्यवस्थेत कोणतेही बदल न करता वरवरच्या फायद्यांकडेच पाहिले जाते. पुरवठ्यावरून उद्भवणाऱ्या आर्थिक समस्यांबाबत देशांतर्गत पातळीवर उपाययोजना शक्य आहेत. यातील बरेचसे उपाय अंमलात आणणे सोपे नाही व हेच येणाऱ्या काळातील भारतीय शासनापुढील मुख्य आव्हान असेल.

भारतासमोर असणाऱ्या आर्थिक समस्यांमध्ये पहिला क्रमांक लागतो, तो कृषी क्षेत्रातील समस्यांचा. महागाई, कामगारावर अवलंबून असणारी शेतकी व्यवस्था व शेतमजूरांची कमतरता यांमुळे होणारे कमी कृषी उत्पादन, व शेती व्यवस्थेतील पायाभूत सुविधांची कमतरता इ. मुळे होणारे आर्थिक नुकसान यांसारख्या काही प्रमुख समस्यांचा उल्लेख भारतीय शेतीक्षेत्राबद्दल करता येईल.

सध्याच्या आर्थिक संतुलनाची दोलयमान स्थिती पाहता भारतात उत्तम प्रशासनाच्या मदतीने अनेक आर्थिक समस्यांवर तोडगा काढून आर्थिक वाव देता येईल.

जगभरातील सर्वच राष्ट्रांत महागाईचे एकसमान चित्र असतांना भारताच्या बाबतीत

सातत्याने वाढणारी महागाई ही राज्यकर्त्यांना मुख्य समस्या वाटत नाही, असेच दिसते. कारण जगभरात अन्नधान्याच्या किंमती नियंत्रित करण्याचे उपाय योजिले जात असतांना भारतात मात्र त्याबाबत कोणतेही ठोस पाऊल उचलले जात नाही.

जगभरातील देशांच्या तुलनेत भारतात अन्नधान्याच्या किंमती नेहमीच वाजवीपेक्षा कमी असत. आजही फळेभाजीपाला व अन्नधान्यांच्या बाबतीत बाजारांत महागाई असतांना भारतात मात्र स्वस्तातच या वस्तू उपलब्ध आहेत. नव्वदच्या दशकानंतर भारताने आपली बाजारपेठ खुली केली असली तरी, त्याचा लाभ भारतीय कृषी क्षेत्राला म्हणावा तितका घेता आलेला नाही.

अन्नधान्यांच्या किंमती वाढण्यामागे प्रमुख कारण म्हणजे कृषी सहाय्यक घटकांच्या किंमतीत होणारी वारंवार वाढ आहे. अंतिम ग्राहकांपर्यंत कृषीउत्पन्नाच्या वाढीव किंमतीमागे शेतीतील अपुऱ्या सोईसुविधा व पारंपारिक विपणन व्यवस्थांमुळे कमी प्रमाणातील कृषी उत्पन्न, वाहतूकीदरम्यान होणारी मोठ्या प्रमाणातील धान्य व भाजीपाल्याची वाताहात इ. कारणे आहेत. शेतीतील समस्यांबाबत उपाययोजना करतांना वरील प्रमुख घटकांबाबत सुधारणा करणे आवश्यक आहे.

भारतीयअर्थव्यवस्थेतीलसमस्यांमध्ये दुसरा क्रमांक लागतो तो भारतातील कामगाराधिष्ठीत उत्पादनप्रणालीचा. मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला गेल्यास बेरोजगारीच्या समस्येवरही उपाय सापडू शकेल. शेती क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता भासते. अनेक बेरोजगार व्यक्तींना योग्य प्रशिक्षण देऊन शेतीक्षेत्राकडे वळवल्यास भारतीय अर्थव्यवस्थेला त्याचा प्रत्यक्ष लाभ मिळू शकेल.

चीन प्रमाणेच भारतालाही देशी उत्पादने मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्याचा फायदा आहे. त्याबरोबरच खाजगी क्षेत्राचा विकास व भांडवली बाजारातूनही भारतीय अर्थव्यवस्थेला बळकटी प्राप्त मिळत आहे. चीन प्रमाणेच भारतालाही जागतिक स्तरावर आपली उत्पादने मोठ्या प्रमाणात वितरित करण्याच्या संधी आहेत. या संधींचा लाभ उठवल्यास चीनप्रमाणे भारतीय बाजारमालालाही जगभरात मागणी मिळेल यात शंका नाही. यातून मिळणाऱ्या उत्पन्नातून भारत आपली वित्तीय तूट भरून काढू शकतो.

भारतातील तिसरी समस्या ही येथील करव्यवस्थेबाबत असून करसंबंधीत सुधारणांबद्दल भारतात पुरेशी जागरूकता निर्माण झालेली नाही. ही टाळता येणारी समस्या आहे. आपल्याकडे रचनात्मक बाबींमुळे उद्भवणारी आर्थिक तूट व चक्राकार गतीने नियमितपणे होणारी वित्तीय तूट यातील फरक वेगळा गृहित धरला जात नाही. देशातील वार्षिक आर्थिक लेखातील वित्तीय तूटीत दिवसेंदिवस भरच पडत आहे कारण वाढीचा दर हा सातत्याने कमी होत आहे. सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील परस्पर सहकार्य महसूल तूट भरून काढण्यात महत्वाची भूमिका बजावेल. आज जरी भारतातील वित्तीय तूटीमुळे देशाला अजूनपर्यंत फार मोठे आर्थिक नुकसान सोसावे लागलेले नसले, विशेषत: सार्वजनिक क्षेत्रातील जीडीपीचे प्रमाण अबाधित राहिले असले, तरीही नियोजित विकासदर गाठण्यासाठी व आर्थिक वाढीसाठी देशातील आर्थिक संरचनेत बदल करणे आवश्यक आहे. सामाजिक व भौतिक बदलांचा परिणाम अर्थव्यवस्थेला बळकटी देऊ शकतो, हे लक्षात घेऊन धोरणकर्त्यांनी योग्य बदल केले पाहिजे.

प्रस्तुत लेखाचा सारांश देतांना मुख्य मुद्दा पुन्हा अधोरेखित करता येईल तो म्हणजे, जागतिक अर्थव्यवस्था कोलमडलेली नसली तरीही आर्थिक मंदीने झालेले नुकसान भरून येण्यासाठी योग्य बदल व सुधारणांकडे कानाडोळा केला जातो. यासाठी सर्वच राष्ट्रांतील धोरणकर्त्यांना परिस्थितीचा आढावा घेऊन योग्य पावले उचलावी लागतील. भारतीय अर्थव्यवस्थेलाही अनेक आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. शेती क्षेत्रात आवश्यक बदल व उत्पादन वाढीसाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी उत्तम प्रशासनयंत्रणेची गरज आहे, जी धोरणकर्त्यांनी सुचवलेले बदल प्रत्यक्षात अंमलात आणेल. याचे परिणामी, वाढीचा उच्च दर व आर्थिक विकास साधणे भारतास शक्य होईल.

(***अलोक शील*** *- भारतीय प्रशासकीय विभागाचे सदस्य. प्रधानमंत्र्यांच्या आर्थिक सल्लागार परिषदेचे सचिव म्हणून कार्यरत. संपर्कासाठी ईमेल-www.aloksheel.com,aloksheel@aloksheel.com*)

**– भाषांतर : निवेदिता भोरकर**



# भारतातील आर्थिक वाढ : कामगिरी आणि भविष्य

**– रविंद्र ढोलाकिया**

अर्थव्यवस्थेतील आर्थिक वाढीचा सर्वांत प्रभावी सर्वव्यापक सूचक म्हणजे सकल घरगुती उत्पादनातील सरासरी वार्षिक वाढ हा होय. अशी वाढ जी भौगोलिक सीमांतर्गत असतेच त्याशिवाय मूळ कालाधारित स्थिर किमंतीवर अवलंबून असते. ज्याचा सरळसरळ परिणाम त्याकालावधीत देशांत उत्पादित होणाऱ्या वस्तू व सेवांच्या सरासरी वाढीतील उपलब्धतेवर होतो. जेव्हा घरगुती उत्पादनातील वाढ वाढत्या लोकसंख्येशी जुळवून घेऊ पाहते, तेव्हा आपणांस दरडोई उत्पन्नात सरासरी वार्षिक वाढ पाहावयास मिळते, जी तत्कालीन लोकांच्या राहणीमानाच्या दर्जावर प्रतिबिंबित होते. मात्र, हे बहुतांशपणे मोठ्या देशांना लागू पडते. अशा तऱ्हेने सरासरी वार्षिक उत्पन्न शोधण्याचे तीन दर किंवा निकष खालीलप्रमाणे आहेत :

१) सकल घरगुती उत्पादन, २) लोकसंख्या, व ३) दरडोई उत्पन्न. हे सारे महत्वाचे निकष असून कोणत्याही राष्ट्राच्या दीर्घकालीन आर्थिक विकासाच्या कामगिरी व संभाव्यतेवर परिणामकारक आहेत.

भारतातील आर्थिक वाढीचा इतिहास फार रंजक व बोधपर आहे. कालखंडातील तुलनात्मक अभ्यासाने सकल घरगुती उत्पादनाचे अर्थपूर्ण पृथक्करण करुन वर्ष १९०० पर्यंत मागे जाता येईल. (शिवसुब्रह्मण्यम् २००४, हातेकर आणि डोंगरे २००५) शासनाच्या आर्थिक धोरणांच्या अंतर्भूत बाबींना पडताळण्यासाठी तसेच कालानुरुप अर्थव्यवस्थेच्या कामगिरीवर प्रभाव पाडणारे घटक ठरवण्यासाठी, भारताच्या आर्थिक वाढीवर कालानुरुप महत्वाचे संशोधन वेळोवेळी करण्यात आले आहे. (हातेकर आणि डोंगर २००५, बालकृष्णन् आणि परमेश्वरन् २००७ आणि ढोलकिया २०१४) यांच्या मते भारताच्या आर्थिक वाढीच्या इतिहासाचे एकूण पाच महत्त्वाचे टप्पे करण्यात आले आहेत.

१) १९००-०१ ते १९५०-५१,
२) १९५०-५१ ते १९८०-८१,
३) १९८०-८१ ते १९९१-९२,
४) १९९१-९२ ते २००३-०४, व
५) २००३-०४ ते २०११-१२.

या पहिल्या टप्प्यातील आर्थिक वाढीचा काळ सर्वांत कठीण होता. कारण त्यावेळेस आपला देश ब्रिटीश साम्राज्याच्या अखेरच्या अर्धशतकात काळ कंठत होता. सकल घरगुती उत्पादन प्रतिवर्ष वाढले होते आणि त्याच प्रमाणात लोकसंख्याही वाढत होती. याचा परिणाम असा झाला की गेल्या शतकाची पहिली पन्नास वर्षे दरडोई उत्पन्न स्थिरच होते. म्हणूनच ब्रिटीश साम्राज्याची भारतातील शेवटची पन्नास वर्षे कदाचित त्यांच्या १९० वर्षे एकूण कारकीर्दीतील भौतिक व सामाजिक भांडवली सुधारणांच्या दृष्टीने सर्वांत सुखावह काळ असावीत. कारण या काळात रेल्वे, बंदरे, शाळा, महाविद्यालये, इस्पितळे, बँका आणि इतर संस्थांची मोठ्या प्रमाणात स्थापना झाली. ज्यामुळे आपण असे समजू शकतो की लोकांच्या राहणीमानाच्या दर्जाची स्थिरता ही ब्रिटीशांच्या १९०० ते १९५१ या वर्षांच्या परिक्षणावरुन ब्रिटीशांच्या १९० वर्षांच्या कारकिर्दीतील

सर्वांत अपूर्व गोष्ट मानावी लागेल. गेल्या दोन शतकांमध्ये स्थिरतेने आश्वस्त झालेला, वैभव व सुबत्तने जगातील लोकांचे आकर्षण ठरलेला आणि अनेक श्रीमंत देशांपैकी एक असा आपला देश १९५०-५१ नंतर अनेक गरीब देशांपैकी एक ठरला.

दरडोई उत्पन्नाच्या या दीर्घकालीन स्थिरतेला अजूनही इतर पैलू होतेच. जसे की, त्या परिस्थितीत, कुणी जर आर्थिक सुस्थितीत येत असेल तर कुणालातरी दु:स्थितीत ढकलल्याखेरीज शक्य नव्हते. हा सारा प्रकार साधारण ऑपरेशन रिसर्च या विषयातील झिरो सम गेम या संकल्पनेप्रमाणेच होता. कारण समाजातील काहींनी या प्रगतीकडे संशयमिश्रित नजरेने पाहण्यास सुरुवात केली, की प्रगती करणारे लोक श्रीमंत होण्याच्या ईर्ष्येने वाकडया मार्गाने वाटचाल करत असावेत. इतरांचे म्हणजेच गरीबांचे हाल करु व त्यांच्या संधी हिरावून ही श्रीमंती मिळवली असावी, असाही समज होता. ही संकल्पना आजही मूळ धरुन आहे. यामुळे उद्योजकतेमधील सामाजिक व सांस्कृतिक बंधने जसजशी मजबूत होत गेली तसतशी आर्थिक प्रगतीला खीळ बसू लागली. लोकांच्या राहणीमानाच्या दर्जाची दीर्घकालीन स्थिरता हेच दर्शवते की, उपभोगतेचा ढाचा विशेष बदलत नाही आणि त्या उपभोगतेमध्ये नवीन बदल होत नसल्याने किंवा व्यवस्थेतील तंत्रज्ञानाच्या अभावामुळे लोक तीच अन् तीच वस्तू थोडया फार फरकाने पुन्हा पुन्हा आयुष्यभर उपभोगत असत. वस्तूच्या लुप्ततेचा तसेच घसाऱ्याचा दर प्रचंड कमी होता. त्याचप्रमाणे पुनर्वापर करुन वस्तू जपून वापरण्याचे संस्कार, स्त्रोतांचा जपून वापर, अप्रचलित तंत्रज्ञानाचा वापर त्याप्रमाणे कमी किंमतीच्या मालाचा वापर या सवयी सुध्दा समाजात बऱ्याच प्रमाणात प्रचलित होत्या.

या स्थिर दुष्टचक्रातून बाहेर येणे हे स्वातंत्र्य मिळवल्यानंतर देशापुढे मोठे आव्हान होते. सार्वजनिक क्षेत्रात बऱ्याच संस्थांची उभारणी, बरीच नियंत्रणे, परवाने, कर लादून अर्थशास्त्रीय आणि भौतिक नियोजनांचा स्वीकार करुन आपल्याला सर्वसामान्य दृष्ट्या तसेच सामाजिक दृष्ट्या समाजाला स्वयंपूर्ण करावयाचे होते. दुसऱ्या टप्प्यात म्हणजे १९५०-८१ या काळात सार्वजनिक क्षेत्राच्या हस्तक्षेपाने ते बऱ्याच अंशी साध्य केले. खरेदी की निर्मिती हा व्यवस्थापकीय तिढा होता खरा, पण राष्ट्र स्वयंपूर्ण करण्याची जबाबदारी असल्याने अवास्तव निर्मिती मूल्याची पर्वा न करता आयातीला दुसरा पर्याय निवडण्यावर भिस्त होती. मात्र, तत्कालीन बहुतांश नेत्यांचा निर्यातीबाबतचा निराशावाद तुलनेने जशास तसा दृष्टीस पडत होता. जागतिक निर्यातीमधील आपला टक्का सातत्याने घसरत असला तरी १९५०- ते ८१ या ३० वर्षांत घरगुती उत्पन्न प्रतिवर्षी ३.५ टक्के या दराने वाढले. प्राथमिक आरोग्यसेवेचा ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर विस्तार झालेला असल्यामुळे मृत्यूदर झपाट्याने घटला गेला. परिणामी लोकसंख्येचा दर प्रतिवर्षी २.२ टक्के वाढला. मात्र, नोंदवलेली दरडोई उत्पन्नातील प्रतिवर्षातील वाढ ही १.२ टक्के इतकी असमाधानकारक हाती. प्रत्यक्षात दरडोई उत्पन्नातील ही वाढ १.२ टक्के असली तरी ती घरगुती उत्पन्नाच्या २.५ टक्के असायला हवी होती, असे निश्चित केले गेले होते.

१९८० पर्यंत, चीनशी तुलना करता भारतात अर्थसुधारणांची गरज आहे, हे सर्वांना पटले होते. १९८० च्या दशकात या दृष्टीने व्यापक पावले उचलली गेली. चलनवाढीचा दर नियंत्रित करण्याकरता विनिमय दरामध्ये बदल घडवले गेले. वित्त धोरण निश्चितीच्या दिशेत बरेच बदल करण्यात आले तसेच अर्थक्षेत्रात बऱ्याच नव्या संस्थांची स्थापना करण्यात आली. याबरोबरच भरीव दीर्घकालीन वित्तधोरणे जाहीर करण्यात आली, व माहिती तंत्रज्ञान व संपर्क दळणवळण या महत्वाच्या स्त्रोतामध्ये विशेष लक्ष देण्यात आले. तिसऱ्या टप्प्यात आर्थिक वाढ प्रतिवर्षी ३.५ टक्क्यांहून सुरू होऊन ५.१ टक्के एवढी वाढली व त्याच सुमारास लोकसंख्या दोन टक्केयांनी घटली. म्हणून १९८० मध्ये दरडोई उत्पन्न या काळात प्रतिवर्षी ३ टक्के या दराने वाढले.

वित्त धोरण, रिझर्व्ह बँकेची स्वायत्त धोरणे, व्यावसायिक धोरणे, भांडवली बाजार, हवाई उड्डाण क्षेत्र, बँकींग आणि विमा क्षेत्र अशा अनेक अर्थव्यवस्थेच्या अंगांमध्ये चौथ्या टप्प्यात काही सुनियोजित आर्थिक धोरणांच्या अंमलबजावणीची द्रुतगती दिसून आली. शिवाय सुधारणांना वाव देण्यात आला. याची सुरुवात खासगीकरणापासून झाली. कारण आजपर्यंत ज्या सेवा सार्वजनिक क्षेत्रापुरत्या मर्यादित होत्या त्यांमध्ये खासगी क्षेत्राला सुध्दा सहभागी होण्याची परवानगी देण्यात आली. परवाने रद्द करुन बऱ्याच अर्थविषयक उद्योगांना मोकळीक देण्यात आली. देशी अर्थव्यवस्थेचे आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेशी व्यापार करताना येणारे जकात दर घटवले गेले व थेट परदेशी गुंतवणूक स्वीकारण्यात आली. तसेच देशी व्यापाऱ्यांना वैश्विक स्तरावर वाव देण्यात आला. तसेच बहुदेशीय कंपन्यांना प्रोत्साहित करण्यात आले. त्या काळात सकल घरगुती उत्पादन सहा टक्क्यांपर्यंत वाढले आणि दरडोई उत्पन्न चार टक्क्यांच्या पुढे गेले.

२००३-०४ ते २०११–१२ या शेवटच्या टप्प्यात जरी विशेष आर्थिक सुधारणा घडल्या नसल्या तरी, अर्थव्यवस्थेने

पाच ते सहा वर्षांपूर्वी घडवलेल्या सुधारणांना या काळात शाश्वती व बळकटी मिळाली. शेवटच्या चार पाच वर्षांत, नव्या नियमांशी व नियंत्रणांशी झालेला परिचय, नवीन गरजा, बंद, पर्यावरणीय विषयक सुधारणा इ. मुळे काही सुधारणा रद्दबातल झाल्या. सन २००८ पूर्वीच्या सकारात्मक जागतिक घटकांच्या जोडीला उदार आर्थिक धोरण व चळवळींसह सोपे करविषयक धोरण असल्यामुळे उच्च विकासदरण्यास मदत झाली. यानंतर सकल घरगुती उत्पादनाची वार्षिक वाढ ८.४ टक्के एवढी होती आणि दरडोई उत्पन्न ६.५ टक्क्यांपेक्षा अधिक होते. नवल म्हणजे, रोजगार सुधारणा, भूमीबाजार सुधारणा, थेट परकीय गुंतवणूक, प्रत्यक्ष अप्रत्यक्ष कर सुधारणा, खर्च सुधारणा इ. आणि अशा अनेक क्षेत्रांत अजूनही समाधानकारक प्रगती पाहावयास मिळालेली नाही. असे असल्याने या सुधारणांमुळे भविष्यात अर्थव्यवस्थेकडे आर्थिक वाढीसाठी उत्तम संधी आहे.

**आर्थिक वाढीचे भवितव्य :**

अलीकडे २००७-०८ हे वर्ष अर्थव्यवस्थेची उत्तम कामगिरी दाखवणारं वर्ष म्हणून गणण्यात आले. आर्थिक वाढीच्या निकषासंदर्भात हा महत्त्वाचा अभ्यास ठरु शकेल की, आपण प्राप्त केलेला आर्थिक विकास हा भूतकाळातील विकासापेक्षा कमी नव्हता शिवाय आपण तो पुन्हा पुन्हा गाठू शकू. यातून अस्तित्वात असलेली अर्थव्यवस्थेच्या क्षमतेची किमान मर्यादा पाहावयास मिळते. २०१०-११ या वर्षामध्ये, आपण या निकषांना साध्य करण्याच्या अगदी जवळ आलो होतो. यातून सुसाध्यता पाहावयास मिळाली आणि अर्थव्यवस्थेच्या अस्तित्वात क्षमतेची वास्तविकता पाहावयास मिळाली.

२००७-०८ या वर्षामध्ये, भारतीय अर्थव्यवस्थेने केलेली कामगिरी पाहू. सकल घरगुती उत्पादन (घटक मूल्यसंदर्भात) ९.३ टक्के, निर्यातीमधील वाढ (डॉलरमध्ये) २९ज्ञ टक्के, महागाईच्या दरातील वाढ- (घाऊक दराने) ४.७ टक्के आणि किरकोळ दराने ६.२ टक्के, परकीय गंगाजळी ३१० अब्ज डॉलर, सरासरी विनिमय दर रु.४०.३ प्रति डॉलर, चालू वित्तीय तूट आर्थिक उत्पन्नाच्या तीन टक्के, संयुक्त शासकीय तूट ४ टक्के, संयुक्त महसुली तूट आर्थिक उत्पादनाच्या ०.२ टक्के इ. म्हणून २००७-०८ हे वर्ष या साऱ्या प्रगतिशील निकषांमध्ये अग्रेसर ठरले. फक्त ग्राहक निर्देशांक वागळता इतर सर्व निकष प्रथमत साध्य झाले ते केवळ राष्ट्रीय बचत आणि राष्ट्रीय गुंतवणूक दर या दोहोंनी त्यांचा वैयक्तिक उच्चांक अनुक्रमे उअच्या ३६.८ टक्के व ३८.१ टक्के गाठला गेला म्हणूनच. या काळात वाढीव भांडवली उत्पादकता प्रमाण जवळजवळ ४.१ टक्के होता.

मात्र २००७-०८ नंतर, अर्थव्यवस्थेची कामगिरी या साऱ्या निकषांवर कमालीची घसरली. आर्थिक आणि आश्वासकतेचा अभाव (२००८), तेलकिमतींसह चढलेल्या वस्तूंच्या किमती व युरोझोनचा सार्वभौम कर्जविळखा इ. कारणांमुळे यांवर आधारित विकसित अर्थव्यवस्था गंभीर मंदीच्या गर्तेत लोटल्या गेल्या आणि विकसनशील देशांना आर्थिक घसरणीला सामोरे जावे लागले. या आर्थिक घटीतून निर्माण झालेल्या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी सरकारी व इतर वित्तीय संस्था संयुक्तपणे प्रयत्न करत होत्या. भारतीय अर्थव्यवस्था तुलनेने या घसरणीतून फार जलद बाहेर पडू शकली व तिने वाढीला चालना दिली. मात्र वाढती भाववाढ, सरकारी वसुली आणि चालू खात्यांतील जोडतूट, कमालीचा चलन घसारा आणि परदेशी विनिमय निधीतील तोटा या बाबतीत अर्थव्यवस्था असफल ठरली. सार्वजनिक क्षेत्रातील बचती या आर्थिक उत्पन्नाच्या ५ टक्के (२००७-०८) पासून १.३% (२०११-१२) पर्यंत ढेपाळल्या. खासगी क्षेत्रातील बचती आर्थिक उत्पन्नाच्या ९.४ टक्केपासून ७.२ टक्के पर्यंत घसरल्या. परिणामी, सर्वसामान्य बचत दर ३०.८ टक्केपासून ६ टक्क्यांनी घसरला. २०११-१२ च्या काळात गुंतवणुकीचा दर ३८.१ टक्के पासून ३५ टक्के आणिं आर्थिक उत्पन्नाच्या ६.२ टक्केपर्यंत घसरले. वाढीव भांडवली उत्पादकतेचे प्रमाण ५.६ टक्के पर्यंत वाढले गेले. हे प्रमाण अर्थव्यवस्थेतील भांडवल स्त्रोतांच्या कार्यक्षमतेची मोठया प्रमाणात घसरण दर्शवते कारण गुंतवणूक अनुत्पादितच राहीली.

पायाभूत तरतूदी, कच्च्या मालाचा पुरवठा, करधोरणे, पर्यावरणीय मुद्दे निकालात काढणे, प्रचंड गुंतवणुक असलेल्या प्रकल्पांना वेळोवेळी मान्यता देणे या आणि अशा गोष्टी शासनाकडून न केल्याचा वा दुर्लक्ष केल्याचा परिणाम महत्त्वाच्या क्षेत्रातील भांडवली गुंतवणूक घटण्यात झाली. अर्थव्यवस्थेची क्षमता मोजण्याच्या दृष्टीकोनातून, हे सारे घटक शाश्वत स्वरुपाचे नाहीत आणि केव्हाही रद्द होऊ शकतात. जर केंद्र सरकारने तातडीने निर्णय घेण्यास सुरुवात केली आणि उर्वरित दाव्यांना मान्यता देण्याचे आरंभले तर खासगी कॉर्पोरेट क्षेत्रात अतिरिक्त गुंतवणूकीसाठी चांगलेच प्रोत्साहन पुरवले जाईल. इतकेच नव्हे तर अस्तित्वातील प्रकल्पांच्या संबंधित दरांमध्येही सुधारणा होईल.

अशा तऱ्हेने ३६.८ टक्के हा घरगुती बचत दर गाठणे सहज शक्य आहे. त्याचप्रमाणे ३८ टक्के गुंतवणूक

दर मिळवणेही शक्य आहे. त्यामुळेच कदाचित भारताचे सामर्थ्य उठून दिसेल. याचे कारण म्हणजे, भारत हा डेमोग्राफिक लाभांश उपभोगणारा जगातील फार थोड्या अर्थव्यवस्थांमधील एक देश आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने वर्तवलेल्या अंदाजानुसार, भारताच्या लोकसंख्येच्या २० ते ६५ या श्रमकरी वयोगटातील लोकांची संख्या वाढत आहे आणि ती अशीच २०२७-२८ पर्यंत असेल. त्यानंतर यामध्ये स्थिरता येईल व पुढे मात्र त्यात घसरण संभवते. पूर्वीसारखी परिस्थिती पुन्हा मिळवण्याकरिता साधारण पंधरा ते वीस वर्षे वाट पहावी लागेल. याचे कारण जन्म मृत्यू दरामध्ये होणारी वाढ. ही वाढ एकदा उच्चांकी पातळीवर पोहचली की पुन्हा थोड्याफार फरकाने उतरणीला लागेल. २०२७-२८ या वर्षांपर्यंत डिपेंडन्सी गुणोत्तर प्रमाण उतरणीला लागेल. देशांतर्गत बचतदर हा वाढीला लागण्याची स्पष्ट चिन्हे आहेत. हा दर सकल घरगुती उत्पादनाच्या ४०-४२ टक्के असेल, जो आता दक्षिण पूर्व आशिआई देशांनी गाठलेला आहे.

विकास दराची ही विविधपातळीवरची उच्च शिंखरे पहाता आपण जास्तीत जास्त विदेशी गुंतवणूक आकर्षित करु शकतो, जो चांगला परतावा तसेच गतिमान बाजार देऊ शकेल. ज्याप्रमाणे आपण विदेशी गुंतवणूक आकर्षित करु शकतो. याच धर्तीवर आपल्या येथील कंपन्यांना देखील विदेशात विस्तार करण्याची संधी देऊ शकतो. आणि आपण तेथील बाजारपेठादेखील काबीज करु शकतो. आपण केवळ दोन टक्के इनफ्लो गृहीत धरला तरीही २०५० पर्यंत आपण १०.५ टक्क्यांपेक्षा जास्त वार्षिक विकास दर गाठू शकू.

लोकसंख्या वाढीचा दर बऱ्यापैकी घसरण्याची चिन्हे आहेत. अंदाजित आकडेवारीनुसार सरासरी वार्षिक एक टक्के गृहीत धरली आहे. याचा परिणाम असा की, आपले दरडोई उत्पन्न, सकल घरगुती उत्पादनाच्या ९ टक्क्यांपर्यंत वाढू शकते. हा मनाला अत्यंत उभारी देणारा अनुभव असेल. कारण दर ८ वर्षांनी दरडोई उत्पन्न दुप्पट झालेले असेल. वस्तु व सेवा यांचा मिळकतीचा दर हा भूतकाळात कधीही न गाठलेला असू शकतो. तीच गोष्ट लोकांच्या क्रयशक्तीचीही असेल कारण तीही वाढलेली असेल. ग्राहक उपभोगतेचे द्रुतगतीने होणारे विस्तारीकरण पाहता, भविष्यात उपभोग नमुन्यामध्ये किंवा पॅटर्नमध्ये कमालीचा बदल संभवतो. क्रय शक्तीचा हा आविष्कार सातत्याने बदलत राहील. वस्तू लुप्ततेचा आणि घसाऱ्याचा दर बराच असेल. वस्तूंची जपणूक ना शक्य ठरेल ना व्यवहार्य. वस्तू आणि स्त्रोतांवरची पुर्नप्रक्रिया हा भविष्यात एक चलती असलेला उद्योग ठरेल. मात्र, त्याचे घरगुती स्वरुप गेलेले असेल. सेवा, मनोरंजन, माहिती, दळणवळण, संशोधन आणि विकास आदि क्षेत्रे प्रामुख्याने प्रभावी असतील. थोडक्यात, भारताची येणाऱ्या शतकाची पहिली पन्नास वर्षे ही मागील अर्धशतकाच्या परस्पर विरोधी असतील.

आर्थिक वाढ, उद्योजकता आणि उपभोगतेतील वैविध्य यांची द्रूतगती ही येणाऱ्या काळातील संशोधन आणि विकास यांसाठीचे प्रमुख स्त्रोत असतील. मात्र इतकेच नव्हे तर यासाठी प्रभावी, कुशल मानवी स्त्रोत तयार करणाऱ्या धोरणांची अधिक गरज असेल. उत्तम उद्योजकांसाठी बाजारपेठेत आपले स्थान तयार करणे, ते टिकून ठेवणे, श्रमोत्पादनाची गती वाढवणे, सुधारित तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आणि आपल्या वस्तूंचे वेगळेपण टिकवून ठेवणे, हया गुरुकिल्ल्या आहेत. भारताच्या स्वहिताच्या दृष्टीने खासगी क्षेत्राची भागीदारी- त्याचा प्रभाव व विश्वास, हे भविष्यातील विकासावरील भाष्य ठरु शकेल.

**संदर्भ :**


१. पी. बालकृष्णन् आणि एम् परमेश्वरन् (२००७): अंडरस्टँडिंग इकॉनॉमिक ग्रोथ इन इंडिया: अ परक्विसिट, आर्थिक आणि राजकीय साप्ताहिक, जुलै १४, पीपी २९१५-२२.

२. ढोलकिया, राजेंद्र एच्. (२०१४): सॅक्रिफाईज रेशो अँड कॉस्ट ऑफ इन्फ्लेशन फॉर द इंडिअन इकॉनॉमी, आइआइएमए वर्किंग पेपर नं. २०१४-०४.

३. हातेकर एन. आणि ए. डोंगरे (२००५): स्ट्रक्चरल ब्रीक्स इन इंडिआज ग्रोथ, इकॉनॉमिक आणि पोलिटिकल साप्ताहिक, एप्रिल २, पीपी १४३२-३५.

४. शिवसुब्रह्मण्यम् एस. (२००४): द नॅशनल इन्कम ऑफ इंडिया इन द ट्वेंटिएथ सेन्चुरी, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.



*(**रविंद्र ढोलाकिया** - भारतीय व्यवस्थापन संस्था, अहमदाबाद येथे १९८५ पासून अर्थशास्त्र या विषयाचे प्राध्यापक. प्रादेशिक आर्थिक विकास, पब्लिक फाइनेंस, हेल्थ इकोनॉमिक्स व् नॅशनल एकाउंटिंग या विषयात विशेष अभ्यास व संशोधन. केंद्र सरकारच्या सहाव्या वेतन आयोगाचे माजी सदस्य. संपर्कासाठी ईमेल-*rdholkia@ iimahd.ernet.in)

**– भाषांतर : जुई देशपांडे**



# भारताची वाटचाल हिंदू आर्थिक वाढ दराकडे चालू आहे का?

– कुमार गौरव, नलिन भारती व प्रियांका सिन्हा

आर्थिक प्रश्नात 'हिंदू वाढ दर' हा काय प्रकार आहे, असा प्रश्न सगळ्यांनाच पडणे शक्य आहे. तर १९९१ पूर्वी म्हणजे उदारीकरणाच्या अगोदर आपला वार्षिक आर्थिक वाढ दर कमी होता. त्याला हिंदू वार्षिक वाढ दर म्हटले जाते. भारतात आर्थिक सुधारणानंतर अहलुवालिया (१९९५), श्रीनिवासन (२००२) व स्टर्न (२००४) , वीरमणी (२००४), तेंडुलकर व भवानी (२००७), पांगारिया (२००८) भगवती व पांगारिया (२०१२) यांनी याबाबत अनेक उदाहरणे समोर मांडली आहेत. भारतावर नेहमी असा आरोप केला जातो की, १९५०-९० या काळात भारताचा औद्योगिकीकरणबाबतचा दृष्टिकोन फार संकुचित होता. स्थूल आर्थिक सुधारणांमुळे भारतातील अर्थकारणाला, अर्थव्यवस्थेला गती मिळाली. जेव्हा आपण औद्योगिकीकरणाकडे व्यापक नजरेतून पाहायला सुरूवात केली तेव्हा बदल घडू लागले. भारतीय अर्थव्यवस्था जास्त वाढीचा दर मिळवेल, असा भारतीय धोरणकर्त्यांचा तो अपेक्षित असलेला अंदाज होता. परंतु उदारीकरणानंतर झालेला विकास हा वादाचा मुद्दा आहे. अर्थतज्ज्ञ असा दावा करतात की, भारताची अर्थव्यवस्था खुली आहे त्यामुळे हिंदू आर्थिक वाढ दराच्या वास्तवापासून आपण खूप दूर आहोत. या शोधनिबंधात आम्ही हे मांडण्याचा प्रयत्न केला आहे की, पीअरसनच्या (आर) सहगुणकाचा थेट संबंध हा एकूण राष्ट्रीय उत्पन्न व भारतातील व्यापारी तूट यांच्याशी आहे.

### वाढीचा दर व हिंदू वाढ दर

आर्थिक वाढ ही एक सातत्यपूर्ण प्रक्रिया असते. यामध्ये अर्थव्यवस्थेतील राष्ट्रीय उत्पादन व उत्पन्न वाढते (टोडारो व स्मिथ २००३), सॅम्युअलसन व नारदॉस (२००७) यांच्या मते आर्थिक वाढ ही देशाच्या एकूण आर्थिक उत्पन्नाचे किंवा राष्ट्रीय उत्पादनाचे विस्तारीकरण दर्शवत असते. स्वातंत्र्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेला अनेक असमतोलांचा सामना करावा लागला, त्यावेळी अर्थातच ब्रिटिशांची वसाहतवादी राजवट होती. त्या काळात भारताचा औद्यौगिक पाया खचलेला होता. पायाभूत सुविधा कमकुवत होत्या. अर्थव्यवस्था साचल्यासारखी झाली होती. म्हणजेच ती प्रवाही नव्हती. ६ एप्रिल १९४८ रोजी भारताने आपला पहिला औद्योगिक जाहीरनामा प्रसिद्ध केला त्यात खासगी व सरकारी अशा दोन्ही उद्योगांना महत्त्व देण्यात आले होते. भारताने नियोजनाचे असे प्रारूप स्वीकारले होते जे पूर्वीच्या रशियासारख्या समाजवादी देशांनी स्वीकारले होते. समाजवादी मध्यवर्ती नियोजनाच्या प्रारूप आराखड्याच्या आधारे भारताने १९५१ पासून नियोजन सुरू केले. तथापि, पहिल्या पंचवार्षिक योजनेत उद्योगांचा विकास झाकोळलेला राहिला. त्यावेळची औद्योगिक वाढ पाहिली तर आपल्याला एक निराशाजनक चित्र दिसते. त्यानुसार पहिल्या पंचवार्षिक योजनेत एकीकडे १९४८-४९ च्या काळात औद्योगिक आस्थापनांचा राष्ट्रीय उत्पन्नातील वाटा ६.६ टक्के होता व त्यात अवघे १ ते ८ टक्के लोक काम करीत होते.

नवीन औद्योगिक धोरण ३० एप्रिल १९५६ मध्ये जाहीर करण्यात आले व मोठ्या प्रमाणात अवजड उद्योग व औद्योगिकीकरण प्रक्रिया सुरू करणे हा त्यामागचा उद्देश होता. नवीन सुधारित औद्योगिक धोरणाचे परिशिष्ट अ व परिशिष्ट ब असे दोन भाग होते व परिशिष्ट अ अनुसार काही उदयोग ही सरकारी मालकीचे व त्यांच्या जबाबदारीचे होते. परिशिष्ट ब मधील उद्योग हे सार्वजनिक व खासगी असे मिश्र स्वरूपाचे होते.

तिसरी योजना ही भावी काळातील फायदे व राष्ट्रीय उत्पन्न तसेच रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवणारी होती. यामध्ये भांडवल विकास व चांगले उद्योग यांच्या विकासावर भर होता. यंत्र निर्मिती उद्योगांच्या विकासाला प्राधान्य होते असे असूनही औद्योगिक उत्पादनाचा वाढीचा दर कमी होता, त्यानंतर तो कमी होत होत साचेबंद झाला, त्यानंतर तीन वर्षे अर्थव्यवस्थेत चढउतार होत राहिले. १९६८-६९ या वर्षात काही प्रमाणात परतफेडीची चिन्हे दिसली त्यानंतर १९६९-७४ या चौथ्या योजनेत औद्योगिक वाढ कमी होऊन उत्पादनाचे लक्ष्य ८ ते १० टक्के असताना ते ३.९ टक्के इतके कमी राहिले. पाचवी पंचवार्षिक योजना १९७४ मध्ये सुरू झाली. स्वयंपूर्णतेवर आधारित वाढ हा त्यामागचा उद्देश होता. त्यात जास्त भर हा लोखंड, पोलाद, लोहेतर धातू, खते, खनिज तेल, यंत्र उभारणी, कोळसा व इतर बाबींवर होता. १९७४-७५ मध्ये औद्योगिक वाढीचा दर २.५ टक्के होता तर १९७५-७६ मध्ये तो ५.७ टक्के झाला, त्यामुळे अर्थव्यवस्थेला दिलासा मिळाला. सहाव्या पंचवार्षिक योजनेला १९६० मध्ये सुरूवात झाली, या योजनेत काही ठोस बदल सुचवण्यात आले होते. यात औद्योगिक परवाने व नियंत्रणे शिथिल करण्यात आली. आयात धोरण पूर्वीपेक्षा अधिक लवचिक करण्यात आले, त्याचा परिणाम म्हणून औद्योगिक उत्पादन वाढले. सातव्या पंचवार्षिक योजनेला १९८५ मध्ये सुरूवात झाली. या योजनेत औद्योगिक वाढीचा दर ८.५ टक्के होता, प्रत्यक्ष वाढीचे उद्दिष्ट ८.४ टक्के होते. या योजनेत विकास, वाढ व उत्पादकता विकासावर भर होता. त्यामुळे औद्योगिक पातळीवर ही पंचवार्षिक योजना यशस्वी झाली.

अहलुवालिया (१९९५) यांनी असे दाखवून दिले की, भारतीय अर्थव्यवस्थेत फार चांगली कामगिरी होऊ शकली नाही. त्यामुळे प्रा. राजकृष्णा यांनी 'द हिंदू रेट ऑफ ग्रोथ' ही संकल्पना मांडली. त्यांचा त्या मागचा हेतू हा अर्थव्यवस्थेतील निराशाजनक कामगिरी दाखवणे हा होता. यातील 'हिंदू' शब्दाला धर्माच्या दृष्टीने विशेष अर्थ नाही. भारताच्या स्वातंत्र्यानंतर स्वीकारण्यात आलेल्या समाजवादी व्यवस्थेवर एक प्रकारे ते प्रतिकूल मत होते. १९५० ते १९८० या काळात अर्थव्यवस्था साचेबंद झाली होती, त्यात वाढ नव्हती. सरासरी एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे या काळात ३.५ टक्के होते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा तक्ता क्रमांक १

**तक्ता क्रमांक-१ १९५० ते १९७९ या काळातील एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ**

| दशके | एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील (जीडीपी) वाढ |
|---|---|
| १९५०-५९ | ३.३ |
| १९६०-६९ | ४.४ |
| १९७०-७९ | २.९ |
| १९५०-७९ | ३.५ |

स्त्रोत- भल्ला (२००९) १९५०-१९७९ दरम्यान लेखकाने मांडलेली आकडेवारी

वीरमणी (२००४) यांच्या मते १९९१-९२ मांडण्यात आलेल्या नव्या आर्थिक धोरणाने भारताची अर्थव्यवस्था बदलली व त्यामुळे हिंदू वाढीचा दर हा ५ ते ६ टक्के इतक्या नव्या उंचीवर जाऊन ठेपला.

### मंदीसदृश वाढीशी संबंधित घटक

भारतीय अर्थव्यवस्थेची वाढीची क्षमता संख्यात्मक व रचनात्मक असा दोन पातळ्यांवर समजून घेता येते. संख्यात्मक घटक समजून घेताना विविध विभागातील वाढीचा दर व एकंदरीतच एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ विचारात घेतली जाते. एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचे विविध विभागांतर्गत झालेल विभाजन हे देशाच्या आर्थिक वाढीचे खरे प्रतिबिंब असते. कृषी क्षेत्र एकूण राष्ट्रीय उत्पन्नात नेहमीच आघाडीवर होते. १९७० पर्यंत कृषी क्षेत्राची चढती कमान होती. १९५०-५१ या काळात कृषी व संबंधित क्षेत्राचा वाटा ५५.३ टक्के होता व भारतातील दोन दशकांच्या नियोजनामुळे कृषी व संबंधित क्षेत्रांच्या वाढीत घट झाली नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे देशातील उद्योग हे अतिशय वाईट अवस्थेतून मार्गक्रमण करीत होते. औद्योगिकीरणाची प्रक्रिया ही सहज व सोपी नव्हती त्यामुळे अर्थव्यवस्थेच्या प्रगतीत तिचा वाटा नगण्य होता.

### आर्थिक वाढीचा कल व सुधारणा

१९९१ मधील पेचप्रसंगाने भारतीय धोरणकर्त्यांना धोरणाच्या पलीकडे जाऊन आयातीला पर्याय शोधताना निर्यातीला उत्तेजन देण्याचे प्रारूप स्वीकारावे लागले. भारतीय अर्थव्यवस्था जगातील आर्थिक सुधारणांशी, धोरणांशी, परदेशी गुंतवणूक

धोरणांशी, व्यापार व विनिमय दराच्या धोरणांशी, करसुधारणांशी, कामगार बाजारपेठ सुधारणा व इतर अनेक बाबींशी जोडली गेली. या सुधारणांचे परिणाम त्यांच्या अंमलबजावणीनंतर लक्षात आले. एकूण राष्ट्रीय उत्पन्न हे १९९१-९२ मध्ये केवळ १.४३ टक्के होते ते १९९२-९३ मध्ये ५.३६ टक्के झाले. यात वेगवेगळ्या क्षेत्रात नेमकी कशी आर्थिक वाढ होत गेली हे परिशिष्ट सारणी ६ मध्ये दिले आहे.

**कृषी व संबंधित क्षेत्र**

भारतीय अर्थव्यवस्था फार मोठ्या प्रमाणात शेतीवर अवलंबून आहे व तिचे महत्व हे ढोबळ राष्ट्रीय उत्पन्नातील व रोजगार निर्मितीतील वाटा यावर मोजता येते. कमी उत्पादन व उत्पादकता यामुळे कृषी क्षेत्रातील एकूण उत्पादनावर परिणाम होतो. कृषीच्या फायद्यांबाबत अकार्यक्षमता हा मुद्दा नेहमी धोरणात व गुंतवणुकीच्या संदर्भात मांडला गेला आहे. कृषी क्षेत्रातील स्थावर गुंतवणूक ही खासगी व सार्वजनिक क्षेत्रातील आहे व ती साचेबंद अवस्थेत आहे (अहलुवालिया १९९३). यात इतर रचनात्मक घटकही कृषी व पूरक क्षेत्रांच्या मंदगतीने होणाऱ्या वाढीस पूरक ठरत आहेत. (परिशिष्ट सारणी २) व (परिशिष्ट सारणी ६)

**उद्योग**

उद्योगांच्या बाबतीत आर्थिक सुधारणा या मूलभूत स्वरूपाच्या होत्या. धोरणात्मक बदलांमुळे उद्योगांना चालना मिळाली. परवानाराज बंद करण्यात आले, अन्यथा अनेक उद्योगांना परवाने लागत होते. आता फार थोड्या उद्योगांना परवाने लागतात. त्यामुळे उद्योगांचा विकास आर्थिक सुधारणांच्या वीस वर्षात झपाट्याने झाला. १९९१-९२ ते २०१०-११ या काळात सरासरी वाढ ही ५.७ टक्के होती व त्याती उच्चांकी वाढ ही २००६-०७ मध्ये १२.१७ टक्के होती. कमीत कमी वाढ ही १९९१-९२ मध्ये ०.३४ टक्के होती (परिशिष्ट सारणी २ व परिशिष्ट सारणी ६)

**सेवा क्षेत्र**

भारताच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात सेवा क्षेत्राचा वेगवेगळ्या प्रकारे वाटा आहे. १९९१-९२ मध्ये तो ४३.९ टक्के होता तो २०१२-१३ मध्ये ५९.२९ टक्के झाला. माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार, बँकिंग सेवा, विमान वाहतूक, करमणूक व इतर अनेक क्षेत्रातील सेवांनी त्यात मोठा वाटा पार पाडला आहे. पण त्यात हेही खरे आहे की, काही विशिष्ट सेवांनीच चांगली कामगिरी केलेली आहे. आज माहिती तंत्रज्ञान आधारित सेवा (आयटीइएस), संदेशवहन व बीपीओ (आउटसोर्सिंग) यासाठी नावाजला जातो. आर्थिक सुधारणानंतर या क्षेत्राची वाढ कृषी व उद्योग यांच्या तुलनेत समान गतीने चालू राहिली. त्यातील वाढीचा दर १९९१-९२ मध्ये ४.९६ टक्के होता तो नंतर वाढतच गेला व अनेक वर्षे तो दोन अंकी होता.


**भारतीय अर्थव्यवस्थेची कामगिरी**

भारतीय अर्थव्यवस्था अनेक अवस्थातून गेली आहे. १९८० पूर्वी त्यात साचेबंदपणा होता पण १९९१ मध्ये पूर्ण सुधारणा झाल्यानंतर अर्थव्यवस्था प्रवाही झाली. १९९० मध्ये जो पतपेचप्रसंग निर्माण झाला होता त्यामुळे भारताला आर्थिक सुधारणांची कास धरावी लागली. कृषी व पूरक व्यवसाय, उद्योग व सेवा यांच्या वाढीच्या दराची मध्यम पदे परिशिष्ट सारणी ३ मध्ये दाखवली आहेत. त्यावरून भारतीय अर्थव्यवस्थेचे प्रत्येक क्षेत्रानुसार चित्र अधिक स्पष्टपणे उभे राहते.

बाह्य घटक- आतापर्यंत आपण आर्थिक वाढीवर परिणाम करणाऱ्या देशांतर्गत घटकांची चर्चा केली. पण अर्थव्यवस्थेच्या विश्लेषणाची चर्चा बाह्य घटकांचा त्यावर होणारा परिणाम लक्षात घेतल्याशिवाय परिपूर्ण होऊ शकत नाही. यामध्ये आयात व निर्यात हे दोन घटक महत्वाचे असतात. व्यापार समतोल म्हणजे निर्यात-आयात (एक्स-एम) हा आकडा गेल्या अनेक काळापासून ऋण आहे. आयात-निर्यात खात्यात व्यापारी तूट आहे. परिशिष्ट सारिणी ४ मध्ये दिसते त्यानुसार व्यापारी तूट मोठी आहे. ढोबळ राष्ट्रीय उत्पन्न व व्यापारी खात्याचा समतोल यांची १९९१-१२ ते २०१०-११ पर्यंतची आकडेवारी त्या सारणीत दिली आहे.

एकूण राष्ट्रीय उत्पन्न व व्यापारी तूट यांचा संबंध दाखवणारा निर्देशांक ०.५८ आहे. याचा अर्थ त्यात काही प्रमाणात सकारात्मक संबंध होता. या सहनिर्देशांकातून असे दिसते की, जेव्हा देशाचे एकूण राष्ट्रीय उत्पन्न वाढले त्यावेळी निर्यात ही आयातीपेक्षा जास्त दिसत नाही, त्यात तूट वाढलेली आहे. हे वाढीचे दर हे आर्थिक सुधारणांमुळे आयात वाढल्याचे दाखवतात, पण त्याचा आपल्या वाढीच्या दरात मोठा वाटा आहे. १९९१-२००० या काळात जी वाढ आपण मिळवली ती १९९१ मध्ये व्यापारी उदारीकरण झाले त्यापेक्षा जास्त दिसून येते. आकृती क्रमांक १ असे दाखवते की, ढोबळ राष्ट्रीय उत्पन्नाचा वाढीचा दर व व्यापारी तूट यांचा एकमेकांशी कसा संबंध आहे. मूळ अक्षावर व्यापारी तूट दाखवली आहे, ती अमेरिकी दशलक्ष डॉलरवर आहे, दुसऱ्या उभ्या अक्षावर एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ टक्केवारीत दाखवली आहे. समांतर अक्षावर १९९१-९२ ते २०१०-११ ही वर्षे दाखवली आहेत.

**आकृती क्रमांक १- ढोबळ राष्ट्रीय उत्पन्नाचा दर व व्यापारी तूट १९९१-९२ ते २०१०-११**




*स्त्रोत परिशिष्ट सारिणी ४ सध्याची वाढीची स्थिती

भारतीय अर्थव्यवस्था सध्या अनेक समस्यांना तोंड देत आहे व अर्थमंत्रालयाने व आर्थिक कामकाज विभागाने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीवरून गेल्या दोन वर्षात ते सिद्धही होत आहे. २०१०-११ ते २०१२-१३ या दरम्यान जी तिमाही माहिती कृषी व पूरक व्यवसाय, उद्योग व सेवा क्षेत्र याबाबत देण्यात आली आहे ती परिशिष्ट सारिणी ५ मध्ये दिली आहे. कृषी व पूर व्यवस्यांनी फार वाईट कामगिरी केलेली दिसते व २०१०-११ मध्ये या क्षेत्रातील दर नीचांकी १.२ टक्के इतका दुसऱ्या तिमाहीत होता तो तिसऱ्या तिमाहीत ११ टक्के झाला. या काळात सरासरी वाढीचा दर हा ३.४ टक्के होता. औद्योगिक क्षेत्रातही धोरणकर्त्यांसाठी चिंतेचे वातावरण होते त्यात सरकारी उद्योगांचा वाढीचा दर हा २०१०-११ च्या पहिल्या तिमाहीत ४.४ टक्के होता तर २०१२-१३ च्या दुसऱ्या तिमाहीत ही तो तेवढाच कायम राहिला. तथापि सेवा क्षेत्रात सातत्याने वाढ दिसून येते सरासरी वाढ ही ८.६ टक्के होती तर ढोबळ राष्ट्रीय उत्पन्नाच्या हा दर ६.९ टक्के होता.

**निष्कर्ष :**

भारतीय अर्थव्यवस्थेची कामगिरी पाहता ती आर्थिक सुधारणानंतर चांगली झाली हे खरे आहे. परंतु, आशियायी विकास बँकेने जे सुधारित अंदाज दिले आहेत त्यांचा व इतर संस्थांनी दिलेल्या अंदाजाचा विचार करता भारतीय अर्थव्यवस्था मंद गतीकडे झुकत आहे. कृषी व कृषी पूरक व्यवसाय अजूनही दोलायमान स्थितीत आहे. त्याच्या वाढीचा दर हा सतत बदलत आहे. मध्य (मीन) ३.०१ टक्के पासून ते सुधारणोत्तर काळातील ४.०९ टक्क्यांपर्यंत तो राहिला आहे. औद्योगिक वाढीतील मध्यमा ही १९९१-९२ ते २०१२-१३ दरम्यान ६.५ टक्के ते ३.१६ टक्के दरम्यान राहिली आहे सेवा क्षेत्रात १९९१-९२ ते २०१२-१३ या काळात वाढीच्या मध्यमेचा (मीन) आकडा ८.२४ टक्के होता. नमुना वाढीच्या दरापासून भरकटण्याचे प्रमाण १.९३ टक्के म्हणजे सर्वात कमी होते. याचा अर्थ भारतासाठी सेवा क्षेत्रातील कामगिरी चांगली झाली आहे. आर्थिक सुधारणांच्या व व्यापारी उदारीकरणाच्या निर्णयानंतर भारतीय अर्थव्यवस्थेचे भवितव्य ठरवण्यात आयात-निर्यात यासारखे बाह्य घटक महत्वाचे ठरले ज्यात व्यापारी समतोल म्हणजे आयात-निर्यात समतोल हा एक्स-एम ऋण होता व सुधारणानंतरच्या काळातील त्याची स्थिती आणखी वाईट झाली. परस्परसबंध निर्देशांक म्हणजे एकूण राष्ट्रीय उत्पन्न व व्यापारी तूट यातील संबंध दर्शवणारा अंक ०.५८ होता, त्यात एकूण राष्ट्रीय उत्पन्न व व्यापारी तूट यात काही काळात सकारात्मक संबध दिसतो. १९९१ च्या सुरूवातीला म्हणजे १९९१ मध्ये व्यापारी तूट व एकूण राष्ट्रीय उत्पन्न यातील संबंध मध्यम स्वरूपाचे होते त्यांच्यातील गुणोत्तर कमी होते पण १९९१ नंतर हा आकडा म्हणजे गुणोत्तर वाढले (सिन्हा-भारती २०१२) परिशिष्ट सारिणी ४ मधील माहितीच्या आधारे असे म्हणता येते की, एकूण राष्ट्रीय उत्पन्न वाढले तरी निर्यात वाढलेली दिसत नाही उलट आयात वाढलेली दिसते. आयातीच्या तुलनेत निर्यातीचा प्रतिसाद कमजोर होता. सुधारणांतर वाढीच्या सांख्यिकीचा विचार केला तर १९९१-९२ ते २०१२-१३ या काळात तो हिंदू वाढ दरापेक्षा मध्यापासून दर जाणारा म्हणजे ३.५ टक्के होता. विभागीय वाढ दरांची मध्यमा काढायची तर उद्योग क्षेत्रात ६.५ टक्के व सेवा क्षेत्रात ती ८.२ टक्के होती. याचा अर्थ ती हिंदू वाढीच्या दरापेक्षा खूप जास्त आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे कृषी व पूरक व्यवसाय यांच्यातील वाढीच्या दराची मध्यमा याच काळात ३.०१ टक्के आहे. ती मात्र हिंदू वाढ दरापेक्षा कमी हे मान्य करावे लागते. कृषी व पूरक व्यवसाय वाढीच्या दरात हिंदू वाढ दराच्या पातळीला आले आहेत किंबहुना त्यापेक्षा खाली चालले आहेत. याचा अर्थ त्यांची स्थिती रामभरोसे आहे. सुधारणोत्तर काळातील वाढीच्या कामगिरीतील ही काही आव्हाने आहेत. विभागीय पातळीवर सेवा क्षेत्राने मोठी कामगिरी केली आहे. सेवा क्षेत्र हे खरेतर कमी मनुष्यबळावर अवलंबून

असताना त्यांनी ही कामगिरी केली. भारतीय अर्थव्यवस्थेत चढउतार येत आहेत व सुधारणोत्तर सांख्यिकी आकडे त्याची साक्ष देतात. भारतीय अर्थव्यवस्था खचितच हिंदू आर्थिक वाढ दराच्या पातळीला जाणार नाही अशी खात्री आम्हाला वाटते उलट त्यापेक्षा आर्थिक वाढीचा दर जास्तच राहील. भारताचा आर्थिक वाढीचा दर हा हिंदू आर्थिक दराच्या पातळीपर्यंत खाली जाईल, असे म्हणणे अतिशयोक्तीचे होईल.

**संदर्भसूची :**


एडीबी (२०१३)- आशिया विकास बँक आढावा २०१३, सुधारित , गव्हर्नन्स अँड पब्लिक सर्व्हिस डिलेव्हरी, आशियायी विकास बँक http://www.adb.org/sites/default/files/pub/2013/ado2013-update.pdf.

अहलुवालिया मोंतेक एस. (१९९३)- इंडियाड इकॉनॉमित रिफॉर्म्स http://www.planningcommission.gov.in/hindi/aboutus/speech/spemsa/msa012.pdf.

अहलुवालिया मोंतेक एस. (१९९५)- फर्स्ट राजकृष्णा मेमिरियल लेक्चर १९९५- इकॉनॉमिक रिफॉर्म्स फॉर नाइन्टीज http://planningcommission.gov.in/aboutus/speech/spemsa/msa033.pdf.

अहलुवालिया मोंतेक एस. (२००२)- इकॉनॉमित रिफॉर्म्स इन इंडिया सिन्स १९९१- हॅज ग्रॅज्युअलिझम वर्कड्‌ जर्नल अफ इकॉनॉमिक परस्पेक्टिव्ह, व्हॉल्यूम १६ नंबर ३ (समर)

भगवती,जे व पांगारिया.ए., (२०१२)- इंडियाज ट्राइस्ट विथ डेस्टिनी- डिबन्कींग मिथ्स दॅट अंडरमाइन प्रोग्रेस अँड अड्रेसिंग न्यू चॅलेंजेस -नॉइडा -कॉलिन्स बिझीनेस.

भल्ला सुरजित एस. (२००९)- इंडिया इकॉनॉमिक ग्रोथ १९५०-२००८- फॅक्टस अँड बिलीफ्स, पझल्स अँड पॉलिसिज, न्यू दिल्ली - ऑक्सस रीसर्च अँड इनव्हेस्टमेंट.

डाटाबुक फॉर डीसीएच (२०१३) डाटा फॉर यूज ऑफ डेप्युटी चेअरमन, प्लानिंग कमिशन गव्हर्नमेंट अफ इंडिया http://planningcommission.nic.in/data/datatable/1705/databook_dch_160511.pdf.

इकॉनॉमिक आउटलुक २०१३-१४- हायलाइटस इकॉनॉमिक अडव्हायजरी कौन्सिल टू पीएम, गव्हर्नमेट ऑफ इंडिया http://eac.gov.in/reports/economicoutlook_201314_highlights.pdf.

फाइव्ह इयर्स प्लान्स, प्लानिंग कमिशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, न्यू दिल्ली

इंडस्ट्रीयल पॉलिसी (१९९१), मिनिस्ट्री ऑफ फायनान्स, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया, न्यू दिल्ली.

मोहन राकेश (२००८), द ग्रोथ रेकॉर्ड ऑफ इंडियन इकॉनॉमी, १९५०-२००८- अ स्टोरी

ऑफ सस्टेन्ड सेव्हिंग्ज अँड इनव्होस्टमेंट http://rbidocs.rbi.org.in/rdocs/Speeches/PDFs/83118.pdf.

मंथली इकॉनॉमिक रिपोर्ट (२०१३), मिनिस्ट्री ऑफ फायनान्स,डिपार्टमेंट ऑफ इकॉनॉमिक अफेअर्स (इकॉनॉमिक डिव्हीजन) www.finmin.nic.in/stats_data/monthly_economic_report/2013/indjan13.pdf.

पांगारिया, ए (२००८), इंडिया- द इमर्जंट जायंट, न्यू दिल्ली, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

सॅम्युअलसन पॉल ए अँड नॉर्दन्स. विल्यम डी. (२००७) इकॉनॉमिक्स- एटीन्थ एडिशन, न्यूदिल्ली, टाटा माकग्रॉ हिल.

श्रीनिवासन टी.एन (२००२) इकॉनॉमिक रिफॉर्म्स अँड ग्लोबल इंटिग्रेशन अज ऑन स्टर्न, एन (२००४), अक्सिलरेटिंग डेव्हलपमेंट, फ्रान्सिस बोरग्युनॉन अँड बोरिस प्लेस्कोविक (एडिशन), वर्ल्ड बँक पेज ३१.

सिन्हा प्रियांका व भारती नलिन, हॅज ट्रेड अँड टेलिकॉम पॉलिसी रिफॉर्म्स हेल्प्ड इंडिया इन गेटिंग जॉबस्- सम एव्हिडन्स फ्रॉम आयटीइएस ग्रोथ. पेपर प्रेझेन्टेड अट नाइन्टिफिफ्थ इंडियन इकॉनॉमिक असोसिएशन कॉन्फरन्स, गीताम युनिव्हर्सिटी २९ डिसेंबर २०१२

तेंडुलकर एस.डी अँड भवानी टी.ए. (२००७) अंडरस्टँडिंग रिफॉर्म्स- पोस्ट १९९१ इंडिया, न्यू दिल्ली, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस.

तोडारो मायकेल पी. अँड स्मिथ, स्टीफन सी (२००३), इकॉनॉमिक डेव्हलपमेंट एट्थ् एडिशन न्यू दिल्ली, पिअर्सन.

वीरमणी, अरविंद (२००४)- इंडियाज इकॉनॉमिक ग्रोथ फ्रॉम सोशालिस्ट रेट ऑफ ग्रोथ टू भारतीय रेट ऑफ ग्रोथ, इंडियन कौन्सिल फॉर रीसर्च ऑन इंटरनॅशनल इकॉनॉमिक रिलेशन्स, फेब्रुवारी.

**परिशिष्ट: सारिणी १** **भारतातील विभागनिहाय वाढीचे सूत्र**

| सांख्यिकी | सूत्र | अन्वयार्थ |
|---|---|---|
| मध्य | $\sum x/N$ | $\sum$= बेरीज (योग) |
| नमुना विचरण ($S^2$) | $\sum(x\text{-Mean})^2/N\text{-}1$ | √=वर्गमूळ |
| नमुना प्रमाणित विचलन (एस) | $\sqrt{\sum(x\text{-Mean})^2/N\text{-}1}$ | x=चलांच्या विविध किंमती |
| | | N= माहिती संचाचा नमुना |
| नमुना पियर्सन सहसंबंध सहगुणक(आर) | $r = \frac{n(\sum xy) - (\sum x)(\sum y)}{\sqrt{[n\sum x^2 - (\sum x)^2][n\sum y^2 - (\sum y)^2]}}$ | n=मूल्य संख्या<br>x=चलांचा संच<br>Y=चलांचा दुसरा संच<br>$\sum xy$=क्ष व य यांच्या गुणाकाराची बेरीज<br>$\sum x$=पहिल्या चल संचाची बेरीज<br>$\sum y$= दुसऱ्या चलं संचाची बेरीज<br>$\sum x^2$=पहिल्या चलांच्या संचाच्या वर्गांची बेरीज<br>$\sum y^2$= दुसऱ्या चलांच्या संचाच्या वर्गांची बेरीज |

*स्त्रोत- लेखक

**परिशिष्ट सारिणी २** **वाढीची वर्गनिहाय माहिती**

| कृषी व पूरक | निष्कर्ष |
|---|---|
| बेरीज | ६६.४१ |
| मध्य | ३.०१८६३६३६४ |
| $\sum$(X-मध्य)$^2$ | ३५२.५४३०५९१ |
| नमुना विचरण (एस$^2$) | १६.७८७७६४७२ |
| नमुना प्रमाणित विचलन (एस) | ४.०९७२८७४८३ |
| उद्योग | निष्कर्ष |
| बेरीज | १४३.९३ |
| मध्य | ६.५४२२७२७३ |
| $\sum$(X-मध्य)$^2$ | २१०.६४१७८६ |
| नमुना विचरण (एस$^2$) | १०.०३०५६१३ |
| नमुना प्रमाणित विचलन (एस) | ३.१६७१०६१३ |
| सेवा | निष्कर्ष |
| बेरीज | १८१.३१ |
| मध्य | ८.२४१३६३६४ |
| $\sum$(X-मध्य)$^2$ | ७८.२३१२५९१ |
| नमुना विचरण (एस$^2$) | ३.७२५२९८०५ |
| नमुना प्रमाणित विचलन (एस) | १.९३०१०३१२ |
| एकूण राष्ट्रीय उत्पन्न | निष्कर्ष |
| बेरीज | १४५.७ |
| मध्य | ६.६२२७२७ |
| $\sum$(X-मध्य)$^2$ | ९२.०४०४४ |
| नमुना विचरण (एस$^2$) | ४.३८२८७८ |
| नमुना प्रमाणित विचलन (एस) | २.०९३५३२ |

*स्त्रोत- परिशिष्ट सारणी ६ मध्ये उपलब्ध माहितीचे गणन

**परिशिष्ट सारणी ३**

**१९९१-९२ ते २०१२-१३ या काळातील वाढीच्या दरातील मध्य, नमुना विचरण, नमुना प्रमाणित विचलन**

| क्षेत्र | मध्य वाढ दर | नमुना विचरण (एस२) | नमुना प्रमाणित विचलन (एस) |
|---|---|---|---|
| कृषा व पूरक ($X_१$) | ३.०१८६३६३६४ | १६.७८७७६४७ | ४.०९७२८७४८३ |
| उद्योग ($X_२$) | ६.५४२२७२७३ | १०.०३०५६१३ | ३.१६७१०६१३ |
| सेवा ($X_३$) | ८.२४१३६३६४ | ३.७२५२९८०५ | १.९३०१०३१२ |
| एकूण राष्ट्रीय उत्पन्न ($X_४$) | ६.६२२७२७ | ४.३८२८७८ | २.०९३५३२ |

*स्त्रोत- लेखकांनी केलेले गणन

**परिशिष्ट सारणी-४**

**व्यापार समतोल व एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ**

| वर्ष | एकूण राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ[१] | व्यापार समतोल (यूएस एम डॉलर)[२] |
|---|---|---|
| १९९१-९२ | १.४३ | -१५४६ |
| १९९२-९३ | ५.३६ | -३३४५ |
| १९९३-९४ | ५.६८ | -१०६८ |
| १९९४-९५ | ६.३९ | -२३२४ |
| १९९५-९६ | ७.२९ | -४८८१ |
| १९९६-९७ | ७.९७ | -५६६३ |
| १९९७-९८ | ४.३ | -६४७८ |
| १९९८-९९ | ६.६८ | -९१७१ |
| १९९९-०० | ७.५९ | -१२८४९ |
| २०००-०१ | ४.३ | -५८९९ |
| २००१-०२ | ५.५२ | -७५८६ |
| २००२-०३ | ३.९९ | -८६९३ |
| २००३-०४ | ८.०६ | -१४३०६ |
| २००४-०५ | ६.९७ | -२७९८१ |
| २००५-०६ | ९.४८ | -४६०७५ |
| २००६-०७ | ९.५७ | -५९३२१ |
| २००७-०८ | ९.३२ | -८८५२२ |
| २००८-०९ | ६.७२ | -११८४०१ |
| २००९-१० | ८.५९ | -१०९६२२ |
| २०१०-११ | ९.३२ | -११८६३३ |

- स्त्रोत १ डीसीएच २०१३ माहिती पुस्तिका, डाटा फॉर युज ऑफ डेप्युटी चेअरमन प्लानिंग कमिशन, गव्हर्नमेंट ऑफ इंडिया (नियोजन आयोगाचे उपाध्यक्ष वापरत असलेली माहिती.)
- आर्थिक सर्व्हेक्षण २०१२-१३ अर्थ मंत्रालयाचा आर्थिक कामकाज विभाग, भारत सरकार, दिल्ली.

**परिशिष्ट सारणी-५**

**तिमाही वाढीचा दर**

| वर्ष | तिमाही | कृषी व पूरक | उद्योग | सेवा | राष्ट्रीय उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|
| २०१०-११ | क्यू१ | ३.१ | ८.३ | १० | ८.५ |
| | क्यू२ | ४.९ | ५.७ | ९.१ | ७.६ |
| | क्यू३ | ११ | ७.६ | ७.७ | ८.२ |
| | क्यू४ | ७.५ | ७ | १०.६ | ९.२ |
| २०११-१२ | क्यू१ | ३.७ | ५.६ | १०.२ | ८ |
| | क्यू२ | ३.१ | ३.७ | ८.८ | ६.७ |
| | क्यू३ | २.८ | २.५ | ८.९ | ६.१ |
| | क्यू४ | १.७ | १.९ | ७.९ | ५.३ |
| २०१२-१३ | क्यू१ | २.९ | ३.६ | ६.९ | ५.५ |
| | क्यू२ | १.२ | २.८ | ७.२ | ५.३ |
| | सरासरी[१] | ३.४ | ४.४ | ८.६ | ६.९ |

- स्त्रोत- मासिक आर्थिक अहवाल (२०१३) अर्थ मंत्रालय १ लेखकांनी केलेले

**Annex Table 6**

**Deviations & Squared Deviations from Mean and Deviations from standard deviation of Growth Rates of Agriculture & Allied, Industry, Service Sector and GDP from 1991-92 to 2012-13**

| Year | Agri. & Allied# ($X_1$) | ($X^1$-Mean) | ($X^1$-Mean)$^2$ | ($X^1$-S) | Industry# ($X_2$) | ($X_2$-Mean) | ($X_2$-Mean)$^2$ | ($X_2$-S) | Services# ($X_3$) | ($X_3$-Mean) | ($X_3$-Mean)$^2$ | ($X_3$-S) | GDP# ($X_4$) | ($X^4$-Mean) | ($X_4$-Mean)$^2$ | ($X_4$-S) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1991-92 | -1.95 | -4.96864 | 24.687347 | -6.04729 | 0.34 | -6.20227 | 38.468187 | -2.82711 | 4.69 | -3.55136 | 12.61218368 | 2.759897 | 1.43 | -5.19273 | 26.96441653 | -0.66353 |
| 1992-93 | 6.65 | 3.631364 | 13.186802 | 2.552713 | 3.22 | -3.32227 | 11.037496 | 0.052894 | 5.69 | -2.55136 | 6.509456405 | 3.759897 | 5.36 | -1.26273 | 1.594480165 | 3.266468 |
| 1993-94 | 3.32 | 0.301364 | 0.09082 | -0.77729 | 5.5 | -1.04227 | 1.0863324 | 2.332894 | 7.38 | -0.86136 | 0.741947314 | 5.449897 | 5.68 | -0.94273 | 0.888734711 | 3.586468 |
| 1994-95 | 4.72 | 1.701364 | 2.8946382 | 0.622713 | 9.16 | 2.617727 | 6.8524961 | 5.992894 | 5.84 | -2.40136 | 5.766547314 | 3.909897 | 6.39 | -0.23273 | 0.054161983 | 4.296468 |
| 1995-96 | -0.7 | -3.71864 | 13.828256 | -4.79729 | 11.29 | 4.747727 | 22.540914 | 8.122894 | 10.11 | 1.868636 | 3.49180186 | 8.179897 | 7.29 | 0.667273 | 0.445252893 | 5.196468 |
| 1996-97 | 9.92 | 6.901364 | 47.62882 | 5.822713 | 6.39 | -0.15227 | 0.023187 | 3.222894 | 7.53 | -0.71136 | 0.506038223 | 5.599897 | 7.97 | 1.347273 | 1.815143802 | 5.876468 |
| 1997-98 | -2.55 | -5.56864 | 31.009711 | -6.64729 | 4.01 | -2.53227 | 6.4124052 | 0.842894 | 8.93 | 0.688636 | 0.474220041 | 6.999897 | 4.3 | -2.32273 | 5.395061983 | 2.206468 |
| 1998-99 | 6.32 | 3.301364 | 10.899002 | 2.222713 | 4.15 | -2.39227 | 5.7229688 | 0.982894 | 8.28 | 0.038636 | 0.001492769 | 6.349897 | 6.68 | 0.057273 | 0.003280165 | 4.586468 |
| 1999-00 | 2.67 | -0.34864 | 0.1215473 | -1.42729 | 5.96 | -0.58227 | 0.3390415 | 2.792894 | 11.19 | 2.948636 | 8.694456405 | 9.259897 | 7.59 | 0.967273 | 0.935616529 | 5.496468 |
| 2000-01 | -0.01 | -3.02864 | 9.1726382 | -4.10729 | 6.03 | -0.51227 | 0.2624233 | 2.862894 | 5.37 | -2.87136 | 8.244729132 | 3.439897 | 4.3 | -2.32273 | 5.395061983 | 2.206468 |
| 2001-02 | 6.01 | 2.991364 | 8.9482564 | 1.912713 | 2.61 | -3.93227 | 15.462769 | -0.55711 | 6.88 | -1.36136 | 1.85331095 | 4.949897 | 5.52 | -1.10273 | 1.216007438 | 3.426468 |
| 2002-03 | -6.6 | -9.61864 | 92.518165 | -10.6973 | 7.21 | 0.667727 | 0.4458597 | 4.042894 | 6.97 | -1.27136 | 1.616365496 | 5.039897 | 3.99 | -2.63273 | 6.931252893 | 1.896468 |
| 2003-04 | 9.05 | 6.031364 | 36.377347 | 4.952713 | 7.32 | 0.777727 | 0.6048597 | 4.152894 | 8.06 | -0.18136 | 0.032892769 | 6.129897 | 8.06 | 1.437273 | 2.065752893 | 5.966468 |
| 2004-05 | 0.18 | -2.83864 | 8.0578564 | -3.91729 | 9.81 | 3.267727 | 10.678042 | 6.642894 | 8.13 | -0.11136 | 0.01240186 | 6.199897 | 6.97 | 0.347273 | 0.120598347 | 4.876468 |
| 2005-06 | 5.14 | 2.121364 | 4.5001837 | 1.042713 | 9.72 | 3.177727 | 10.097951 | 6.552894 | 10.91 | 2.668636 | 7.121620041 | 8.979897 | 9.48 | 2.857273 | 8.164007438 | 7.386468 |
| 2006-07 | 4.16 | 1.141364 | 1.302711 | 0.062713 | 12.17 | 5.627727 | 31.671314 | 9.002894 | 10.06 | 1.818636 | 3.307438223 | 8.129897 | 9.57 | 2.947273 | 8.686416529 | 7.476468 |
| 2007-08 | 5.8 | 2.781364 | 7.7359837 | 1.702713 | 9.67 | 3.127727 | 9.7826779 | 6.502894 | 10.27 | 2.028636 | 4.115365496 | 8.339897 | 9.32 | 2.697273 | 7.275280165 | 7.226468 |
| 2008-09 | 0.09 | -2.92864 | 8.576911 | -4.00729 | 4.44 | -2.10227 | 4.4195506 | 1.272894 | 9.98 | 1.738636 | 3.022856405 | 8.049897 | 6.72 | 0.097273 | 0.009461983 | 4.626468 |
| 2009-10 | 0.81 | -2.20864 | 4.8780746 | -3.28729 | 9.16 | 2.617727 | 6.8524961 | 5.992894 | 10.5 | 2.258636 | 5.101438223 | 8.569897 | 8.59 | 1.967273 | 3.870161983 | 6.496468 |
| 2010-11 | 7.94 | 4.921364 | 24.21982 | 3.842713 | 9.16 | 2.617727 | 6.8524961 | 5.992894 | 9.75 | 1.508636 | 2.275983678 | 7.819897 | 9.32 | 2.697273 | 7.275280165 | 7.226468 |
| 2011-12 | 3.65 | 0.631364 | 0.39862 | -0.44729 | 3.49 | -3.05227 | 9.3163688 | 0.322894 | 8.2 | -0.04136 | 0.00171095 | 6.269897 | 6.21 | -0.41273 | 0.170343802 | 4.116468 |
| 2012-13 | 1.79 | -1.22864 | 1.5095473 | -2.30729 | 3.12 | -3.42227 | 11.711951 | -0.04711 | 6.59 | -1.65136 | 2.72700186 | 4.659897 | 4.96 | -1.66273 | 2.764661983 | 2.866468 |

Source: Authors calculations based on data book for DCH (2013, Planning Commission, Government of India

*(**नलिन भारती** - भारतीय तंत्रज्ञान संस्था पटना येथील मानव्यशास्त्र व सामाजिक शास्त्र विभागाचे सह प्राचार्य. संपर्कासाठी ईमेल- nalinbharti@gmail.com, **सह लेखक कुमार गौरव** - भारतीय तंत्रज्ञान संस्था पटना येथील मानव्यशास्त्र व सामाजिक शास्त्र विभागात जेष्ठ (डॉक्टरल) अभ्यासक. संपर्कासाठी ईमेल- kumargaurav@iitp.ac.in, gauravsharan72@gmail.com, **सहलेखिका- प्रियांका सिन्हा** - भारतीय तंत्रज्ञान संस्था पटना येथील मानव्यशास्त्र व सामाजिक शास्त्र विभागात जेष्ठ (डॉक्टरल) अभ्यासक. संपर्कासाठी ईमेल-priyankasinha04@iitp.ac.in, prnksinha.04@gmail.com)*

**– भाषांतर- राजेंद्र येवलेकर**



# उत्पादक रोजगार आणि शिक्षणाचे सक्षमीकरण: भारतीय युवकांसाठी विशेष कार्यक्रम

**– राघवेंद्र झा**

''बरेच श्रम आणि वेळ खर्च करून एखादी व्यक्ती जेव्हा शिक्षण घेते, तेव्हा तिची तुलना एखादया महागड्या यंत्राबरोबर होऊ शकते. शिक्षणामुळे व्यक्ती जे काम करायला शिकते त्यातून त्या व्यक्तीला, सर्वसाधारण कामगाराला जी मजुरी देण्यात येते त्यापेक्षा कितीतरी अधिक मोबदला मिळतो. एवढेच नव्हे तर त्याच्या शिक्षणावर झालेला खर्चही भरून निघतो.'' (ॲडम स्मिथ, १९०४(१७७६), पृष्ठ क्रमांक १०१)

'माणसामध्ये केलेली गुंतवणूक हे सर्वात मौल्यवान असे भांडवल आहे.' (आल्फ्रेड मार्शल, १९६१(१८९०) आवृत्ती पृष्ठ क्रमांक ५६४).

साधारणपणे १७७६ पासून अर्थशास्त्राने शिक्षणाला महत्त्व देण्यास सुरुवात केली. शिक्षण हाच ॲडम स्मिथ यांच्या कामाचा मुख्य आधारस्तंभ होता. तर अल्फ्रेड मार्शल या १९व्या शतकातील एका महत्त्वाच्या अर्थशास्त्रज्ञानेदेखील शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. या पार्श्वभूमीवर विसाव्या शतकातील विकासाच्या प्रारूपांमध्ये मानवी भांडवलाचा विषय हद्दपार केलेला नसला तरी त्याला गौणत्व देण्यात आले आहे, ही आधुनिक अर्थशास्त्राच्या इतिहासातील एक मोठी विचित्र गोष्ट मानावी लागेल. यामध्ये हॅरड-डोमर आणि नव अभिजात परंपरेच्या प्रारूपांचा समावेश आहे. साधारणपणे १९८०च्या दशकाच्या शेवटी शेवटी आणि १९९०च्या दशकाच्या सुरुवातीला त्यावेळी अस्तित्वात असलेल्या विकासाच्या प्रारूपांचा अपुरेपणा अर्थशास्त्रज्ञांना जाणवू लागला. वेगवेगळ्या देशांमध्ये असलेल्या विकासाच्या दरातील आणि दरडोई उत्पन्नातील तफावत स्पष्ट करताना अर्थशास्त्रज्ञांना श्रम, भांडवल आणि तंत्रज्ञानावर भर द्यावा लागत असे. याच काळात आर्थिक विकासासाठी मानवी भांडवलाची प्रारूपे लोकप्रिय होऊ लागली आणि तत्कालीन प्रारूपातील त्रूटी जाणवू लागल्या. 'एकदा का आपण आर्थिक विकासाचा विचार करू लागलो तर मानवी भांडवलाशिवाय दुसऱ्या कशाविषयीही विचार करणे कठीण असते', असे मत नोबेल पुरस्कार प्राप्त रॉबर्ट ल्युकस यांनी १९८८ मध्ये व्यक्त केले होते.

या सैद्धांतिक विचाराला मोठया प्रमाणावर प्रत्यक्ष अवलोकन आणि प्रयोगाची जोड मिळाली. २००१ मध्ये बॅरो यांनी एक प्रयोग केला. यामध्ये १९६५ ते १९९५ या काळातील १०० देशांमधील काही नमुन्यांचा अभ्यास केला गेला. शिक्षण क्षेत्रातील यशस्वी कामगिरीचा दरडोई सकल देशांतर्गत उत्पन्नामध्ये वाढ होण्यावर महत्त्वपूर्ण परिणाम होतो, असे यावरून दिसून आले. विशेषत: पैशाच्या रूपातील पारंपरिक भांडवली गुंतवणुकीपेक्षा परिवर्तनशील

अशा मानवी भांडवलामध्ये केलेल्या गुंतवणुकीचा जास्त परिणाम होतो, असेही या अभ्यासावरून दिसून आले आहे. एखादे वर्ष जास्त घेतलेल्या शिक्षणामुळे दरडोई सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या दरात (*१) ०.४४ टक्के वाढ होते आणि शिक्षणात केलेल्या गुंतवणुकीच्या सामाजिक मोबदल्यात ७ टक्के वाढ होते. विशेषत: विज्ञान आणि गणिताच्या शिक्षणाने अधिक चांगले परिणाम, या अभ्यासावरून दिसून आले आहेत. महिलांनाही शिक्षण देऊन पुरेसे सक्षम करणे आवश्यक आहे. आर्थिक विकास वेगाने कसा होईल, हा संशोधनाचा महत्त्वाचा विषय झाला तर अशा विकासासाठी शिक्षण हाच महत्त्वाचा मार्ग असू शकतो, यावरही एकमत झाले. यामागील मुख्य संदेश स्पष्ट आहे तो म्हणजे, मध्यम आणि दीर्घकालीन आर्थिक विकासासाठी भांडवलामध्ये गुंतवणूक करणे. ही बाब जितके महत्त्वाचे आहे तितकीच शिक्षणामध्ये गुंतवणूक करणेही महत्त्वाचे आहे, हा ॲडम स्मिथ आणि आल्फ्रेड मार्शल यांचा दृष्टिकोन योग्यच होता.

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आर्थिक विकासाच्या नियोजन प्रक्रियेत वर उल्लेख केलेल्या मानवी भांडवलाचा संचय करण्याबाबत कायमच उपेक्षा करण्यात आली आणि भांडवल, श्रम आणि काही प्रमाणात तंत्रज्ञान या मुद्दयांवरच विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले.

देशाचा आर्थिक विकास झपाटयाने व्हायचा असेल तर आता मात्र भारतीय नियोजनकारांनी शिक्षणावरील खर्च ही अत्यावश्यक गुंतवणूक आहे, असा दृष्टिकोन स्वीकारण्याची वेळ आली आहे. याशिवाय आर्थिक विकासाला चालना देण्याबरोबरच, विज्ञान आणि तंत्रज्ञानावर विशेष भर देऊन, युवकांच्या शिक्षणाचा आक्रमक कार्यक्रम राबवल्यास भारतात नव्याने उदयाला येणारया पिढीच्या आणि युवकांच्या सक्षमीकरणासाठी ते उपयुक्त ठरेल. एवढेच नव्हे तर, मध्यम आणि दीर्घकालीन शाश्वत आर्थिक विकासाची खरी कोनशीला यामुळे घातली जाईल.

अ) **लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून भारताबाबतची लाभदायक गोष्ट:**

शिक्षणात केलेल्या गुंतवणुकीचा आपल्याला परत मोबदला किती मिळतो, याचे प्रमाण जरी उपलब्ध नसले तरी युवा पिढीत केलेल्या गुंतवणुकीतून मिळणारा सामाजिक लाभ बॅरो यांनी व्यक्त केलेल्या अंदाजापेक्षा ७ टक्क्यांहून अधिक असणार आहे आणि भविष्यातही तो टिकून राहणार आहे.

तक्ता क्रमांक १ मध्ये सध्या भारताला लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून कोणत्या बाबींचा लाभ मिळत आहे, याविषयी चर्चा करण्यात आली आहे. यामध्ये भारताच्या सद्यस्थितीची आणि क्षमतेची चीनबरोबर आणि इतर काही देशांबरोबर तुलना करण्यात आली आहे. हे देश आणि भारत यांची २००९ मध्ये जगाशी आणि काही महत्त्वाच्या गटांबरोबरची दरडोई सकल देशांतर्गत उत्पन्नाची क्रयशक्ती डॉलर्समध्ये समान होती म्हणूनच त्यांची इथे निवड करण्यात आलेली आहे.

सन २०१२ मध्ये भारताची १५ ते ६४ या वयोगटातील काम करणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण ६५ टक्के इतके होते. प्रचलित लोकसंख्येचा कल बघता हे प्रमाण चीनलाही मागे टाकू शकेल इतके आहे. भारतात, जे लोक वृध्द आहेत आणि काम करू शकत नाहीत, परावलंबी आहेत अशांचे, काम करणाऱ्या तरुणांच्या तुलनेत प्रमाण अत्यल्प आहे. याचाच अर्थ, तरुण पिढीची देशातील खाजगी आर्थिक बचतींमध्ये आणि शारीरिक भांडवलामध्ये उत्पादनक्षमरित्या गुंतवणूक केली तर थोडयाच काळात त्यांची भरभराट झाल्याचे दिसून येईल. वर्ष २०२५ नंतरही भारताची लोकसंख्या चीनच्या तुलनेत वाढतच राहिली तर वर उल्लेख केलेला प्रगतीचा कल भविष्यातही टिकून राहील आणि तोपर्यंत भारत उच्च उत्पन्न किंवा उच्च मध्यम उत्पन्न गटातील देश होऊ शकेल.(*२)

कोणाचाही विश्वास बसणार नाही अशी परिस्थिती योगायोगाने भारताच्या वाट्याला आली आहे. जगातील काही देशांच्या वाटयाला अशी परिस्थिती कधीच आली नव्हती. फक्त भारतीयांकडेच अशी संधी चालून आली आहे.

ब) **शिक्षण क्षेत्र - क्षमता आणि कामगिरी:**

केंद्र सरकारला भारताच्या या लाभदायक गोष्टीचा म्हणजेच युवा शक्तीच्या भांडवलाचा लाभ घ्यायचा असेल, तर तरुणांना मोठया प्रमाणावर विशेषत: विज्ञान आणि गणित या विषयांचे शिक्षण देणे गरजेचे आहे. उत्पादक कामात त्यामुळे अर्थपूर्ण रोजगार निर्मिती होईल. तक्ता क्रमांक २ मध्ये भारतातील शिक्षण क्षेत्रातल्या अनेक घटकांची जगातल्या परिस्थितीशी तुलना करण्यात आलेली आहे.

यामध्ये शाळेत जाण्याचे सरासरी वय याबाबत भारत जगातील १०० देशांमध्ये ६५ व्या क्रमांकावर आहे. खरे तर सक्तीच्या शिक्षणाचा कालावधी आणि नऊ वर्षे वयाच्या मुलांना शिकवण्याचे तास या दोन बाबी सोडल्या तर जगाच्या तुलनेत भारताची कामगिरी फारशी समाधानकारक नाही. उसळत्या तरुणाईची मोठी शक्ती भारताकडे असून देखील जगातल्या पहिल्या १०० विद्यापीठांमध्ये भारतातील नगण्य विद्यापीठांचा समावेश आहे आणि याबाबत २२ देशांमध्ये भारताचा शेवटचा म्हणजे २२ वा क्रमांक आहे. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरच्या काळात सकल देशांतर्गत उत्पन्नाच्या किमान ६ टक्के शिक्षणावर खर्च केला जात होता आणि तो मुद्दा वादाचा ठरला होता. तर सन २००२ मध्ये हे प्रमाण ४.१ टक्के इतके कमी झाले. भारतातील उच्च शिक्षणाबाबतची १९८० आणि १९९०च्या दोन दशकांमधील कामगिरी अपयशी आहे, असे मत काही लेखकांनी (पुष्कर,२०१३) व्यक्त केले आहे. गेल्या काही वर्षांत उच्च शिक्षण क्षेत्राकडे एकंदरच बरेच दुर्लक्ष झाल्याचे तक्ता क्रमांक २ वरून स्पष्टपणे दिसून येते. ११व्या पंचवार्षिक योजनेत (२००७-२०१२) उच्च शिक्षणावर मोठया प्रमाणात खर्च करण्यात आला, तर १२ व्या पंचवार्षिक योजनेतही (२०१२-२०१७) यासाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. केंद्र आणि राज्य सरकारांना उच्च शिक्षण क्षेत्रात स्वत:ची अशी मत-मतांतरे आहेत. यांसारख्या गोष्टींमुळे, उच्च शिक्षणावर मोठया प्रमाणावर खर्च केला जाऊनही त्याचा पुरेपूर उपयोग होण्यामध्ये अनेक अडथळे येत आहेत (पुष्कर,२०१३). यामुळे उच्च शिक्षणाबाबत केंद्र आणि राज्य सरकारांचे संबंध सहकार्याचे राहण्याऐवजी स्पर्धेचे होत आहेत.

तक्ता कमांक ३ मध्ये प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाची स्थिती विशद करण्यात आली आहे. केवळ १९९९ या वर्षात पहिली मध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलांपैकी ६३ टक्के तर मुलींपैकी ६० टक्के विद्यार्थी पाचवी पर्यंत पोहोचले. हे प्रमाण कनिष्ठ मध्यम उत्पन्न देशांपेक्षाही कमी आहे. अगदी अशा प्रकारे इथे देण्यात येणाऱ्या शिक्षणाच्या गुणवत्तेकडे जरी आपण दुर्लक्ष केले आणि उत्पन्नानुसार शिक्षणाच्या उपलब्धतेमध्ये असणारी असमानता (*३) जरी मान्य केली तरी ही आकडेवारी धोक्याचा इशारा ठरेल.

## क) रोजगार क्षेत्र - क्षमता आणि कामगिरी :

भारत आणि इतर अनेक देशांमधील बेरोजगारीसंबंधीची माहिती ढोबळ स्वरुपात उपलब्ध आहे. २०१३ च्या जागतिक विकास निदर्शकानुसार देखील २००८-११ या काळात भारतात पुरुषांचे बेरोजगारीचे प्रमाण १०% तर महिलांचे बेरोजगारीचे प्रमाण १२% इतके होते. याच काळात ज्यांनी केवळ प्राथमिक शिक्षण घेतले आहे त्यांचे बेरोजगारीचे प्रमाण १२% होते, तर माध्यमिक आणि तिसऱ्या क्षेत्रात शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण अनुक्रमे ४२% आणि २३% होते.

क्रमांक ४च्या तक्त्यामध्ये रोजगाराच्या विशेषत: युवकांच्यातील बेरोजगारीच्या रचनेवर प्रकाश टाकण्यात आला आहे. १९९१ मध्ये भारतात १५ वर्षांवरील व्यक्तींच्या लोकसंख्येचे रोजगाराशी असलेले प्रमाण केवळ ५८% होते आणि २०११ मध्ये ते ५४% इतके खाली आले. युवकांचा श्रम क्षेत्रात असणारा सहभाग कमी आणि कमी व मध्यम उत्पन्न असलेल्या गटांतील देशांपेक्षा कमी आहे. एकूण रोजगारामध्ये विनामोबदला करण्यात येणाऱ्या घरकामाचे विशेषत: महिलांच्या कामाचे प्रमाण प्रचंड आहे. प्रत्येक व्यक्तीच्या सकल देशांतर्गत उत्पन्नात १९९०-९२ च्या तुलनेत २००९-११ मध्ये वाढ झालेली असली तरी चीन आणि कमी मध्यम उत्पन्न असलेल्या देशांच्या तुलनेत ते अजूनही कमीच आहे.

## ड) समारोप :

भारतीय युवा पिढीला शिक्षण आणि रोजगारांच्या मोठया प्रमाणावर निर्माण होत असलेल्या संधींचे महत्त्व अधोरेखित करणे, हा या लेखामागील एकमेव उद्देश आहे. मात्र, या संधींचा लाभ कशा प्रकारे घेता येईल, हे सांगणे या लेखाच्या कक्षेपलिकडचे आहे. तरीसुद्धा काही महत्त्वाचे मुद्दे मांडता येतील. पहिला मुद्दा म्हणजे शिक्षण क्षेत्रात, शिक्षकांसारख्या मानवी भांडवलात आणि इतर भांडवलामध्ये सार्वजनिक आणि खाजगी गुंतवणुकीत वाढ होणे आवश्यक आहे. शिक्षणाच्या प्राथमिक, माध्यमिक, तिसऱ्या क्षेत्रात

आणि व्यावसायिक अशा सर्वच क्षेत्रातील गुणवत्तेत वाढ होण्यासाठी मोठया प्रमाणावर गुंतवणूक व्हायला हवी. ही व्यापक गुंतवणूक देशातील साधनसंपत्तीत आणि थेट परकीय गुंतवणूक अशा दोन्ही प्रकारे होणे आवश्यक आहे. यामध्ये विज्ञान, अभियांत्रिकी आणि गणिताच्या शिक्षणावर भर देणे गरजेचे आहे. शिक्षणाची रचना या सर्व प्रकारच्या परिवर्तनाला प्रतिसाद देणारी अशीच असली पाहिजे. शिक्षणाच्या या वेगाने होण-या विस्ताराचे नियमन आणि नियंत्रण करणारी एक यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. या सहकारी संघराज्याच्या यंत्रणेत केंद्र आणि राज्य सरकारांना सहभागी करून घेणे आवश्यक आहे.

रोजगार क्षेत्राबाबतही असेच निर्णय घेणे जरुरीचे आहे. देशाचा नुकताच मोठया प्रमाणावर आर्थिक विकास झालेला आहे. मात्र, यामध्ये रोजगाराच्या संधी निर्माण झालेल्या नसल्यामुळे हा अशाश्वत विकास झाला आहे. मोठया आणि लहान उद्योगधंद्यांमध्ये, श्रम आणि उत्पादन बाजारपेठेच्या वाढलेल्या जाचक नियमांमुळे कामगारांचे, देशातील आणि जगातील बाजारपेठेच्या गरजांना आवश्यक असणारे स्थलांतर आणि त्या गरजांनुसार स्वत:मध्ये बदल करणे यावर बंधने येत आहेत. त्याबाबत विचार होणे आवश्यक आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील धोरणकर्त्यांच्या मनोवृत्तीत बदल घडून येणे आवश्यक आहे. सध्या विकास आणि गरिबी यावर देण्यात येणारा भर समजण्यासारखा आहे. पण त्याचबरोबर शिक्षण आणि तरुणांचा रोजगार याबाबतचा आपला दृष्टिकोन जोपर्यंत बदलत नाही, तोपर्यंत मध्यम काळात मोठया प्रमाणावर विकास आणि गरिबीमध्ये सातत्याने घट होणे शक्य नाही. याचीही जाणीव होणे आवश्यक आहे. शिक्षण आणि युवकांना रोजगार हाच भारताच्या विकासाचा केंद्रबिंदू असायला हवा.

**तळटीपा :**

(*१) - दरडोई सकल उत्पन्नामध्ये वाढ होण्यामध्ये मानवी भांडवलाचे योगदान बरच मोठे आहे. १९५१-५२ ते २०१२-२०१३ या काळात दरडोई सकल देशांतर्गत उत्पन्नात सरासरी ५.० टक्के वाढ झाली आहे. (भारतीय रिझर्व्ह बँकेच्या माहितीवर आधारित).

(*२) - एक इशारा या ठिकाणी द्यावासा वाटतो. भारतीय लोकसंख्या ही जमेची बाजू असली तरी स्त्री-पुरुषांचा समतोल मात्र कमी होताना दिसतो आणि ही समस्या उच्च शिक्षण आणि उत्पन्न यामुळे आणखी गंभीर बनत जाणार आहे. (चौधरी आणि झा).

(*३) - बऱ्याच वेळा सरकारी संस्थांचा कल मुलांची गरिबी त्यांच्या शिक्षणापासून वेगळी काढण्याकडे असतो. या दोन्ही प्रश्नांचा एकत्रितपणे विचार व्हायला हवा असे मत चौधरी आणि झा (२०१३) यांनी व्यक्त केले आहे. शिक्षण हक्क कायदा याचा अर्थ बऱ्याच वेळा निकृष्ट दर्जाच्या शिक्षणाचा हक्क असाच घेण्यात आला. त्यामुळे शिक्षण देण्याची पद्धतही वाईट आहे आणि शिकणाऱ्यांनीही ते ज्ञान अर्धवट आत्मसात केले आहे. योग्य उद्दिष्ट न ठेवून केलेल्या अर्थसहाय्यामुळे सामान्यत: कल्याणकारी कार्यक्रम उगाचच लांबवले जातात, असे झा यांनी (२०१४) दाखवून दिले आहे.

**संदर्भ :**


- बॅरो, आर.(२००१) 'ह्युमन कॅपिटल ग्रोथ: हिस्ट्री अँड पॉलिसी' अमेरिकन इकॉनॉमिक रिव्ह्यू : पेपर्स अँड प्रोसिडिंग्ज, व्हॉल्युम.९१, क्र.२, पी पी.१२-१७.
- चौधरी, डी. आणि आर.झा (२०११) 'इन्कल्युसिव्ह ग्रोथ:मालन्युट्रीशन-एज्युकेशन लिंक' इकॉनॉमिक टाइम्स, डिसेंबर २२, http://articles.economoictimes.indiatimes.com/2011-12-22/news/30546960 1 child-poverty-rte-inclusive-growth यावर उपलब्ध.
- चौधरी, डी. आणि आर. झा (२०१३) 'चौधरी, डी.अँड आर.झा (२०१३) 'इंडीयाज जेंडर बायस इन चाईल्ड पॉप्युलेशन, फिमेल एज्युकेशन अँड ग्रोइंग प्रॉस्पेरीटी:१९५१ ते २०११' इंटरनॅशनल रिव्ह्यू ऑफ अॅपलाइड इकॉनॉमिक्स, व्हॉल्युम.२७, क्र.१ पृ.क्र २३-४३.
- झा,आर.(२०१४) ''वेलफेअर स्किम्स अँड सोशल प्रोटेक्शन इन इंडिया'' इंटरनॅशनल जर्नल ऑफ सोशॉलॉजी अँड सोशल पॉलिसी,फोर्थकमिंग.
- ल्युकस, आर. ज्युनियर(१९८८) 'ऑन द मेकॅनिक्स ऑफ इकॉनॉमिक डेव्हलपमेंट' जर्नल ऑफ मॉनिटरी

इकॉनॉमिक्स,व्हॉल्युम२२, क्र.पृष्ठ क्र.३-४२.

- मार्शल, ए. (१८९०) 'प्रिन्सिपल्स ऑफ इकॉनॉमिक्स, व्हॉल्युम १ टेक्स्ट, ९वे (व्हेअरिअरम) एडिशन १९६१, विथ ॲनोटेशन्स बाय सी.डब्ल्यू. गिलीबॉड, लंडन मॅकमिलन अँड कंपनी फॉर द रॉयल सोसायटी.
- पुष्कर(२०१३) 'विल इनक्रीज्ड स्पेन्डींग इम्प्रुव्ह इंडियाज हायर एज्युकेशन सेक्टर' एशियन सायंटिस्ट, मार्च १३,२०१३ http://www.asianscientist.com/academia/increased-spending-improve-indias-highereducation-sector-2013/ वर उपलब्ध- (accessed 28th February 2014).
- रोमर, डी.(२००६) ॲडव्हान्स्ड मॅकरोइकॉनॉमिक्स, ३री आवृत्ती, बोस्टन: मॅकग्रा हिल आयर्विन.
- स्मिथ, ए. (१९०४) द वेल्थ ऑफ नेशन्स, ५वी आवृत्ती, एडविन कॅनन, लंडन:मेथ्युएन अँड कंपनी, प्रथम आवृत्ती (१७७६).

**तक्ता क्रमांक १ : भारत आणि इतर देश/गट यांच्या लोकसंख्येचा तुलनात्मक अभ्यास**

| दर हजारी प्रमाण | लोकसंख्या दशलक्ष मध्ये | | | सरासरी वार्षिक लोकसंख्या वाढ (%) | | वयानुसार लोकसंख्येची रचना २०१२ | | | अवलंबित्वाचे प्रमाण २०१२ | | ढोबळ मृत्यूदर २०११ | ढोबळ जन्मदर २०११ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २००० | २०१२ | २०२५ | २०००-२०१२ | २०१२-२०२५ | ०-१४ | १५-६४ | ६५+ | काम करणाऱ्या वयोगटातील तरुणांचे प्रमाण % | काम करणाऱ्या वयोगटातील वृद्धांचे प्रमाण % | दर हजारी प्रमाण | दर हजारी प्रमाण |
| भारत | १,०४२.३० | १,२३६.७० | १,४१८.७० | १ | १ | २९ | ६५ | ५ | ४५ | ८ | ८ | २१ |
| चीन | १,२६२.६० | १,३५०.७० | १,४१५.९० | १ | ० | १८ | ७३ | ९ | २५ | १२ | ७ | १२ |
| मंगोलिया | २.४ | २.८ | ३.३ | १ | १ | २७ | ६९ | ४ | ३९ | ५ | ७ | २३ |
| व्हिएतनाम | ७७.६ | ८८.८ | ९५.८ | १ | १ | २३ | ७१ | ७ | ३२ | ९ | ६ | १६ |
| फिलिपिन्स | ७७.७ | ९६.७ | ११९. | २ | २ | ३५ | ६२ | ४ | ५६ | ६ | ६ | २५ |
| इंडोनेशिया | २०८.९ | २४६.९ | २८२ | १ | १ | २९ | ६६ | ५ | ४५ | ८ | ६ | २० |
| जगाची लोकसंख्या | ६,१०२ .१० | ७,०४६.४० | ८,००३.८० | १ | १ | २६ | ६६ | ८ | ४० | १२ | ८ | १९ |
| कमी उत्पन्न | ६४८.२ | ८४६.५ | १,११३.२० | २ | २ | ३९ | ५७ | ४ | ६९ | ७ | ९ | ३३ |
| मध्यम उत्पन्न | ४,२४३.३० | ४,८९७.८० | ५,५५५.०० | १ | १ | २७ | ६७ | ६ | ४० | १० | ८ | १९ |
| कनिष्ठ मध्यम उत्पन्न | २,०७७.९० | २,५०७.०० | २,९६५.९० | २ | १ | ३१ | ६३ | ५ | ५० | ८ | ८ | २४ |
| उच्च मध्यम उत्पन्न | २,१६५.४० | २,३९०.८० | २,५८९.१० | १ | १ | २२ | ७० | ८ | ३१ | ११ | ७ | १५ |
| कमी आणि मध्यम उत्पन्न | ४,८९१.५० | ५,७४४.३० | ६,६६८.२० | १ | १ | २९ | ६५ | ६ | ४४ | ९ | ८ | २१ |
| पूर्व आशिया आणि पॅसिफिक | १,८१२.२० | १,९९१.६० | २,१४२.८० | १ | १ | २१ | ७१ | ८ | ३० | ११ | ७ | १४ |
| युरोप आणि मध्य आशिया | २५६.५ | २७२.१ | २८१.३ | ० | ० | २२ | ६८ | १० | ३२ | १५ | ९ | १६ |
| लॅटिन अमेरिका आणि कॅरिबियन | ५००.३ | ५८१.४ | ६६०.२ | १ | १ | २८ | ६६ | ७ | ४२ | ११ | ६ | १९ |
| मध्य पूर्व आणि उत्तर आफ्रिका | २७६.६ | ३३९.६ | ४१३.३ | २ | २ | ३० | ६५ | ५ | ४७ | ७ | ६ | २४ |
| दक्षिण आशिया | १,३८२ .२० | १,६४९.२० | १,९०९.७० | १ | १ | ३० | ६५ | ५ | ४७ | ८ | ८ | २२ |
| उप- सहारा आफ्रिका | ६६३.७ | ९१०.४ | १,२६१.०० | ३ | ३ | ४३ | ५४ | ३ | ८० | ६ | १२ | ३८ |
| उच्च उत्पन्न | १,२१०.६० | १३०२.१० | १,३३५.६० | १ | ० | १७ | ६७ | १६ | २५ | २३ | ९ | १२ |
| युरो क्षेत्र | ३१५.१ | ३३३.८ | ३३१.४ | ० | ० | १५ | ६६ | १९ | २३ | २९ | ९ | १० |

आधार : जागतिक विकास निदर्शक २०१३ ; जागतिक बँक

**तक्ता कमांक २ भारतीय शिक्षणाची जगातील इतर देशांशी संख्याशास्त्रीय तुलना**

| प्रकार | आकडेवारी | माहिती उपलब्ध असलेले वर्ष | जगातील स्थान |
|---|---|---|---|
| शाळेत जाण्याचे सरसरी वय | ५.१ वर्षे | २००० | शंभरात ६५वे |
| सक्तीच्या शिक्षणाची वर्षे | ८वर्षे | १९९७ | बारामध्ये ८वे |
| प्राथमिक शिक्षणाचा कालावधी | ६ वर्षे | २००२ | १७७ मध्ये ६२वे |
| माध्यमिक शिक्षणाचा कालावधी | ५ वर्षे | २००२ | १७६ मध्ये १५५वे |
| प्राथमिक शिक्षण पूर्ण करण्याचा कालावधी | ९० टक्के | २००५ | १२४ मध्ये ७१वे |
| शिक्षणावरील खर्च (सकल देशांतर्गत उत्पन्नाची टक्केवारी) | ४.१ | २००२ | १३१ मध्ये ८२वे |
| ९ वर्षे वयाच्या विद्यार्थ्यांना शिकवण्याचा कालावधी | १,०५१ तास | २००० | ३८ मध्ये ५वे |
| प्राथमिक शिक्षण देणारे (महिलांचे प्रमाण टक्केवारी %) | ४४ | २००३ | १३५ मध्ये ११२वे |
| दर हजारी प्राथमिक शिक्षकांचे प्रमाण (a) | ३.२१ | २०११ | १३४ मध्ये १०४वे |
| प्रत्येक विद्यार्थ्यासाठी प्राथमिक शिक्षणावर होणारा सार्वजनिक खर्च (b) | ७.२ | २००२ | ७०मध्ये ६१वे |
| सर्वोत्कृष्ट १०० विद्यापीठे -प्रमाण प्रति १० लाख लोकसंख्या (c) | ०.००१७७ | २००५ | २२ मध्ये २२वा |
| a. | Teaching staff in primary. Public and private. Full and part-time. All programs. Total is the total number of teachers in public and private primary education institutions. Teachers are persons employed full time or part time irrespective of their qualifications or the delivery mechanism, i.e. face-to-face and/or at a distance. This excludes educational personnel who have no active teaching duties (e.g. headmasters, headmistresses or principals who do not teach) and persons who work occasionally or in a voluntary capacity in educational institutions. Figures expressed per thousand population for the same year.. | | |
| b. | Public expenditure per student, primary level is the total reported current spending by the government on primary education, divided by the total number of pupils in primary education, expressed as a percentage of per capita GDP.. | | |
| c. | Number of universities in the top 100. Figures expressed per million population for the same year.. | | |

Source: "India Education: Statistical Profile", NationMaster. Retrieved from http://www.nationmaster.com/country-info/profiles/India/Education, accessed 28th February 2014,

## तक्ता क्रमांक ३ भारत आणि इतर काही निवडक देश/गट यांची शैक्षणिक कामगिरी

| | Gross Intake ratio in first grade of primary education | | Reaching grade 5, male % of grade 1 students | | Reaching grade 5, female % of grade 1 students | | Cohort Survival Rate | | Repeaters in Primary Education | | Transition rate to secondary education | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Male % of relevant age group | Female % of relevant age group | | | | | Reaching last grade of primary education, male % of grade 1 students | Reaching last grade of primary education, female % of grade 1 students | Male, % of enrolment | Female, % of enrolment | Male % | Female % |
| | 2011 | 2011 | 1999 | 2010 | 1999 | 2010 | 2010 | 2010 | 2011 | 2011 | 2010 | 2010 |
| India | 112 | 114 | 63 | .. | 60 | .. | .. | .. | 5 | 5 | 88 | 89 |
| China | 109 | 110 | 82 | .. | 80 | .. | .. | .. | 0 | 0 | .. | .. |
| Mongolia | 106 | 104 | .. | 92 | .. | 94 | 92 | 94 | 0 | 0 | 98 | 99 |
| Viet Nam | .. | .. | 80 | .. | 86 | .. | .. | .. | .. | .. | .. | .. |
| Philippines | 130 | 120 | 69 | 75 | 79 | 82 | 72 | 80 | 3 | 2 | 99 | 97 |
| Indonesia | 110 | 115 | 87 | .. | 92 | .. | .. | .. | 3 | 3 | 84 | 96 |
| World | 114 | 111 | .. | .. | .. | .. | 74 | 76 | 5 | 5 | .. | .. |
| Low income | 134 | 126 | .. | 60 | .. | 62 | 58 | 59 | 10 | 10 | .. | .. |
| Middle income | 111 | 109 | .. | .. | .. | .. | 76 | 78 | 4 | 4 | .. | .. |
| Lower middle income | 115 | 111 | 69 | .. | 72 | .. | 68 | 71 | 4 | 4 | 86 | 88 |
| Upper middle income | 104 | 106 | 83 | .. | 81 | .. | 88 | 88 | 4 | 4 | .. | .. |
| Low & middle income | 115 | 112 | .. | .. | .. | .. | 72 | 74 | 5 | 5 | .. | .. |
| East Asia & Pacific | 106 | 109 | 83 | .. | 80 | .. | 88 | 89 | 2 | 1 | .. | .. |
| Europe & Central Asia | 102 | 101 | .. | .. | .. | .. | 98 | 99 | 1 | 1 | 99 | 98 |
| Latin America & Caribbean | 115 | 112 | .. | .. | .. | .. | 81 | 86 | 9 | 8 | .. | .. |
| Middle East & North Africa | 107 | 105 | 89 | 97 | 90 | 97 | 88 | 86 | 8 | 6 | .. | .. |
| South Asia | 122 | 119 | 63 | .. | 60 | .. | 61 | 65 | 5 | 5 | 86 | 88 |
| Sub-Saharan Africa | 120 | 111 | .. | 66 | .. | 67 | 58 | 57 | 8 | 9 | .. | .. |
| High income | 101 | 100 | .. | .. | .. | .. | 96 | 93 | 1 | 1 | .. | .. |
| Euro area | 100 | 99 | .. | .. | .. | .. | 96 | 97 | 1 | 4 | .. | .. |

आधार : जागतिक विकास निदर्शक २०१३ ; जागतिक बँक

### तक्ता क्रमांक ४- बेरोजगारीवर सहजी परिणाम करणारे घटक - भारताची इतर देशांच्या तुलनेतील परिस्थिती

| | रोजगाराचे लोकसंख्येशी असलेले प्रमाण | | | | रोजगारावर परिणाम करणारे घटक | | | | कामगारांची उत्पादकता | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | एकूण (१५ किंवा त्यापेक्षा जास्त वयोगटातील लोकांची टक्केवारी %) | | तरुणांचे प्रमाण (१५ते २४ वयोगट %) | | विना मोबदला घरकाम करणारे, एकटे पुरुष (पुरुष रोजगारीचे प्रमाण %) | | विना मोबदला घरकाम करणाऱ्या, एकटया स्त्रिया (स्त्रियांच्या रोजगारीचे प्रमाण %) | | काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे सकल देशांतर्गत उत्पन्न (विकासाचा दर %) | |
| | 1991 | 2011 | 1991 | 2011 | 1990-1992 | 2008-11 | 1990-1992 | 2008-11 | 1990-92 | 2009-11 |
| India | 58 | 54 | 46 | 34 | .. | 79 | .. | 85 | 1 | 5.2 |
| China | 75 | 68 | 71 | 51 | .. | .. | .. | .. | 6.8 | 9.4 |
| Mongolia | 55 | 59 | 38 | 32 | .. | 57 | .. | 52 | .. | .. |
| Viet Nam | 77 | 75 | 73 | 59 | .. | .. | .. | .. | 4.6 | 3.5 |
| Philippines | 60 | 61 | 42 | 41 | .. | 42 | .. | 46 | -3.3 | 2.7 |
| Indonesia | 61 | 63 | 42 | 40 | .. | 62 | .. | 67 | 6.2 | 3.9 |
| World | 62 | 60 | 52 | 42 | .. | .. | .. | .. | 0.6 | 3.4 |
| Low income | 72 | 72 | 59 | 56 | .. | .. | .. | .. | -3.5 | 4.3 |
| Middle income | 63 | 59 | 52 | 40 | .. | .. | .. | .. | 2.7 | 5.7 |
| Lower middle income | 58 | 55 | 43 | 36 | .. | .. | .. | .. | 0.4 | 3.9 |
| Upper middle income | 67 | 63 | 60 | 45 | .. | .. | .. | .. | 4.1 | 6.6 |
| Low & middle income | 64 | 61 | 53 | 43 | .. | .. | .. | .. | 2.4 | 5.5 |
| East Asia & Pacific | 73 | 68 | 66 | 49 | .. | .. | .. | .. | 6.7 | 7.9 |
| Europe & Central Asia | 55 | 51 | 40 | 32 | .. | .. | .. | .. | -5.9 | 4.1 |
| Latin America & Caribbean | 57 | 62 | 48 | 46 | .. | .. | .. | .. | 0.8 | 2.4 |
| Middle East & North Africa | 41 | 41 | 26 | 23 | .. | .. | .. | .. | 1.9 | 0.6 |
| South Asia | 59 | 55 | 47 | 37 | .. | .. | .. | .. | 3.1 | 4.7 |
| Sub-Saharan Africa | 64 | 65 | 47 | 47 | .. | .. | .. | .. | -5.2 | 2.2 |
| High income | 57 | 56 | 45 | 37 | .. | .. | .. | .. | 0.9 | 1.9 |
| Euro area | 50 | 51 | 42 | 34 | .. | .. | .. | .. | 2.3 | 1.9 |

आधार : जागतिक विकास निदर्शक २०१३ ; जागतिक बँक

*(**राघवेंद्र झा** अर्थतज्ज्ञ व कॅनबेरा येथील ऑस्ट्रेलियन विद्यापीठाचे संचालक आहेत)*

**– भाषांतर : रोहिणी पेठे**




# सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने आगामी वर्षाच्या आर्थिक नियोजनाचे निर्देशांक

**– चंद्रकांत पाटील**

सर्व उदयोन्मुख अर्थव्यवस्थांसमोर असलेली आव्हाने, आपल्या देशासमोरदेखील आहेत. विशेषत: २०१२ व १३ ही वर्षे संपूर्ण जगासाठी तसेच भारतासाठी अतिशय खडतर होती. अगदी मोजकेच देश या परिस्थितीतून मार्ग काढू शकले आणि त्यापैकी आपला भारत हा एक देश आहे. अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी सादर केलेल्या २०१४-१५ च्या हंगामी अर्थसंकल्पाचा संपादित अंश विचारात घेता चिदंबरम यांनी लोकसभेत ५,५५,८९२ कोटींची योजना व १२,०७,८९२ कोटी रुपयांचा बिगर योजना खर्चाचा अर्थसंकल्प मांडला. या अंतरिम अर्थसंकल्पात प्रमुख कार्यक्रम राबवण्याच्या मंत्रालयासाठी पुरेसा निधी दिल्याचे अर्थमंत्र्यांनी सांगितले. त्यामध्ये-अल्पसंख्यांक कार्यमंत्रालयासाठी ३,७११ कोटी, आदिवासी कार्यमंत्रालय ४३७९ कोटी, गृहनिर्माण आणि गरीबी निवारण मंत्रालय ६००० कोटी, सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय ६७३० कोटी, पंचायत राज मंत्रालय २१००० कोटी, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय ३३,७२५ कोटी, मनुष्यबळ विकास मंत्रालय ६७,३९८ कोटी आणि ग्रामीण विकास मंत्रालय ८२,२०२ कोटी रुपये अशी तरतूद करण्यात आली असून अनुसूचीत जाती उपाययोजनांसाठी ४८,३६८ कोटी व आदिवासी उपाययोजनांसाठी ३,७२६ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महिला बचत गटांची संख्या ४१ लाखांवर असून, महिलान्मुखी अर्थसंकल्पासाठी ९७,५३३ कोटी आणि मुलांसाठी ८१,०२४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. शिक्षण व पायाभूत सुविधांमध्ये सर्वशिक्षा अभियानासाठी २७,३६५ कोटी, शाळांतील मध्यांन्ह भोजन योजनांसाठी १३,१५२कोटी, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण योजनांसाठी ४९६५ कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. ग्रामीण गृहनिर्मितीसाठी १६,००० कोटी, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनांसाठी १३,००० कोटी, पेयजल पूर्ततेसाठी ११,००० कोटी, ग्रामीण स्वच्छतेसाठी ४,२६० कोटी रुपये निधीची तरतूद करण्यात आली आहे. तर शहरांच्या विकासासाठी JNNUR अंतर्गत ७०६० कोटी रुपये केंद्रीय निधीतून मिळणार आहे. तसेच अल्पसंख्यांकांना ६६,५०० कोटींचे रु. कर्ज वाटपाचे उद्दिष्ट असून, कृषीकर्जाचे लक्ष ८ लाख कोटींचे आहे. चालू वित्तीय वर्षात २६३ दशलक्ष टन धान्याचे उत्पादन होणार असल्याचा अंदाज असून २०१२-१३ च्या २५३.३६ दशलक्ष टनापेक्षा ते जास्त आहे. कृषीनिर्यातीचे लक्ष ४५ अब्ज डॉलर असून २०१२-१३ मध्ये ती ४१ अब्ज डॉलर होती, तसेच २०१३-१४ च्या सुधारित आंदाजाच्या तुलनेत आगामी वित्तीय वर्षात अन्न, खते आणि इंधंनावरील अनुदानाचे प्रमाण किंचित जास्त आहे. इंधंनावरील अनुदान ६५००० कोटी

रु तर संपूर्ण देशात राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायदा (विधेयक )आमलात आणण्यासाठी १,१५,००० कोटी रु. ची तरतूद करण्यात आली आहे .

२०१३-१४ मध्ये वित्तीय तूट एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या ४.६ टक्क्यावर म्हणजे ४.८ टक्क्याच्या धोक्याच्या रेषेखाली नियंत्रित केली जाईल. २०१४-१५ मध्ये वित्तीय तूट ४.१ टक्के आणि महसुली तूट ३.३ टक्के असेल, म्हणजेच चालू खात्यातील तूट गेल्या वर्षात ८८ अब्ज डॉलर होती. ती यावर्षी ४५ अब्ज डॉलर असेल. चालू वित्तीय वर्षाअखेर विदेशी चलनात १५ अब्ज डॉलरची वाढ अपेक्षित असून खाद्यपदार्थाच्या चलनवाढीचा दर १३.६ टक्केवरून ६.२ टक्के झाला असला तरी अजूनही तो चिंतेचा विषय ठरला आहे, असे केंद्रीय वित्तमंत्री पी. चिदंबरम यांनी स्पष्ट केले. एकंदरीतच २०१४-१५ च्या अंतरिम अर्थसंकल्पाचा संपादित अंश विचारात घेता, तो हंगामी अर्थसंकल्प असो, वा पूर्ण वर्षासाठीचा असो, या ठिकाणी काही गोष्टी समान असतात. उदा. आपल्या समोरील उद्दिष्ट्ये आणि आर्थिक बाबींना असलेले जागतिक संदर्भही तेच असतात. सप्टेंबर २००८ पासून जागतिक अर्थव्यवस्थेची स्थिती हा प्रत्येक विकसनशील देशाच्या भवितव्यावर निर्णायक परिणाम करणारा घटक बनला असल्याने जागतिक अर्थव्यवस्था आणि धोक्यांचाथोडक्यात परामर्श घेणे उचित ठरेल.

जागतिक आर्थिक विकासाचा दर २०११ मध्ये ३.९%,२०१२ मध्ये ३.१% व २०१३ मध्ये ३% होता. ही आकडेवारी आर्थिक आरिष्ट्याचे चित्र ढोबळमानाने तरी पुरेसे स्पष्ट करते. 'ग्लोबल रिस्क २०१४' च्या अहवालात ३१ जागतिक धोक्यांचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यातील सर्वात महत्वाच्या १० धोक्यांमध्ये-वित्तीय पेचप्रसंग,वाढती बेरोजगारी, उत्पन्नातील तफावत, सुशासनातील अपयश, अन्नधान्याची समस्या, राजकीय आणि सामाजिक अस्थिरता इ. चा समावेश आहे. ही आव्हाने सर्व उदयमुख अर्थव्यवस्थांसह आपल्या देशासमोरही असून आहेत. त्याचबरोबर आगामी उद्दिष्ट प्राप्तीमध्ये वित्तीय बळकटीकरण, भाव स्थिर ठेवणे, धान्य उत्पादनात स्वयंपूर्णता, विकासाची प्रक्रिया पुन्हा गतिमान करणे, गुंतवणुकीत वाढ, निर्मिती क्षेत्राला प्रोत्साहन, निर्यातीला चालना, प्रकल्पांच्या अंमलबजावणीला वेग देणे आणि पेट्रोलियम, वीज, कोळसा, महामार्ग, वस्त्रोद्योग इ.महत्वाच्या क्षेत्रातील समस्यांवर व्यवहार्य तोडगा काढणे, ही सरकारची प्रमुख उद्दिष्टे आहेत. या पार्श्वभूमीवर एकूण अर्थव्यवस्थेचे आर्थिक नियोजन करताना आगामी अर्थसंकल्प सादर करणे, हे कोणत्याही अर्थमंत्र्यांपुढे तारेवरची कसरत असणार यात शंका नाही! कारण एका बाजूस जागतिक वित्तीय आरिष्ट्य, अर्थव्यस्थेसमोरील आव्हाने आणि आगामी सर्वसमावेशक विकासाची उद्धिष्ट्ये पूर्ततेसाठी सरकारला करावा लागणारा सार्वजनिक खर्च, सर्वसामान्य, गोरगरीब लोकांना सोईसवलती यातून वाढती वित्तीय तूट रोखण्याचे आव्हान तर दुसऱ्या बाजूस आगामी असणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक खर्च करण्यासाठी प्राप्त करण्यास उत्पन्नाचे स्त्रोत म्हणजे कर आणि करेत्तर दराची निश्चिती आणि ती करताना होणारी गोची. यातून मार्गक्रम करीत अंदाजपत्रक मांडणे आव्हानात्मक तर असणार हे मात्र निश्चित. या शिवाय अशा पार्श्वभूमीवर अर्थसंकल्प सादर करणे हे देशातील जनतेला, जणू एखादा नवीन सुपरहिट सिनेमा रिलीज होण्याआधी जशी उत्सुकता असते अशी उत्सुकता आज आपणास अंदाजपत्रक सादर होण्याअगोदर जनतेमध्ये पहायला मिळते. एकंदरीतच आर्थिक नियोजन करताना ते व्यक्तीगत असो वा सार्वजनिक असो कोणालाही मर्यादित साधनसामुग्रीत अमर्यादित गरजा पूर्ण कराव्या लागतात, हे त्रिकालबाधित सत्य आहे. परंतु, खर्चावर नियंत्रण (काटकसर) म्हणजे कमीतकमी केलेला खर्च नव्हे, उलट जो खर्च तुम्ही केला तो किती शहापणाने केला यातच कटकसरीला महत्व असते म्हणजेच कल्याणकारी खर्चाला कात्री न लावता इतर खर्च कमी करणे हेच शहापणाचे लक्षण असते.

अशा पार्श्वभूमीवर २०१३-१४ मध्ये वित्तीय तूट एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या ४.६ टक्क्यापर्यंत रोखण्यात यश मिळेल. म्हणजेच चालू खात्यातील तूट ४५ अब्ज डॉलरपर्यंत मर्यादित राहील व चालू आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत परकीय चलनाच्यागंगाजळीमधे १५ अब्ज डॉलर ची भर पडेल. दोन वर्षापूर्वीच्या स्थितीच्या तुलनेत आज आपली अर्थव्यवस्था अधिक स्थिर आहे. वित्तीय तूटीमध्ये घट होत आहे. निर्यातीला चालना मिळाली आहे. अनेक विकास प्रकल्पांना सरकारने हिरवा कंदिल दाखविला आहे. या सर्व गोष्टी अपरिमित कष्टामुळे साध्य झाल्या आहेत. धाडसी म्हणता येतील असे अनेक निर्णय सरकारने घेतले आहेत. याची आंतरराष्ट्रीय विश्लेषक व पतमानांकन संस्थांनीही दखल घेत देशाच्या पतमानांकन दर्जात घट करण्याची त्यांची भाषा बंद झाली असून 'वित्तीय

स्पर्धेला आमचे सर्वोच्च प्रधान्य असेल', हे वचन आम्ही पूर्ण केले आहे. थोडक्यात आर्थिक वाढीला सर्वोच्च प्राधान्य द्यायला हवे, हे देशाला पटवून देणे 'यूपीए'चे एक महत्वाचे यश आहे, असे केंद्रीय अर्थमंत्री चिदंबरम भाषणात सांगत होते, तेंव्हा ते नेमके हेच अधोरेखित करीत होते. या त्यांच्या सांगण्याचा मतितार्थ हाच की 'सर्वसमावेशक विकास', त्यासाठीच्या कल्याणकारी योजना, या सगळ्याचा डोलारा उभा करण्यासाठी मुळातच आर्थिक वाढीचा पाया विस्तृत आणि मजबूत करावा लागतो. केवळ कर वाढविणे हा त्यावर उपाय नसून, कर वाढविले की उत्पादनखर्च वाढतो व स्पर्धात्मकता कमी होऊन त्याचा विकासावर परिणाम होतो. म्हणजेच 'यूपीए'ची दिशा बरोबर होती. असे देशातील अनेक तज्ञ व मान्यवर करताहेत. परंतु त्या दिशेने किती आणि कोणती पाऊले टाकली, याचे मूल्यमापन व्हायला नको काय? येथे केवळ वकिली बाजूने विचार करून चालणार नाही. कोणताही कसलेला वकील आपल्या विरोधात जाणारी तथ्ये पुढे आणत नाही तर अनुकूल घटकावरच लक्ष केंद्रित करतो. जसे भाजीपाला व जीवनावश्यक वस्तूचे भाव काही अंशी कमी झाल्यास महागाईदराला आळा बसणे, वित्तीय तूटींचे प्रमाण कमी येणे, ही अगदी ताजी घडामोड. त्याचे अप्रत्यक्षपणे श्रेय घेण्याचा प्रयत्न सत्ताधारी करतात. मात्र, चार महिन्यापूर्वी ही वित्तीय तूट हाताबाहेर गेली होती, तेंव्हा जागतिक आर्थिक मंदीचे मळभ आणि त्याचे परिणाम अशी कारणे ते पुढे करत होते. आर्थिक विकास वाढवायचा तर त्यासाठी पोषक परिस्थिती निर्माण करण्याची जबाबदारी सरकारची असते. त्यातील सर्वात महत्वाचा भाग म्हणजे सुशासन (गव्हर्नन्स). सुशासनास अभिप्रेत असलेली धोरणात्मक एकवाक्यता आणि सातत्य यांचा अभाव असल्यास एकाच वेळी जर वेगवेगळ्या दिशांनी व्यक्तिला खेचले तर ती व्यक्ति जशी भांबावून जाईल, तशी सरकारची अवस्था झाल्याचे सिद्ध होते.

गेल्या दशकातील भारताचा जी. डी.पी.सरासरी ७ ते ८% नी वाढला. या आर्थिक वृद्धीमुळे एकूण देशातील उत्पन्न (GDP) वाढीबाबत भारताचा जगातील अग्रेसर दहा राष्ट्रामंध्ये क्रमांक लागला व क्रयशक्तीच्या आधारे भारत जगातील तिसरी शक्ती असली हे जारी अभिमानास्पद असले तरी ही प्रगती तळातल्या माणसांपर्यंत पोहचलेली आहे की नाही, याचा विचार होणे आवश्यक आहे याची प्रचिती सर्वांगीण विकासाचा निर्देशांकाच्या परिदृश्यावरून स्पष्ट होते. 'भारत मानव विकास निर्देशांका' च्या बाबतीत २०११ मध्ये ०.४५७ निर्देशांकवर जगात १३४ वा देश आहे. यू.एन.डी.पी प्रकाशित केलेल्या अहवालात सरासरी आयुर्मान, शिक्षण व दरडोई उत्पन्न यांचे परिणाम विकासाच्या निर्देशांकावरून निर्देशित केलेल्या एच.डी.आर. मूल्यामध्ये/ विकासामध्ये भारत उच्च दर्जा गाठणाऱ्या देशांच्या तुलनेत बराच मागे आहे. म्हणून भारतातील आरोग्य, शिक्षण व दारिद्रयाची अलीकडील सध्य स्थिती संकेतांक व यासंबंधीत सरकारचा सार्वजनिक खर्च आणि विकासाच्या स्थितीचा परामर्श विचारात घेऊन अंदाजपत्रकातून देशाचे आर्थिक नियोजन करणे योग्य ठरेल. शिवाय या दृष्टीने विचार करणे उचित ठरेल.

**सर्वसमावेशक विकासाचा : मानवविकास निर्देशांक**

१९९० मध्ये सयुंक्त राष्ट्रसंघ विकास कार्यक्रमांतर्गत सुप्रसिद्ध अर्थशास्त्रज्ञ महबूब-उल-हक यांच्या मार्गदर्शनाखाली मानवी विकास निर्देशांक (H.D.I = Human Development Index) तयार करण्यात आला. या निर्देशांकद्वारे देशाच्या आर्थिक आणि सामाजिक प्रगतीचे मापन करण्यात येते. UNDP १९९० पासून दर वर्षी मानव विकास अहवाल प्रकाशित करते. १९९७ मधील UNDP अहवालात मानवी विकासाच्या संकल्पनेचे स्पष्टीकरण केले आहे. विकसनशील आणि विकसीत देशातील सामाजिक विकासाच्या तुलनात्मक स्थितीचे पद्धतशीर आणि सर्वसमावेशक विश्लेषण करण्याचा प्रयत्न संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP) ने आपल्या मानव विकास अहवालामार्फत केला आहे. या अहवालातील महत्वाचा मुद्दा म्हणजे मानव विकास निर्देशांक होय.

''मानवी विकासाचे मापन ज्या निर्देशांकाच्या सहाय्याने केले जाते, किंवा लोकांची वैयक्तिक प्रगती किती झाली आहे याचे मापन ज्या अंकाच्या सहाय्याने केले जाते त्या निर्देशांकांना मानव विकास निर्देशांक (Human Resource Development Index) असे म्हणतात''.

**मानवी विकासाची रचना :**

मानव विकास निर्देशांक हा बहुमितीय निर्देशांक असून हा तीन विविध सामाजिक निर्देशांकाचा मिळून बनलेला संमिश्र निर्देशांक आहे. आरोग्याच्या मोजमापासाठी सरासरी आयुर्मान, शिक्षणाच्या मूल्यांकनासाठी साक्षरता आणि जीवनमानाच्या मापणासाठी दरडोई देशांतर्गत वास्तव उत्पन्न हे तीन निकष असून मानवविकास निर्देशांक तयार करण्यासाठी तीन निर्देशांकाची कमाल व किमान मूल्ये विचारात घेतली जातात.

**तक्ता क्र १- एच.डी.आर.ची कमाल व किमान मूल्ये**

| अ.नं. | निर्देशांक | कमाल मूल्य | किमान मूल्य |
|---|---|---|---|
| १ | सरासरी आयुर्मान (वर्षे) | ८५ | २५ |
| २ | प्रौढ साक्षरता दर (टक्के) | १०० | ०० |
| ३ | संयुक्त नामांकन अनुपात (टक्के) | १०० | ०० |
| ४ | दरडोई स्थूल देशांतर्गत उत्पादन (अमेरिकन डॉलरबरोबरची खरेदी शक्ती समता) रु. | ४०,००० | १०० |

प्रत्येक उपनिर्देशांकासाठी कमाल व किमान मूल्य ठरविण्यात आले. ते ० ते १०० मध्ये मोजले जाते. वरील तक्ता क्र.१ मधील कमाल मूल्ये देशाची उत्कृष्ठ कामगिरी तर किमान मूल्ये निकृष्ट कामगिरी दर्शवितात. मानवविकास निर्देशांक निश्चित करताना सुरूवातीस परिणाम निर्देशांक काढला जातो.

$$\text{परिणाम निर्देशांक} = \frac{\text{प्रत्यक्ष मूल्य-किमान मूल्य}}{\text{कमाल मूल्य-किमान मूल्य}}$$

या सूत्राचा वापर करून आयुर्मान, साक्षरता आणि दरडोई उत्पन्न यांचा प्रत्येक परिणाम निर्देशांक काढला जातो आणि या तीन निर्देशकांच्या परिणाम निर्देशकांची साधी सरासरी काढली जाते. तो म्हणजे मानव विकास निर्देशांक होय.

$$\text{H.D.I (Human Development Index)} = \frac{\text{L.E.I. + E.A.I. + S.L.I.}}{3}$$

$$\text{मानवविकास निर्देशांक} = \frac{\text{सरासरी आयुर्मान निर्देशांक + सरासरी ज्ञानसंपादन निर्देशांक + सरासरी जीवनमान निर्देशांक}}{3}$$

मानवी विकास निर्देशांकामध्ये सामाजिक व आर्थिक कल्याणाचा विचार करण्यात येत असल्याने हा निर्देशांक अधिक वास्तव व उपयुक्त आहे. मानवीविकास निर्देशांकात वाढ होणे, ही सुधारणा मानली जाते. UNDP निर्देशांकावरून देशाचे चार गट पाडले जातात. त्यामध्ये अति उच्च, उच्च, मध्यम, कमी विकास निर्देशांक, भारत यामध्ये मध्यम विकास निर्देशांक असलेल्या देशांच्या यादीत मोडतो. २००५ च्या मानव विकास निर्देशांकाच्या आधारे वेगवेगळ्या देशांचे वर्गीकरण तक्ता क्र.२ मध्ये दर्शविले आहे.

**तक्ता क्र.२-मानवी विकास निर्देशांकाचे वर्गीकरण**

| अ.नं. | मानवी विकास गट | निर्देशांक | उदा.-देश |
|---|---|---|---|
| १ | उच्च | ०.८ किंवा त्यापेक्षा जास्त | नॉर्वे, अमेरिका, जपान |
| २ | मध्यम | ०.५ ते ०.८ दरम्यान | चीन, भारत, श्रीलंका |
| ३ | कनिष्ठ | ०.५ पेक्षा कमी | पाकिस्तान, बांगलादेश |


ग्लोबल एच.डी.आर. २००८-०९ च्या निर्देशांकाचा दृष्टिक्षेप घेतल्यास भारताचा मानव विकास निर्देशांक (आरोग्य, शिक्षण, जी.डी.पी. इंडेक्स) साऊथ आशिया व जागतिक निर्देशांकाच्या तुलनेत कमी असलेला दिसून येतो. हे सविस्तर परिदृश्य तक्ता क्र ३. व रेखाचित्र क्र. १ वरुन निदर्शनास येईल.

**तक्ता क्र.३- भारत - साऊथ आशिया - जागतिक एच.डी.आर. २००७-०८**

| एच.डी.आर. | भारत | साऊथ आशिया | जग |
|---|---|---|---|
| आयुर्मान निर्देशांक | ०.६३९ | ०.६५१ | ०.७०८ |
| शिक्षण निर्देशांक | ०.६४३ | ०.६२१ | ०.७८४ |
| जी.डी.पी. निर्देशांक | ०.५५३ | ०.५६२ | ०.७६८ |
| एच.डी.आर. निर्देशांक | ०.६१२ | ०.६१२ | ०.७५३ |

वरील तक्ता क्र.३ मधील निर्देशांकचा तुलनात्मक दृष्टिक्षेप रेखाचित्र क्र.१ वरुन निदर्शनास येईल.

**रेखाचित्र क्र.१-भारत - साऊथ आशिया व जागतिक निर्देशांकाशी तुलना**





भारताच्या अलिकडील मानवी विकास निर्देशांकासंबंधीसध्यस्थिती संदर्भात-एच.डी.आर.२०११ मधीलसकेतांकांची तुलना दक्षिण आशिया व जागतिक संकेतांकांशीपुढील तक्ता क्रं.४ मध्ये दर्शविली आहे.

**तक्ता क्रं.४- एच.डी.आर.संबंधीत सकेतांक-२०११**

| देश | सरासरी आयुर्मान (वर्ष) | शिक्षण सरासरी (वर्ष) | शाळेतील संभावित वेळ (वर्ष) | प्रतीव्यक्ती सकल राष्ट्रीय उत्पन्न (डॉलर) |
|---|---|---|---|---|
| भारत | ६५.४ | ४.४ | १०.३ | ३४६८ |
| द.आशिया | ६५.१ | ४.६ | ९.८ | ३४३५ |
| विश्व | ६९.८ | ७.४ | ११.३ | १००८२ |

एच.डी.आर.२०११ च्या तक्ता क्र.४ मधील भारत द.आशिया व विश्व यांच्या संकेतांकांचे तुलनात्मक परिदृश्य पुढील रेखाचित्र क्र.२ वरुन स्पष्ट होते.

**रेखाचित्र क्र.२- भारत द.आशिया व विश्व यांच्या संकेतांकांचे तुलनात्मक परिदृश्य**



एच.डी.आर. २००७-०८ व २०११ मधील सकेतांकाच्या व वरील रेखाचित्र क्र.१ व २ मधील तुलनात्मक परिदृश्याचा दृष्टिक्षेप विचारात घेतल्यास भारताचा एच.डी.आर. आयुर्मान-शिक्षण-व जी.डी.पी. निर्देशांक, दक्षिण आशिया पेक्षा किंचित जास्त असला तरी जागतिक निर्देशांकापेक्षा तुलनात्मक दृष्ट्या कमी आहे. म्हणून भारतातील एच.डी.आर.मूल्य निर्देशांकातील वाढ उपेक्षीत असून सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टीने महत्व असलेल्या एच.डी.आर. निर्देशांक वाढीच्या दृष्टीने लक्ष देणे आवश्यक आहे. म्हणून देशाच्या विकासाचे आगामी आर्थिक नियोजन करताना मानवी विकास निर्देशांक व सरासरी वृद्धीदर यांचा थोडक्यात परामर्श विचारात घेणे उचित ठरेल. कारण केवळ सरासरी वृद्धीदरामध्ये होणारी वेगवान वाढ सर्वसमावेशक व टिकाऊक्षम आहे का ? हे यथार्थ भारताच्या मानवविकास निर्देशांक आणि सरासरी वृद्धीदर यांच्या परिदृश्याचा मातितार्थ विचारात घेतल्यास काय ते स्पष्ट होते.

**भारतातील मानवविकास निर्देशांक आणि सरासरी वृद्धीदर :**


भारताचा वृद्धीदर सरासरी ७ ते ८ % वृद्धीगत होत असला तरी सरासरी आयुर्मान, शिक्षण व दरडोई उत्पन्न समाविष्ट असलेल्या मानवी विकास निर्देशांकावरून भारत उच्च दर्जा गाठणाऱ्या देशांच्या तुलनेत बराच पाठीमागे आहे. ही बाब पुढील तक्ता क्र. ५ मध्ये संकेतांकावरून प्रखरतेने जाणवते.

**तक्ता क्र.५- भारतातील मानवी विकास निर्देशांक आणि सरासरी वृद्धीदर**

| वर्ष | एच.डी.आर.निर्देशांक | भारत देशाचा क्र. | एकूण देश | सरासरी वृद्धीदर |
|---|---|---|---|---|
| १९९० | ०.२९७ | १२१ | १७३ | ५.५ |
| १९९१ | ०.३०८ | १२३ | १६० | १.३ |
| १९९२ | ०.३८२ | १३४ | १७३ | ५.१ |
| १९९३ | ०.४३६ | १३४ | १७३ | ५.९ |
| १९९४ | ०.४४६ | १३५ | १७३ | ७.३ |
| १९९५ | ०.४५१ | १३४ | १७३ | ७.३ |
| १९९६ | ०.४३६ | १३५ | १७४ | ७.८ |
| १९९७ | ०.५४५ | १३८ | १७५ | ४.८ |
| १९९८ | ०.५६३ | १२८ | १७४ | ६.१ |
| १९९९ | ०.५७१ | ११५ | १६२ | ६.४ |
| २००० | ०.५७७ | १२४ | १७३ | ४.३ |
| २००१ | ०.५९० | १२७ | १७५ | ५.८ |
| २००२ | ०.५९५ | १२७ | १७७ | ३.८ |
| २००३ | ०.६०२ | १२७ | १७७ | ८.५ |
| २००४ | ०.६११ | १२६ | १७७ | ७.६ |
| २००५ | ०.६१९ | १२८ | १७७ | ९.४ |
| २००६ | ०.६१९ | १२८ | १७७ | ९.६ |
| २००७ | ०.६१९ | १३४ | १८२ | ९.३ |
| २००८ | ०.५५४ | १३६ | १८७ | ६.७ |
| २००९ | ०.६१२ | १३४ | १८२ | ८.४ |
| २०१० | ०.५१९ | ११९ | १६९ | ९.३ |
| २०११ | ०.५४७ | १३४ | १८७ | ६.८ |

वरील तक्ता क्रं.५ मधीलसंकेतांक विचारात घेऊन भारतातील १९९० ते २०११ पर्यंत मानवी विकास निर्देशांक व सरासरी वृद्धी दराचा तुलनात्मक सविस्तर दृष्टिक्षेप रेखाचित्र क्रं.२ वरुन दृष्टिक्षेपास येईल.

**रेखाचित्र क्रं.३- भारतातील एच.डी.आर. व सरासरी वृद्धीदर-तुलनात्मक दृष्टिक्षेप**




वरील तक्ता क्रं.५ व रेखाचित्र क्रं.३ मधील परिदृश्यावरून निदर्शनास येते की, भारतात सरासरी वृद्धीदरामध्ये ज्या प्रमाणे प्रगती झाली त्या वेगाने मानवी विकास निर्देशांकामध्ये नसून १९९०-२०११ या काळात भारताने सरासरी वृद्धीदरात ७ ते ८% दरानेवाढ केली. परंतु भारताचे एच.डी.आर. मूल्य ०.३०१ वरुन वाढतजाऊन ०.५४७ म्हणजे जवळजवळ दुप्पटीकडे वाटचाल करत आहे. मात्र एच.डी.आर.निर्देशांकातील वाढ अजून उपेक्षणीय आहे. मानवी विकास निर्देशांक हा आर्थिक प्रगतीचा सर्वसमावेशक निर्देशांक मानला जातो. भारतातील एच.डी.आर. मूल्य विचारात घेतल्यास इतर विकसित देशांच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्थेत आर्थिक प्रगती तळापर्यंत प्रभावीपणे पोहोचली पाहिजे. परंतु ती पाहिजे तितकी पोहोचलेली नाही, असे म्हंटले तरी अतिशयोक्तीचे ठरू नये. हे दृश्य मानवी विकास निर्देशांकासंबंधी अलीकडील सध्य स्थितीचा ढोबळ मानानेमागोवा पुढीलकाही ठळक बाबीवरुन निदर्शनास येईल.

- **सरासरी आयुर्मान** - २०११ च्या जनगणणेनुसार भारतीयांचे सरासरी आयुर्मान ६६.८ वर्षे आहे. यात पुरूषांचे सरासरी आयुर्मान ६५.७७ वर्षे तर स्त्रीचे ६७.९५ वर्षे आहे.
- **शिक्षण आणि साक्षरता दर** - २०११ च्या जनगणणेनुसार साक्षरता दर ७४.४ टक्के असून यामध्ये पुरुष साक्षरता दर ८२.१४% तर स्त्री साक्षरता ६५.४६ % आहे. शिक्षणासंबंधी स्थिती विचारात घेतल्यास भारतातील व्यक्तीसरासरी १०.३ वर्षेच शिक्षण घेते. याबाबतची जागतिक सरासरी १५ वर्षे इतकी आहे.
- **दारिद्रय-मूलभूत सेवा आणि रोजगार** - केंद्रीय नियोजन आयोगाच्या आकडेवारीनुसार सन २००४-०५ च्या तुलनेत २०११-१२ मध्ये गरिबांचे प्रमाण २१.०९% असल्याचे सांगितले आहे. भारतात ४० कोटी लोक दारिद्रय रेषेखालील जीवन जगत आहेत. अशा लोकांना दररोज २० रु. इतकेही उत्पन्न मिळत नाही. भारताच्या एकूण लोकसंख्येच्या ११% लोकांना स्वच्छ व शुद्धपिण्याच्या पाण्याच्या प्राप्तीसाठी प्रशासनाच्या सोई अपुऱ्या आहेत. सुसज्य प्रशासनाच्या सोई ७०% लोकांना प्राप्त होत नाहीत.

वस्तुत: आज दारिद्रय दूर करणे व राहणीमानात सुधारणा करण्यासाठी उत्पन्न प्राप्ती महत्वाची असून त्यासाठी रोजगार प्राप्ती हे बहुसंख्य लोकांचे साधन आहे. रोजगार निर्मितीतून अनेक लोकांना उत्पन्न प्राप्त होऊन त्यांचा व्यक्तीगत आणि पर्यायाने देशाचा विकास होण्यास मदत होईल. भारत हे बहुसंख्य लोकसंख्या असणारे एक युवाशक्तीशाली राष्ट्र आहे. परंतु भारतात बेरोजगारी ही अनेक समस्यापैकी एक असून ही आजची शोकांतिका आहे. २००४-०५ मध्ये भारतात बेरोजगारीचा दर ८.२५% होता. लेबर ब्युरो च्या मते २०१०-११ मध्ये बेरोजगारीचा दर ९.८% वाढला व २०१२-१३ मध्ये ९.३% होता तर चीन मध्ये तो ४.१% असून यूएसए मध्ये ८.३% बेरोजगारीचा दर आहे. दिल्लीतील इंस्टिट्यूट फॉर ह्युमन डेव्हलपमेंटने संशोधन करून तयार केलेल्या भारतीय कामगार व रोजगार अहवाल २०१४ (Indain Labour And Employment Report) म्हटले आहे की, भारतात बेकार लोकांपेक्षा रोजगारी लोकांमध्ये गरीबीचे प्रमाण जास्त आहे. हा अहवाल केंद्रीय ग्रामीण विकास मंत्री जयराम रमेश यांनी १५ डिसेंबर, २०१३ रोजी जाहीर केला. या रिपोर्ट मध्ये मागील दशकाचे २०१२-१३ पर्यंत विश्लेषण केले असून, यानुसार भारताची अर्ध्यापेक्षा जास्त रोजगारी लोकसंख्या प्रतिदिन २ डॉलर पेक्षा कमी कमवते.

२०११-१२ मध्ये एकूण रोजगारापैकी तिसरी व्यक्ती पदवीधर किंवा उच्च पदवीधर आहे. बेकारीचे प्रमाण १५-२० वयोगटामध्ये जास्त आहे. रोजगार परिस्थिती निर्देशांक (Employment Situation Index) प्राप्तीमध्ये सात दर्शकांचे मापन करण्यात आले असून त्यामध्ये औपचारिक, अनौपचारिक रोजगार, कामातील सहभागाचा दर, बेरोजगारी, वेतन, संघटन आणि स्वयंरोजगारातील गरिबांच्या घटना इ. चा समावेश आहे. एकंदरीतच अलीकडील ही सर्व स्थिती विचारात घेऊन सर्वसमावेशक विकासाचे उद्दीष्टप्राप्तीच्या दृष्टीने आर्थिक नियोजन करताना सामाजिक विकासासंबंधी प्राधान्यक्रम असणे गरजेचे असून यासंबंधी सार्वजनिक खर्चाचीस्थिती काय दर्शविते? याचे परिदृश्य विचारात घेणे क्रमप्राप्त ठरते. ते तक्ता क्र.६ मधील आकडेवारी व रेखाचत्र क्र.४ वरून सविस्तर स्पष्ट होते.

तक्ता क्र.६


**केंद्र सरकारचा सामाजिक सेवावरील एकूण खर्च (Plan & Non-plan)**

| घटक | एकूण खर्च(%) | | | |
|---|---|---|---|---|
| | २००५-०६ प्रत्यक्ष | २०१०-११ प्रत्यक्ष | २०११-१२ RE | २०१२-१३ RE |
| १. सामाजिक सेवा | | | | |
| a) शिक्षण, खेळ, युवकांच्या व्यवसाय संबंधित | ३.७१ | ४.५६ | ४.३८ | ४.५२ |
| b) आरोग्य व कुटुंब कल्याण | १.७९ | १.९८ | १.९० | २.०६ |
| c) पाणीपुरवठा, घरे इ. | २.०८ | २.३५ | १.९३ | २.०८ |
| d) माहिती आणि वसतीगृह | ०.३० | ०.२१ | ०.१९ | ०.१७ |
| e) एससी, एसटी, ओबीसी कल्याणासंबंधी | ०.३३ | ०.५८ | ०.६४ | ०.६१ |
| f) मजूर आणि रोजगार | ०.२५ | ०.२४ | ०.२३ | ०.२८ |
| g) मूलभूत सेवा आणि आहार | ०.८४ | १.०१ | १.१९ | १.२५ |
| h) वायव्य-पूर्व क्षेत्र | ०.०० | ०.०२ | १.६५ | १.८८ |
| i) इतर सामाजिक सेवा | ०.४० | १.६६ | ०.२१ | ०.१९ |
| एकूण | ९.८९ | १२.६१ | १२.३१ | १३.०४ |
| २. ग्रामीण विकास | ३.१२ | ३.५१ | २.०७ | २.७४ |
| ३. प्रधानमंत्री ग्राम समृद्ध योजना (PMGSY) | ०.८३ | १.८७ | १.५२ | १.६१ |
| ४. सामाजिक सेवा, ग्रामीण विकास आणि PMGSY | १३.७५ | १८.०० | १६.७९ | १७.३९ |
| ५. केंद्र सरकारचा एकूण खर्च (%) | १००.०० | १००.०० | १००.०० | १००.०० |

स्त्रोत: आर्थिक सर्वेक्षण अहवाल २०१२-१३, टीप: RE=Revised Estimate, BE= Budget Estimate

तक्ता क्र.६ मधील सामाजिक विकासाच्या खर्चासंबंधी संकेतांकांचा चित्रित स्वरुपातील परिदृश्य पुढील रेखाचित्र क्र.४ वरून सविस्तर दृष्टिक्षेपास येत आहे.

**रेखाचित्र क्र.४- केंद्र सरकारची सामाजिक सेवासंबंधी खर्चाची स्थिती**




केंद्र सरकारचा एकूण खर्च १००% शी पायाभूत मानून तक्ता क्र. ६ मधील आकडेवारी व या सांकेतिक माहितीचे रेखाचित्र क्र.४ विचारात घेतल्यास सरकारचा सामाजिक सेवावरील खर्च कमी असल्याचे दिसते तसेच सामाजिक सेवा, ग्रामीण सेवा व PMGSY यांचा एकत्रित एकूण खर्चही कमी असल्याचे दिसते. परिणामी भारतातील सामाजिक विकास इतर विकसित देशाच्या तुलनेत कमी असल्याचे मानव विकास निर्देशांकातील मूल्यावरून स्पष्ट होते. म्हणून ही बाब विचारात घेऊन देशाचे आगामी आर्थिक नियोजन करताना सामाजिक व मानवी विकाससंबंधी घटकांना प्राधान्यक्रम देणे अगत्याचे ठरेल.

**निष्कर्ष :**

मानवाच्या अन्न-वस्त्र-निवारा या मूलभूत असणाऱ्या गरजांबरोबर आज शिक्षण, आरोग्य, स्वास्थ्य यांनाही तितकेच अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले असून अशा गरजांच्या पूर्ततेसाठी पुरेसे उत्पन्न म्हणजेच अर्थप्राप्ती हा महत्वाचा घटक बनला आहे. आर्थिक नियोजन करताना व्यक्तीगत असो वा सार्वजनिक पातळीवर असो, एक प्रश्न निश्चित उपस्थित होतो तो म्हणजे, मर्यादित असणाऱ्या साधनसामुग्रीतून अमर्यादित गरजा कशा पूर्ण कराव्यात? पैसा हा मर्यादित असून मानवाच्या पर्यायाने देशाच्या गरजा या अमर्यादित आहेत. अशा वेळी आर्थिक नियोजन करताना पायाभूत व मूलभूत गरजाना अग्रक्रम देऊन साध्य करायची उद्धिष्ट्ये ठरवावी लागतात. ही उद्धिष्ट्ये साध्य करण्यासाठी 'अर्थसंकल्प' हे साधन म्हणून वापरावे लागते. या दृष्टीने आगामी आर्थिक नियोजनासाठी 'सर्वसमावेशक व टिकाऊक्षम विकास' हे उद्धिष्ट साध्य करण्यासाठी आगामी अंदाजपत्रकात मानवी विकाससंबंधी निर्देशकांना अग्रक्रम देऊन हे उद्धिष्ट साध्य करणे आगामी अर्थमंत्र्यांपुढे आव्हान असणार आहे. भारताचा १९९०-२०११ या कलावधीत सरासरी वृद्धीदर ७ ते ८ टक्के राहिला. परंतु ही आर्थिक प्रगती देशातील तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचली का याचे उत्तर संधिग्धच राहते. जर आर्थिक प्रगतीची पाळेमुळे तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवायची असतील तर एच. डी.आर.संबंधी घटकांच्या सामाजिक खर्चाचा आर्थिक नियोजनाच्या दृष्टीने गांभीर्याने विचार करावा लागेल. भारताचे एच.डी.आर.मूल्य१९९० ते २०११ या कालावधीत ०.३०१ वरून ०.५४७ इतके वाढले आहे. यामध्ये अजून वेगाने सुधारणा होणे आवश्यक असून त्या दृष्टीने शिक्षण, आरोग्य, दरडोई उत्पन्न वाढवण्याच्या कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबाजवणी, दारिद्रय कमी करणे पायाभूत सुविधा, ग्रामीण विकास, कृषी विकास यासारख्या मूलभूत व पायाभूत विकासाच्या निर्देशांकाचा आर्थिक नियोजन करत असताना प्राधान्य असावे लागेल. विशेषत: त्या दृष्टीने मानवी विकास निर्देशांक सर्वसमावेशक निर्देशांक मानला असून या निर्देशांकामध्ये सामाजिक व आर्थिक कल्याणांचा विचार करण्यात येत असल्याने ते निर्देशांक देशाच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे मानले जातात. परंतु भारताच्या मानवी विकास निर्देशांकातील वाढ उपेक्षीतच राहिली आहे. मात्र भारतात आर्थिक नियोजन करताना मानवी विकाससंबंधी घटकांच्या विकासावरील देशांतर्गत सार्वजनिक खर्चाचे प्रमाण कमी आहे. विशेषत: इतर विकसित देशाच्या तुलनेत हे प्रमाण कमी आहे. परिणामी भारत मानवी विकास निर्देशांकाच्या सूचीत बराच मागे राहिला आहे. भारताच्या आर्थिक विकाससंबंधी थोडक्यात असे म्हणता येईल की, भारतात वेगवान परंतु असंतुलित विकासाची स्थिती जाणवते. भारताला उच्च मानव विकास निर्देशांक गटात प्रवेश करण्यासाठी आगामी आर्थिक नियोजन करताना सर्वसमावेशक विकासाची प्रमुख तरतूदीची क्षेत्रे म्हणून मानव विकास निर्देशांकासंबंधी घटकांच्या विकासास प्राधान्यक्रम देणे आवश्यक आहे. तेंव्हा मानव विकास निर्देशांकात सुधारणा होईल व जेंव्हा मानव विकास निर्देशांकात वाढ होते तेंव्हा

ती सुधारणा मानली जाईल. तेंव्हा भारताचा 'वेगवान, सर्वसमावेशक व टिकाऊक्षम विकास' हे १२ व्या पंचवार्षिक योजनेचे उद्धिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने, आगामी आर्थिक नियोजन करताना 'अर्थसंकल्प' हे साधन म्हणून प्रभावीपणे वापरले जाईल यात शंका नाही !

**संदर्भ सूची :**


- Gopalkrushna B.V. and D.S.Leelavathi (Dec.2011) ``Infrastructure And Human Development In India : An Interstate Comparision" Journal Of Global Economy, Vol. 07 No.4
- Manishkumar and Naresh Singla ``Regional Desparities In India : A Study Of Pre-and Post Reform Periods Journal Of Man And Development, Vol. xxxv No.3 Sept-2013
- Rais Ahmad ``Co-Operatives And Rural Development In India" forward by prof. M.S. Swaminathan", New Century Publications, New Delhi, India.
- Sampada Magzine (Dec.2013) inclusive growth sensible economic mantra, MCCIA, Pune
- दत्त आणि सुंदरम 'भारतीय अर्थव्यवस्था', ६६ वी आवृत्ती, एस चांद प्रकाशन, नवी दिल्ली ११००५५.
- वित्त मंत्रालय भारत सरकार द्वारा पुरस्कृत, संपादक मंडळ ''भारतीय अर्थव्यवस्था ''प्रतियोगिता साहित्य'' २०१२ न्यू दिल्ली
- युनिक बुलीटीन फेब्रुवरी २०१४ पुणे ४११००४
- 'योजना' विकास समर्पित मासिक फेब्रुवरी २०१४ माहिती व प्रसारन मंत्रालय न्यू दिल्ली
- https://www.google.co.in/?gfe_rd=ctrl&ei=CdkeU6naF-eW8QepqIDQCA&gws_rd=cr#q=human+development+index+pdf+1990+to+2011
- https://www.google.co.in/?gfe_rd=ctrl&ei=CdkeU6naF-eW8QepqIDQCA&gws_rd=cr#q=planning+commission+of+india+in+1990+to+2012+pdf



(***चंद्रकांत पाटील*** - *पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय, सांगली येथे अर्थशास्त्र विभागाचे सहाय्यक अधिव्याख्याता. संपर्कासाठी ईमेल* - chandrakant.patil08@rediffmail.com*)*






विकास समर्पित मासिक
**योजना**
नियमित वाचा, वर्गणीदार व्हा.

**प्रकाशन विभागाची नवी पुस्तके**

१. प्राचीन भारतातील प्रेक्षागृहे (मराठी) ₹ ९५/-

**अन्य काही पुस्तके**

१. महादेव गोविंद रानडे (मराठी) ₹ २५/-
२. आपला राष्ट्रीय ध्वज (मराठी) ₹ ११०/-




# करविषयक सुधारणा आणि जीएसटी भविष्यातील सुधारणांसाठी आव्हाने

– महेश पुरोहित

स्वातंत्र्योत्तर काळापासून भारताने नेहमीच योजनाबद्ध आर्थिक विकासाचा मार्ग अनुसरला आहे. प्रारंभी भारतीय आर्थिक धोरणाचे प्राथमिक उदिद्ष्ट हे सामाजिक न्यायासह जलदगतीने विकास घडवून आणणे हेच होते. हे उद्दिष्ट लक्षात घेता, योजनाबद्ध आर्थिक विकासाच्या कालावधीत, एकंदर आर्थिक विकासाच्या दरावर आर्थिक धोरणाचा महत्वपूर्ण परिणाम झाला. मात्र एकूण आर्थिक विकासाचा वेग अपेक्षेप्रमाणे चांगला नव्हता आणि अनेक आघाड्यांवर परिणाम अपेक्षेनुसार आले नाहीत. याच परिस्थितीत सापडलेल्या काही देशांनी या कालावधीत वाढीचा उच्च दर गाठला आणि विकासाच्या मार्गावर भारताला खूपच मागे टाकले. १९९१ मध्ये म्हणजे देशाने रचनात्मक आर्थिक सुधारणा कार्यक्रमाचा स्वीकार करण्यापूर्वी विकासाचा संथ वेग आणि जमाखर्चाची वाईट स्थिती यामुळे आर्थिक स्थैर्य कोसळण्याच्या अवस्थेतच होते.

**करविषयक सुधारणा**

१९९१ पासून आर्थिक धोरणाचा मुख्य भर हा करविषयक धोरण आणि प्रशासनात एकंदरीत सुधारणा राबवण्यावर दिला गेला. सुरूवातीला प्रत्यक्ष करांविषयक सुधारणांचे लक्ष्य हे कररचना सुटसुटीत करून त्यात व्यवहार्यता आणणे, उच्च प्राप्तीकर आणि इतर करांच्या वर्गवारीत कपात करणे आणि करांमधील विखुरलेपण दूर करून एकसंध बनवणे व कर कमी करणे इ. बाबींपुरतेच केंद्रित होते. तरीसुद्धा, उत्पन्न आणि मालमत्तेवरील सर्व मूळ करांमध्ये झालेल्या अनेक बदलांमुळे आज कररचना अत्यंत गुंतागुंतीची बनली आहे. परिणामी प्राप्तीकराचा एकंदर मसुदाच नव्याने तयार करण्याचे प्रयत्न सुरू झाले. प्रत्यक्ष कर संहिता या नावाने ओळखला जाणाऱ्या सुधारित कायद्यांमध्ये प्रत्यक्ष करविषयक उदा. प्राप्ती कर कायदा, लाभांश वितरण कर, अनुषंगिक फायद्यांवरील कर, संपत्ती कर या सर्व कायद्यांचे एकत्रीकरण करण्यात आले आहे, ज्याद्वारे आर्थिकदृष्ट्या परिणामकारक, कार्यक्षम आणि सर्वांना समान न्याय देणारी म्हणजेच समन्याया (equitable) अशी प्रत्यक्ष कर व्यवस्था प्रस्थापित केली जाऊ शकेल.

अप्रत्यक्ष करांच्या बाबतीत, त्यांच्या दरांमधील तफावत कमी करण्याची, करांचे सुसूत्रीकरण करण्याची तसेच केंद्रीय उत्पादन शुल्क आणि विक्री करात मूल्यवर्धित कर व्यवस्थेचा (Value Added Tax (VAT) समावेश करण्याच्या दृष्टीने सुलभ होईल, अशी पावले उचलण्यात आली. दुहेरी व्हॅट ची अंमलबजावणी हे लक्षणीय यश आहे. करांचा व्यवसायावर पडणारा प्रभाव (cascading effect) कमी करून व्यवसाय अधिक स्पर्धात्मक बनवण्यास त्याची मदत झाली आहे. मात्र ही फक्त अल्पमुदतीची सुधारणा होती. कर व्यवस्थेतील त्रुटीं दुहेरी व्हॅट लक्षात घेत नाही.

दुहेरी व्हॅट अजूनही खालील दोषांपासून मुक्त झालेले नाही.

१. केंद्रीय व्हॅट म्हणजेच सेनव्हॅटमुळे एखाद्या वस्तुशी संबंधित पारिभाषिक मुद्दे उपस्थित होतात. उदा. ती वस्तू एखाद्या विशिष्ट मूल्य गटात मोडते का व त्यातूनच तिचे मूल्य ठरवण्याबाबत मुद्दे उपस्थित होतात. ज्यातूनच मोठ्या प्रमाणावर खटले दाखल केले जात आहेत.
२. दुहेरी व्हॅट चा पाया मर्यादित असल्याने कर व्यवस्था निष्पक्षपाती राहत नाही आणि तरीही तशीच अकार्यक्षमरित्या अंमलात राहते.
३. सेवांवरील कर हा फक्त केंद्र सरकार आकारते आणि वस्तू करावर तो अवलंबून नसतो. संयुक्त कंत्राट किंवा भाडेपट्टी कंत्राटाचा भाग म्हणून वस्तूंचा पुरवठा केला जात असेल तर कर आकारणीत अडचणी उद्भवतात.
४. विक्री करात समाविष्ट असलेला सेन VAT आणि सेन VAT अंतर्गत विक्री कराचा बदलता प्रभाव चालू राहतोच. केंद्रीय विक्री करालाही ही गोष्ट लागू आहे.
५. सध्याची व्यवस्था ही आयातीला अनुकूल अशी पक्षपाती असून आयातीसाठी कच्च्या मालावरील अदृश्य कर गृहित धरलेले नाहीत.
६. केंद्र व राज्य या दोन्ही स्तरावरील कर प्रशासन अत्यंत गुंतागुंतीचे आणि किचकट आहे.

वरील दोष लक्षात घेऊन सध्या केंद्र व राज्य सरकारांकडून आकारले जाणारे दुहेरी VAT, सेवा कर आणि अन्य काही वस्तूकरांची जागा घेणारा वस्तू व सेवा कर (GST) लागू करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.

**जीएसटीची रचना**

२००९ मध्ये जीएसटीची विस्तृत चौकट तयार करण्यासाठी राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या उच्चाधिकार समितीने एक संयुक्त कार्यकारी गट स्थापन केला. या गटाच्या मते, केंद्र सरकारसाठी असलेल्या जीएसटीमध्ये सेनव्हॅट (केंद्रीय उत्पादन शुल्कासह), पान मसाला, पेट्रोलियम व तंबाखूजन्य पदार्थांवर लावलेले अतिरिक्त उत्पादन शुल्क, १९५७ च्या अतिरिक्त उत्पादन शुल्क कायद्यांतर्गत (विशेष महत्वाच्या वस्तू) लावलेले अतिरिक्त उत्पादन शुल्क, काऊंटरव्हेलिंग शुल्काच्या स्वरूपातील अन्य अतिरिक्त सीमा शुल्क व घरगुती आणि आयात मालाला समान संधी देण्यासाठी आयात मालावर लावलेले अन्य घरगुती कर (ज्यांची सध्या सीमा शुल्क म्हणून वर्गवारी करण्यात आली आहे); केंद्र सरकारने लावलेले अधिभार आणि वाहनांमध्ये वापरले जाणारे स्पिरीट व हाय स्पीड डिझेलवरील विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्क यांचा समावेश होतो. राज्यांद्वारे आकारण्यात येणाऱ्या करांमध्ये राज्य सरकारचा व्हॅट, खरेदी कर, करमणूक कर, चैनीच्या वस्तूंवरील कर आणि जकातीच्या जागी नसलेला प्रवेश कर यांचा समावेश होतो.

कच्चे पेट्रोलियम व पेट्रोलजन्य पदार्थांना जीएसटीतून वगळण्याचा निर्णय परिवर्तनशील पद्धतीच्या करांतून मोठी साधनसंपत्ती उभारण्यात येऊ शकेल, या अनुमानावर आधारित आहे. यामुळे भांडवली मालासह अन्य कच्च्या मालावर व्यापक कर लावले जाऊन एकंदरीत पेट्रोलियम क्षेत्राच्या कार्यक्षमतेवरच त्याचा विपरित परिणाम होईल. म्हणूनच, संपूर्ण पेट्रोलियम क्षेत्रच जीएसटी अंतर्गत आणून अधिक उत्पन्न उभे करण्याची गरज भासल्यास जादा उत्पादन शुल्क व विक्री कर आकारावा, असे सुचवण्यात आले.

तंबाखूच्या बाबतीत ती जीएसटीचा पायाभूत भाग असेल, असा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. केंद्र सरकारला आपल्या योजनांसाठी जास्तीचे कर स्त्रोत मिळवण्याच्या दृष्टीने विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्क आकारू शकेल पण राज्य सरकारे कोणतेही जादा कर लावणार नाहीत. इथे एक प्रश्न उभा राहतो. केंद्र आणि राज्यांसाठी कर रचनेचा पाया असा असमान का असावा ?

दोघांनीही जो काही कर रचनेचा मूळ पाया मान्य केला असेल, त्यानुसार प्रस्तावित जीएसटीमध्ये दोन घटक असतील - सीजीएसटी (केंद्र सरकारने लावलेले कर) आणि एसजीएसटी (राज्य सरकारांनी लावलेले कर). केंद्र व राज्य सरकारसाठी त्याचे महसूली उत्पन्नावर होणारे परिणाम, एकूण करांचा बोजा आणि कराची सर्वसाधारण स्वीकारार्हता हे लक्षात घेऊन या दोन्ही घटकांचे दर ठरवण्यात येतील.

यासंदर्भात उच्चाधिकार समितीने (EC) सुरूवातीला असे सुचवले होते की, हा दर १५ टक्क्यांच्या जवळपास असावा - सीजीएसटीद्वार आकारण्यात येणारा ७टक्के दर असेल व एसजीएसटीचा ८ टक्के दर राहील. सध्याचा राज्य व्हॅटसाठी आकारण्यात येणारा कर १३.५ टक्के असून (५ टक्क्यांच्या पेक्षा खालच्या वर्गवारीतील व १३.५ टक्क्यांच्या वरच्या वर्गवारीतील दरांसह) सेनव्हॅटसाठी तो १० टक्के तर सेवा कर १२ टक्के आहे, या अनुमानावर आधारित हा दर काढला होता.

दुसरीकडे केंद्र सरकारने जीएसटी लागू करण्याच्या पहिल्या वर्षी दरांची

त्रिस्तरीय वर्गवारी असेल, असा प्रस्ताव मांडला होता. जीवनावश्यक वस्तूंवरील ६ टक्के, सेवांवर ८ टक्के तर १० टक्के प्रमाण दर असेल. दुसऱ्या वर्षी प्रमाण दर ९ टकक्यांवर आणण्यात येईल आणि त्यानंतरच्या वर्षांत ८ टक्के असेल. याच पद्धतीने जीवनावश्यक वस्तूंवरील ६ टक्के कर हा तिसऱ्या वर्षी ८ टक्के होईल. अशा तऱ्हेने तिसऱ्या वर्षी जीएसटीचा एकच दर असेल.

राज्यांमध्ये मात्र या पैलूवर मतभेद आहेत. वस्तुत: काही राज्यांच्या अर्थमंत्र्यांनी परदेशांचा नुकताच दौरा करून आल्यावर उच्चाधिकार समितीने असे मत व्यक्त केले की, युरोपीय देशांमध्ये व्हॅट पद्धतीत वेगवेगळे करांचे दर असताना आपल्या देशात तशी व्यवस्था आणणे इतके अवघड का असावे ?

सध्याच्या दुहेरी व्हॅट अंतर्गत आंतरराज्य व्यापार हा मूळ स्थानाधारित आहे. म्हणजेच निर्यात करणाऱ्या राज्याकडून केंद्रीय विक्री कर कायदा (सीएसटी) १९५६ नुसार गोळा केला जातो. मूळ आधारित सीएसटी हा जीएसटीशी सुसंगत नसल्याने त्याची जागा निर्यात करण्यात यावयाच्या स्थानावर आधारित एकात्मिक जीएसटीने घ्यावी, असा प्रस्ताव आहे. त्यामुळे आयात करणाऱ्या राज्यांत माल पाठवताना कोणताही निर्यात कर नसेल. भांडवली वस्तूंसह सर्वच माल कोणत्याही कराविना रवाना केला जाईल. तसेच निर्यातीवर शून्य टक्के कर असेल. या मुद्यावर यापूर्वी काही प्रमाणात समझोता झाला असला तरी वेगवेगळ्या आंतरराज्य करपद्धतींच्या नमुन्यांचा जादूचा पेटाराच उघडला आहे, असे दिसते. हे दुर्दैवी आहे आणि त्याचा एकदाच सोक्षमोक्ष लावला गेला पाहिजे.

**घटनात्मक दुरूस्त्या**

संविधानातील सध्याच्या तरतुदींनुसार, केंद्र सरकारला उत्पादन क्षेत्राशिवाय अन्य क्षेत्रांमध्ये कर लावण्याचा अधिकार नाही तर राज्यांना सेवा कर आकारण्याचा अधिकार नाही. म्हणून जीएसटी लागू करण्यासाठी घटनात्मक दुरूस्ती करणे, ही पूर्वअट आहे. हे लक्षात घेऊनच केंद्रीय अर्थमंत्रालयाने २२ मार्च २०११ रोजी ११५ वे दुरूस्ती विधेयक लोकसभेत पटलावर ठेवले. या दुरूस्ती विधेयकापूर्वी उच्चाधिकार समितीच्या ऑगस्ट ते ऑक्टोबर २०१० दरम्यान झालेल्या तीन विभिन्न बैठकांमध्ये केंद्र सरकारने पाठवलेल्या घटना दुरूस्ती विधेयकाच्या तीन मसुद्यांचा विचार केला होता, हे नमूद करणे योग्य ठरेल. विधेयकातील तरतुदींबाबत राज्यांना काही गंभीर स्वरूपाचे आक्षेप होते आणि ते खाली दिले आहेत.

प्रथम, करांचा दर, सवलती आणि मर्यादा यांसारख्या मुद्यांवर शिफारशी करण्यासाठी जीएसटी मंडळाची स्थापना करण्याची योजना प्रस्तावित घटनादुरूस्ती विधेयकात केली आहे. मंडळ स्थापन करण्याचे अधिकार विधेयकाने राष्ट्रपतींना दिले असून केंद्रीय अर्थमंत्री त्याचे अध्यक्ष असतील व केंद्रीय महसूल राज्यमंत्री तसेच सर्व राज्यांचे अर्थमंत्री त्याचे सदस्य असतील. मात्र मंडळाच्या सर्व पैलूंसंदर्भात राज्यांना समान अधिकार असावेत, अशी राज्यांची भावना आहे. राज्यांनी उपस्थित केलेले हे आक्षेप विचारात घेऊन आम्ही असा प्रस्ताव मांडला की, प्रस्तावित जीएसटी मंडळ विद्यमान उच्चाधिकार समितीच्या धर्तीवर स्थापन करण्यात यावे, ज्या समितीने दशकभरापासून कर पद्धतीत सुधारणा लागू करण्याची लक्षणीय कामगिरी केली आहे. त्या नुसार प्रस्तावित केंद्रीय अर्थमंत्री आणि राज्ये व केंद्रशासित प्रदेशांचे अर्थमंत्री यांचे मिळून जीएसटी मंडळ स्थापन केले जावे. कोणताही बदल केंद्र व राज्यांवर सारखाच परिणाम करणारा असल्याने केंद्राच्या महसूल हिताची त्यात आपोआपच काळजी घेतली जाईल.

दुसरे, तंटे सोडवण्यासाठी जीएसटी तंटा निवारण प्राधिकरण स्थापन करण्याची तरतूद विधेयकात आहे. केंद्र अथवा राज्य सरकारांनी जीएसटी मंडळाच्या शिफारशीं डावलून निर्णय घेतल्यास त्यातून निर्माण होणारे तंटे सोडवण्यासाठी एक अध्यक्ष व दोन सदस्य त्यात असणार आहेत. अशा स्वरूपाच्या प्राधिकरणाची खरोखरच गरज आहे का, याबाबत राज्यांनी गंभीर आक्षेप घेतले आहेत.

तिसरे, जीएसटीतून पेट्रोलियम पदार्थांना वगळण्याच्या निर्णयाचा फेरविचार करायला हवा, हा ही राज्यांचा मुद्दा आहे. करांचा पाया व्यापक करण्यासाठी पेट्रोलियम पदार्थांना जीएसटीच्या परिभाषेत आणण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. या वस्तूंना सध्या जीएसटी लागू केला नसला, जीएसटीची परिभाषा व घटनादुरूस्ती विधेयकात या वस्तूंना जीएसटी कक्षेतून वगळल्यामुळेही व्यवस्था काटेकोर बनणार आहे. भविष्यात, केंद्र व राज्य सरकारांनी या वस्तूंवर कर लावण्याचा निर्णय घेतला तर त्यासाठी आणखी एका घटनादुरुस्तीची गरज लागेल. भविष्यकालीन दृष्टीने, करांचा विस्तार घटनेच्या बंधनात जखडून ठेवणे शहाणपणाचे ठरणार नाही.

वर उल्लेख केलेल्या मुद्यांवर योग्य निर्णय घेण्यासंदर्भात केंद्र व राज्य सरकारांमध्ये सहमती तयार होईल, अशी आशा व्यक्त करण्यात आली आहे.

**जीएसटीचे प्रशासन**

जीएसटीचे प्रशासन करण्याबाबत अधिकाराचा मुद्दा हा त्रासदायक ठरला आहे. उच्चाधिकार समितीने नियुक्त केलेल्या जीएसटीवरील संयुक्त कार्यकारी गटाने अशी सूचना केली होती की, ठरवून दिलेल्या करमर्यादेच्या खालील करदाते हे दैनंदिन प्रशासकीय बाबींसाठी (जसे की, नोंदणी, वसुली व सीजीएसटी आणि एसजीएसटीसंदर्भात आयसीटीच्या बाबी) राज्यातील अधिकाऱ्यांना जबाबदार राहतील आणि त्या ठरवून दिलेल्या उलाढालीच्या वरती कर भरणारे करदाते केंद्र व राज्यातील दोन्ही अधिकाऱ्यांना जबाबदार असतील.

उच्चाधिकार समितीने या मुद्यांचा आणखी पुढे जाऊन विचार केला व ए मॉडेल अँड अ रोड मॅप फॉर जीएसटी इन इंडिया यात आपले मुद्दे मांडले. त्यानुसार प्रशासकीय कामांची जबाबदारी वस्तू किंवा सेवांच्या एकूण उलाढालींच्या ठरवून दिलेल्या मर्यादेवर आधारित असेल.

वस्तूंची दीड कोटी रुपयांपर्यंतची एकूण उलाढाल फक्त राज्यांवर सोपवली जाईल.

सेवांची दीड कोटी रुपयांपर्यंतचे एकूण उलाढाल ही फक्त केंद्र सरकारच्या अखत्यारीत येईल.

दीड कोटी रुपयांपेक्षा जास्तीची उलाढाल ही दोन्ही सरकारांकडे सोपवण्यात येईल- सीजीएसटीसाठी केंद्र सरकारकडे तर एसजीएसटीच्या प्रशासनासाठी राज्य सरकारकडे.

जीएसटी प्रशासनासाठी तयार करण्यात आलेली व वर उल्लेख केलेली रचना सरकारच्या दोन्ही स्तरांचा सहभाग आवश्यक करणारी असेल, इतकेच नव्हे तर केंद्र व राज्यातील कर प्रशासनातील अधिकारी व्यापारी यांच्यातील संवाद अनिवार्य करणारी असेल.

तरीही करदात्यांची सोय आणि कर व्यवस्थेचे पालन करण्यासाठीचा खर्च कमीत कमी व्हावा, ही तत्वे लक्षात घेऊन सर्व प्रशासकीय प्रक्रियांमध्ये दोन्ही सरकारांना गुंतवण्यापेक्षा केंद्र व राज्य सरकारांवर विशिष्ट जबाबदारी सोपवणे अधिक व्यवहार्य ठरेल, असे सुचवण्यात आले.

यासाठी जीएसटी व्यवहार्य प्रशासनासाठी खालील आराखडा प्रस्तावित करण्यात आला आहे.

प्रथम, जीएसटी विभागाची (सीजीएसटी आणि एसजीएसटी दोन्ही) दोन्ही स्तरांवर संपूर्ण फेररचना केली पाहिजे. केंद्र व राज्य स्तरावरील प्रत्येक कर विभागाची जबाबदारी, उत्तरदायित्व आणि अधिकार प्रस्थापित होईल, या पद्धतीने हे केले जावे.


## Subscription Coupon

**[For New Membership / Renewal / Change of Address]**

I want to subscribe to :

**Yojana** : 1 Yr. **Rs. 100/-;** 2 Yrs. **Rs. 180/-;** 3 Yrs. **Rs. 250/-**

(Circle the period of subscription)

DD / MO No. ____________ date ____________

Name (in block letters) : ____________

Subscriber profile : Student / Academician / Institution / Others

Address : ____________

PIN : □□□□□□

Please allow us 4 to 6 weeks to the despatch of the first issue.

P.S. : For Renewal / change in address, please quote your subscription number.

दुसरे, केंद्रीय स्तरावर अधिकाऱ्यांची मर्यादित संख्या लक्षात घेऊन त्यांना मोठ्या संख्येने असलेल्या व्यापाऱ्यांच्या सीजीएसटी आणि एसजीएसटी संबंधित व्यवहारांवर देखरेख करण्यासाठी विशिष्ट जबाबदारी देण्यात यावी, असे प्रस्तावित करण्यात आले आहे. व्यापाऱ्यांची नोंदणी, कराचा भरणा आणि विवरणपत्रे जमा करण्यासारख्या दैनंदिन कामकाजाची जबाबदारी संपूर्ण राज्याना देण्यात यावी. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, व्यापारी जेथे राहत असेल तेथे त्यांची नोंदणी होऊन तेथेच तो कराचा भरणा करेल. साधारणपणे, व्यापारी एकाच कर अधिकाऱ्याशी संवाद साधेल.

तिसरे, नोंदणीकृत व्यापाऱ्याने भरलेला कर संबंधित सरकारच्या बँक खात्यात जमा होईल. म्हणजे, एसजीएसटी करापासून आलेले उत्पन्न हे राज्य सरकारच्या तर सीजीएसटी करातून जमा झालेले उत्पन्न केंद्र सरकारच्या खात्यात जमा होईल.

चौथे, नव्या व्यवस्थेत कागदपत्रांची फेरपडताळणी ही मजबूत केली गेली पाहिजे. योग्य फेरपडताळणी अभावी व्यापारी कर भरणे टाळतात आणि करपात्र विक्रीवर अनावश्यक सवलत लाटतात. फ्रान्सच्या धर्तीवर केंद्रीय तसेच प्रादेशिक स्तरावर करचुकवेगिरी विरोधी विभाग स्थापन करून करबुडवेगिरी रोखता येऊ शकते. फ्रान्ससारख्या देशांमधील अनुभवांच्या आधारे, एसजीएसटी आणि सीजीएसटी अधिकाऱ्यांमध्ये जबाबदारी विभागून देता येऊ शकते, असे सुचवण्यात आले. प्रथम उल्लेखित अधिकारी राज्यांमधील फेरपडताळणीच्या मुद्यांमध्ये तर नंतर उल्लेख करण्यात आलेले अधिकारी आंतरराज्य आणि आंतरदेशीय शाखा असलेल्या कर प्रकरणांमध्ये लक्ष घालतील.

पाचवे, करदात्याची प्रत्यक्ष वैधानिक करपात्र जबाबदारी आणि त्याने भरलेला कर यातील तफावत कमी करण्यासाठी त्याच्या आर्थिक व्यवहारांची तपासणी करणे आवश्यक आहे. म्हणून, वस्तू व सेवांच्या उलाढालीनुसार वर्गवारी करण्यात आलेले विभिन्न प्रकारचे करदाते आणि त्यांचे विभिन्न स्वरूपाचे आर्थिक व्यवहार यांचा अंतर्भाव होईल, या दृष्टीने योग्य अशा लेखा तपासणीची गरज आहे. तसेच कर बुडवणाऱ्यांना ओळखून त्यांचा योग्य बंदोबस्त करण्यासाठी विविध प्रक्रियांचा त्यात समावेश असावा.

जीएसटी लेखा तपासणीत (मग ते सीजीएसटी असो अथवा एसजीएसटी) राज्याराज्यांतील मुद्यांसह स्थानिक बाबीही गुंतलेल्या असल्याने लेखातपासणीची जबाबदारी सीजीएसटी आणि एसजीएसटी दोन्ही अधिकाऱ्यांवर दिली जावी. सर्वसाधारणपणे, आंतरराज्य प्रकरणे ही सीजीएसटी च्या अधिकाऱ्यांनी घ्यावीत. यामुळे प्रकरणांची निवड करताना एसजीएसटीचे उच्च स्तरीय

Yojana : Published in Hindi, English, Urdu, Tamil, Telugu, Malayalam, Kannada, Gujrati, Marathi, Punjabi Bengali, Assamese & Oriya

Send your subscription by DD / MO in the name of Director, Publications Division, addresses to :

**Advertisement & Criculation Manager, Publications Division, East Block-IV, Level VII,**
**R.K. Puram, New Delhi 110 066. Tel. : 6105590; Fax : 6175516 / 6193**
**Subscriptions wil arise also be accepted at our sales emporia:**

● Hall No.196, Old Secretariat, **Delhi** Ph.011-3968906 ● Rajaji Bhavan, Besant Nagar, **Chennai,** Ph.: 044-4917673 ● 8, Esplande East, **Kolkata** Ph: 033-2488030 ● Bihar State Co-operative Bank Building, Ashoka Rajpath, Patna. Ph.: 0612-653823 Press Road **Thiruvanthapuram** Ph.: 0471-330650 27/6 ● Ram Mohan Rai Marg, **Lucknow** Ph.: 0522-208041 ● C-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, **Navi Mumbai** ● State Archaelogical Museum Building, Public Gardens. **Hyderabad** Ph.: 040-236393 ● 1st Floor, F-Wing, Kendriya Sadan, Koramangala **Bangalore** Ph.: 080-5537244 ● CGO Bhavan, A-Wing, A.B.Road, **Indore** ● 80, Malviya Nagar, Bhopal B-7/8, Bhawani Singh Road, Jaipur.

**For Yojana Tamil, Telugu, Malayam, Kannada, Gujrati, Marathi, Bengali and Assamese please enrol yourself with Editors of the respective at the addressess given Below;**

Editor, Yojana (Marathi), B-701, Kendriaya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai.
Editor, Yojana (Gujarti), Ambika Complex, 1st Floor, Above UCO Bank, Paldi, Ahemdabad, Ph.: 079-6638670
Editor, Yojana (Assamese), Naujan Road, Uzan Bazar, Guwahati, Ph.: 0361-516792
Editor, Yojana (Bengali), 8, Esplanade East, Ground Floor, Kolkata, Ph.: 033-2432576
Editor, Yojana (Tamil), 'A' Wing, Ground Floor, Shastri Bhavan, Chennai, Ph: 0444-8272382
Editor, Yoajna (Telugu), 10-2-1, F.D.C. Complex, AC Guards, Hyderabad, Ph: 040-236579
Editor, Yojana (Malayalam), 'Reshmi' 14/916 Vazuthacadu, Thiruvanthapuram, Ph: 0471-63826
Editor, Yojana (Kannada), 1st Floor, 'F' Wing, Kendriya Sadan, Koramangala, Bangalore, Ph: 080-5537244.

अधिकारी आणि सीजीएसटी यांच्यात योग्य समन्वय साधला जाईल.

सहावे, एमआयएस ही एसजीएसटी आणि सीजीएसटी या दोन्ही कार्यालयांची एकात्मिक कामकाजपद्धती असेल. एसजीएसटी, सीजीएसटी, पॅन क्रमांक आणि करविषयक माहिती देवाणघेवाण व्यवस्था यातून आयकर व सीमा शुल्क याबाबत गोळा केलेल्या माहितीचे एकीकरण हा जीएसटी प्रशासनाचा आवश्यक घटक आहे. संबंधित अधिकाऱ्यांकडेच हे विषय राहतील, मात्र अन्य कर विभागातील अधिकाऱ्यांना गरज पडेल तेव्हा ही माहिती मिळणेही गरजेचे आहे.

**सारांश**

केंद्र व राज्य सरकारची अप्रत्यक्ष कर व्यवस्था आणि केंद्राची प्रत्यक्ष कर व्यवस्था यामध्ये जीएसटी लागू केल्याने आर्थिक दृष्ट्या कार्यक्षम, किफायतशीर व पारदर्शक कर रचना प्रस्थापित होण्यास मदत होणार आहे. भारतीय करदात्याला देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही स्पर्धात्मक बनवणारी ही कररचना आहे. मात्र ती लागू करण्यातील अडथळे दूर करणेही महत्वाचे आहे. त्याचबरोबर, राज्य स्तरावरील अन्य करांमध्येही सुधारणा करणे आवश्यक आहे. राज्य उत्पादन शुल्क, मोटर वाहन कर, प्रवासी व वस्तु कर, स्टॅम्प ड्युटी आणि नोंदणी कर यांसारख्या राज्यातील अन्य करांमध्ये सुधारणा आणण्याची विशेष काळजी घ्यावी लागणार आहे. भविष्यातील विकास व भरभराटीच्या नव्या क्षितिजाकडे देशाला नेण्यास सुयोग्य अशी भारतीय कर व्यवस्था त्यामुळे अस्तित्वात येईल.

*(**महेश पुरोहित** - फौंडेशन फॉर पब्लिक एकॉनोमीक्स एन्ड पॉलिसी रिसर्च, नवी दिल्ली या संस्थेचे संचालक. संपर्कासाठी ईमेल-maheshpur@gmail.com)*

**– भाषांतर: उमेश कुलकर्णी**

# फेसबूक जाहिरात

योजना मासिकाने नुकतेच आपले फेसबूक पान सुरु केले आहे. या ऑनलाईन माध्यमाद्वारे वाचकांना आमच्याकडून तात्काळ सूचना, आमचे कार्यक्रम व आगामी अंकांबद्दल माहिती प्राप्त करता येईल आणि त्यावर प्रतिसादही देता येईल.


दोन महिन्यांच्या कालावधीत आमच्या वाचकांकडून प्राप्त झालेल्या १५,५०० पेक्षा अधिक पसंती दिल्या असून त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. आपला पाठिंबा असाच कायम राहील, अशी अपेक्षा बाळगतो.

आमच्या फेसबूक पानावर पोहोचण्यासाठी फेसबूकच्या सर्चवर योजना जर्नल टाईप करा किंवा तुमच्या इंटरनेट ऑड्रेस बारवर खालील लींक टाका:

https://www.facebook.com/pages/Yojana-journal/181785378644304?ref=hl




कृपया आमच्या फेसबूक पानाला भेट द्या आणि आपल्या मौल्यवान सूचना आमच्यापर्यंत पोहोचवा.



# इंटरनेटवरील मालकी अधिकारः स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय सुरक्षेवर परिणाम

**– सुनील अब्राहम**

गेल्या वर्षीचा उत्तरार्ध इंटरनेट अधिकाराच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा राहिला आणि त्याला कारण होते एडवर्ड स्नोडेन. जर्मन चॅन्सेलर ॲंजेला मर्केल आणि ब्राझिलचे अध्यक्ष डिलमा रौसेफ यांना आपण सुरक्षेच्या कारणाने नव्हे तर आर्थिक कारणावरून अमेरिकन टेहळणीचे लक्ष्य झाल्याची प्रथम जाणीव झाली. याचा त्यांनी जोरदार निषेध केला. इतिहास, तंत्रज्ञान, भौगोलिक स्थिती (topology) आणि व्यापार इ.मुळे इंटरनेटच्या बाबतीत अमेरिकेची उदारमतवादी, हुकूमशहा अथवा इंटरनेटचा कारभारी म्हणून काहींनी मान्य केलेल्या भूमिकेची पुन्हा कठोरपणे छाननी होऊ लागली. इंटरनेटच्या महत्वपूर्ण संस्था (I star bodies) ज्या तांत्रिक समुदाय म्हणून ओळखल्या जातात त्यामध्ये १) इंटरनेट कॉर्पोरेशन फॉर असाईन्ड नेम्स अँड नंबर्स (ICANN), २) पाच प्रादेशिक इंटरनेट रेजिस्ट्रीज म्हणजे आफ्रिकन, अमेरिकन, एशिया-पॅसिफिक, युरोपीय व लॅटिन अमेरिकन, ३) दोन प्रमाण निश्चित करणाऱ्या संघटना - वर्ल्ड वाईड वेब कन्सॉर्टियम आणि इंटरनेट इंजिनिअरिंग टास्क फोर्स (IETF), ४) इंटरनेट आर्किटेक्चर बोर्ड (IAB) आणि ५) इंटरनेट सोसायटी (ISOC) यांचा समावेश होतो. या संस्थांमार्फत ७ ऑक्टोबरला मॉंटेव्हिडिओ स्टेटमेंट जारी केले गेले. त्यानुसार जगभरातील इंटरनेट वापरणाऱ्यांची व्यापक टेहळणी करून त्यांच्यावर नजर ठेवण्याच्या नुकत्याच उघडकीस आलेल्या प्रकारामुळे इंटरनेट वापरणाऱ्यांचा विश्वास पायदळी तुडवला जात असल्याबद्दल त्या निवेदनात तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली होती. ''ICANN आणि IANA च्या कामकाजाच्या जागतिकीकरणाचा वेग वाढवण्याचे''... आवाहन त्या निवेदनात केले होते. याचा अर्थ हा होता का की, इंटरनेट अधिकारातील अमेरिकेची विशेष भूमिका संपवण्याची इच्छा अखेर या इंटरनेट संस्थांनी दर्शवली आहे? तरीसुद्धा, त्यांच्या भूमिकेतील या नाट्यमय बदलाच्या मागून पुन्हा अर्थावर मर्यादा आणणारे विधान होतेच. ''वातावरण निर्माण करण्याच्या दिशेने ही जागतिकीकरणाची प्रक्रिया व्हावी, ज्यात सर्व भागधारक देशांना सहभागाची समान संधी असेल''. इंटरनेट संस्थांनी भागधारक देशांशी इंटरनेटसंदर्भात धोरण ठरवण्याबाबत चर्चा करण्याचा मुद्दा वाटाघाटींच्या पलिकडे आहे, असे स्पष्ट संकेत त्यातून दिले आहेत. फदी चेहाडे यांच्याशी झालेल्या चर्चेनंतर दोन दिवसांनी अध्यक्ष रौसेफ यांनी ट्विटरवरून जाहीर केले की, ब्राझिल या मुद्यावर विविध देशांचे सरकार, उद्योग, समाज आणि शिक्षण या क्षेत्रातील धुरीणांची एक शिखर परिषद भरवणार आहे. साओ पाओलो येथे येत्या २३ व २४ एप्रिलला होणाऱ्या या परिषदेचे नामकरण 'नेट मंडियल' (Net Mundial) असे करण्यात आले असून त्यात इंटरनेट अधिकारांसंदर्भात तत्वे किंवा पुढील विकासासंदर्भात १८८ प्रस्ताव चर्चेसाठी सादर करण्यात येणार आहेत.

ही बैठक इंटरनेट पर्यावरणातील बहुपक्षीय करार आणि प्रत्येक भागधारक देशाला धोरण ठरवण्याच्या त्यांच्या हक्कांबाबत महत्वाची ठरेल, असे निश्चितपणे मानण्यात येत आहे.

बहुपक्षीयता आणि बहुभागधारकवाद याबाबतीत दशकभराहून अधिक काळापासून वाद पेटला आहे. बहुभागधारकवाद म्हणजे प्रशासनाचा एक प्रकार असून त्यात प्रत्येक भागधारक देशास धोरण ठरवण्याच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्याची हमी देण्यात आली आहे. (सल्लामसलत किंवा निर्णय प्रक्रियेत- जे हवे असेल ते). २००३-२००५ या दरम्यान झालेल्या वर्ल्ड समिट ऑन इन्फर्मेशन सोसायटीच्या (WSIS) परिषदेच्या समारोपानंतर मंजूर करण्यात आलेल्या ट्युनिस अजेंडात बहुभागधारकवाद पद्धतीला ग्राह्य ठरवण्यात आले. जैसे थे स्थिती राहू देण्यास अनुकूल असलेल्यांकडून या शिखर परिषदेतील अजेंड्यास संयुक्त राष्ट्रसंघाच्या संस्थांचा इंटरनेट ताब्यात घेण्याचा प्रयत्न म्हणून पाहिले गेले. परंतु परिणामी अस्तित्वात आलेल्या ट्युनिस अजेंडात प्रत्येक भागधारकाचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग (multistakeholderism) हीच पुढील दिशा असेल, या मताला स्पष्टपणे मान्यता देण्यात आली. त्याचबरोबर बहुपक्षीय अधिकार यंत्रणा इंटरनेट प्रशासनाचा वैध घटक असल्याचे स्वीकारण्यात आले. भागधारकांच्या यादीमध्ये अनेक देश, खासगी क्षेत्र, नागरी समाज, आंतरसरकारी संघटना, आंतरराष्ट्रीय मानक (standard) संस्था आणि वर उल्लेख केलेल्या भागधारक गटांमध्ये समाविष्ट असलेले शिक्षणतज्ञ व तंत्रज्ञांचा समावेश आहे. ट्युनिस अजेंडाने इंटरनेट अधिकार मंच (इंटरनेट गव्हर्नन्स फोरम) व वर्धित सहकार्याची प्रक्रिया स्थापित केली. बारा कलमी हुकूमनाम्यासह आयजीएफची विस्तृत व्याख्या निश्चित करण्यात आली. समोर येणारे मुद्दे निश्चित करणे, त्यांना जगभरातील महत्वाच्या संस्था आणि सर्वसामान्य जनतेच्या निदर्शनास आणणे व योग्य असेल तेथे शिफारशी करणे यांचा त्यात समावेश होता. थोडक्यात, हा सौम्य जगभरातील इंटरनेट या सुविधा वापराचे व त्यावरील मालकी हक्काचे कायदे बनवणारा मंच होता. वाढीव सहकार्याचा अर्थ सर्व देशांच्या सरकारांना इंटरनेटशी संबंधित आंतरराष्ट्रीय धोरणात्मक मुद्यांवर आपली भूमिका व जबाबदारी पार पाडण्याची समान संधी देणे, असा निश्चित करण्यात आला. मात्र आंतरराष्ट्रीय धोरणात्मक मुद्यांवर परिणाम न करणाऱ्या दैनंदिन तांत्रिक व कार्यान्वयन (operational) मुद्यांचा त्यात समावेश करण्यात आलेला नाही. तसेच आजच्या घडीलाही त्याबाबत अधिकाधिक स्पष्टता आणण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

सात वर्षांनंतर दुबईत भरलेल्या जागतिक दूरसंचार परिषदेतही जैसे थे वाल्यांनी इंटरनेटचा ताबा घेण्याचा हा संयुक्त राष्ट्रसंघाचा आणखी एक प्रयत्न असल्याची हाकाटी उठवली. अमेरिकन वर्चस्व मान्य नसणाऱ्या काही गैर अमेरिकन राष्ट्रांनीही जैसे थे भूमिकेशी तडजोड करण्याची इच्छा प्रदर्शित केली, कारण इतर कोणत्याही देशांपेक्षा अमेरिकन न्यायालय मानवी हक्कांबाबत अधिक जोमदार भूमिका घेईल, याची त्यांना खात्री पटली होती. वस्तुत: संयुक्त राष्ट्रसंघ आणि आंतरराष्ट्रीय अधिकारशाहीला अनुकूल असलेल्यांच्या राक्षसीकरणासाठी (demonization) अमेरिकेने चांगला पाया रचला होता. इंटरनेट स्वातंत्र्य ही हिलरी क्लिंटन यांच्या नेतृत्वाखालील अमेरिकन परराष्ट्र मंत्रालयाची संकल्पना होती. त्यांनी आपल्या कुशल वक्तृत्व शैलीनुसार असे म्हटले होते की, जगात चांगले देश आहेत, वाईट देश आहेत आणि काही कुंपणावरचे (swing states) आहेत. अमेरिका, इंग्लंड व काही स्कँडेनेव्हियन देश इंटरनेट स्वातंत्र्याचे समर्थक होते. चीन, रशिया आणि सौदी अरेबिया इंटरनेट अधिकाराचे विभाजन करणाऱ्या हुकूमशाही देशांची उदाहरणे होत. आणि भारत, ब्राझिल आणि इंडोनेशिया ही कुंपणावरची राष्ट्रे होती. दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर ती कोणत्याही बाजूस-चांगली बाजू किंवा वाईट बाज- झुकू शकत होती.

इंटरनेट स्वातंत्र्याची ही हुशारीने मांडलेली कल्पना दोषांनी भरलेली होती. अमेरिकेतील सेन्सॉरशिप राजवट ही चीनपेक्षा कोणत्याही अर्थाने चांगली नाही. चीनमध्ये राजकीय भाषणांवर सेन्सॉरशिप आहे. हिलरी क्लिंटन यांच्यावर प्रचंड प्रभाव असलेल्या बौद्धिक संपदा स्वामित्ववादी गटामुळे (लॉबी) अमेरिका ज्ञान मिळवण्याचा मार्गच सेन्सॉर करते. कोणत्याही सामान्य दिवशी, सांस्कृतिक भाषणाला बहुमतामुळे राजकीय भाषणाच्या तुलनेत कसे झुकते माप मिळते, हे जगभरातील टेलिव्हिजन चॅनल्सच्या प्रेक्षकांची आकडेवारी आपल्याला सहज सांगेल. चीनची भिंत फक्त त्यांच्या नागरिकांवर हुकूमत करू शकते - तिच्या कार्यकक्षेत न येणाऱ्या जगभरातील नेटिझन्सवर चीनच्या सेन्सॉरशिपचा काहीही परिणाम होत नाही. दुसरीकडे, अमेरिकेचे

सेन्सॉरशिपचे कायदे जवळपास जागतिक परिणाम करत असतात. याचे कारण हे आहे की, अमेरिकेतील सेन्सॉरशिप राजवट ही इंटरनेटवरील माहिती ब्लॉक अथवा फिल्टर करण्यावर प्रामुख्याने आधारित नाही. तांत्रिक आणि आर्थिक मध्यस्थ ओळखून त्यांच्यावर दबाव आणून त्यांचे लक्ष्य ऑफलाईन करण्यास भाग पाडले जाते. टेहळणीचा प्रश्न येतो तेव्हा अमेरिका ही चीनपेक्षाही घातक आहे, असे एखादा युक्तिवाद करू शकेल. पुन्हा चीनच्या सेन्सॉरशिपशी तुलना केल्यास चीन त्यांच्या नागरिकांची व्यापक प्रमाणावर सरसकट टेहळणी करतो. पण अमेरिकन टेहळणी नागरिकांवरच परिणाम करते, असे नाही तर इंटरनेट वापरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला मालवेअर, ट्रोजन हे व्हायरस, कमकुवत सॉफ्टवेअर विकसित करणे, एक्रिप्शन दर्जा, सेवा पुरवठादार कंपन्या, आयएसपी, नॅशनल बॅकबोन इन्फ्रास्ट्रक्चर व सबमरिन ओप्टिक केबल्समध्ये दोष ठेवण्याच्या तंत्रासह बहुस्तरीय पवित्रा घेऊन लक्ष्य केले जाते. इंटरनेट सुरक्षा गुरू म्हणून ओळखले जाणारे ब्रुस श्निअर आपल्याला सांगतात की, गुप्ततेशिवाय सुरक्षा असू शकत नाही. आणि स्वातंत्र्याला सुरक्षा आणि गुप्तता या दोन्ही गोष्टी आवश्यक असतात. म्हणूनच व्यापक टेहळणी अत्यावश्यक असलेल्या सुरक्षेला पायदळी तुडवते आणि ई-कॉमर्स, ई-बँकिंग, बौद्धिक संपदा, वैयक्तिक माहिती आणि गोपनीय माहिती भेद्य बनवून बाजारपेठांचे चलनवलन कमकुवत बनवते. सुरक्षित इंटरनेट व माहितीयुक्त समाज बनवण्यासाठी देश व खासगी कंपन्यांकडून सामूहिक टेहळणी संपली पाहिजे.

**भारतासाठी संधी:**

अमेरिकेतील बौद्धिक संपदा निर्बंध असलेल्या पद्धतीपेक्षा वेगळी अशी भारताची भूमिका असून, भारताचा विश्वास आहे की, भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्यासाठी ज्ञानापर्यंत पोहचता येणे, ही पूर्वअट आहे. जागतिक बौद्धिक संपदा धोरण किंवा ज्ञानापर्यंत पोहचता येण्याच्या अधिकारापुरते बोलायचे तर, देशांतर्गत धोरण आणि जागतिक बौद्धिक संपदा संघटनेचे आंतरराष्ट्रीय धोरण ठरवण्याच्या बाबतीत भारत आघाडीवर आहे. १९७० पासून धोरण ठरवणाऱ्यांनी आरोग्याच्या हक्काचे औषधे मिळण्याच्या हक्काच्या स्वरूपात समर्थन केले आहे. अगदी अलिकडे म्हणजे जून २०१३ मध्ये दृष्टीहीनांसाठी मर्राकेश करार घडवून आणण्यात भारताने महत्वाची भूमिका बजावली. ज्याद्वारे दृष्टीहीन लोकांना व कॉपीराईट धारकांना कोणतीही रक्कम न देता पुस्तकांचे सुलभ स्वरूपांत - जर तशी माहिती उपलब्ध करून देण्यात आली नसेल तर - त्यांचे रुपांतर करण्याचा हक्क देण्यात आला आहे. (या कराराचा अपवाद, लवचिकता किंवा मर्यादा म्हणूनही उल्लेख केला जातो.) मर्राकेश करार हा विशिष्ट अपंगांसाठी (दृष्टीहीन) आणि विशिष्ट कार्यासंबंधी (फक्त कॉपीराईट) आहे. मर्राकेश कराराच्या नेमके विरूद्ध म्हणजे कॉपीराईट कायद्यातून भारताचा अपंगत्वाबाबत अपवाद करण्यात आला असून अपंगत्व आणि विशिष्ट कार्य या दोन्हीबाबत हा कायदा तटस्थ आहे. कराराच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी, म्हणजे एका देशातील अपंगांसाठी उपलब्ध असलेली माहिती जागतिक स्तरावर उपलब्ध करून देण्यासाठी इंटरनेट अत्यंत महत्वाचे आहे, हे लक्षात घेता भारताने इंटरनेट अधिकाराच्या वर्तुळात आपला प्रभाव अधिक व्यापक करण्याची तसेच इन्फर्मेशन सोसायटीचे प्रशासन अधिक विस्तारित करण्याची वेळ आली आहे.

एडवर्ड स्नोडेन पश्चात तथाकथित कुंपणावरच्या राष्ट्रांची भूमिका जास्त नैतिक असायला हवी. तीव्र राजकीय इच्छाशक्तीचा उपयोग करून या देशांनी आजच्या घडीचा फायदा उठवला पाहिजे. प्रत्येकाला औषध मिळण्याचा हक्क एवढ्यापुरते मर्यादित न राहता प्रत्येकाचा ज्ञानापर्यंत पोहचण्याचा हक्क हे अधिकारक्षेत्र मिळवून देण्यासाठीही भारताने अधिक व्यापक प्रयत्न करण्याची वेळ आली आहे. पेटंट हक्क आणि सक्तीची परवाना पद्धती वापरून परवडणारे व अभिनव डिजीटल हार्डवेअर (विशेषत: मोबाईल फोन्स) तिसऱ्या जगाला आपल्याला उपलब्ध करून देता येतील. यामुळे पेटंटधारक, नाविन्यपूर्ण संशोधक, उत्पादक, ग्राहक आणि सरकार या सर्वांचाच फायदा होऊन भारताचे स्वरूप जगाची औषधशाळा एवढेच न राहता त्यापुढे जाऊन जगातील इलेक्ट्रॉनिक दुकान म्हणून होईल, याची खात्री मिळेल. ब्रॉडबँड कॉपीराईट अधिभार किवा कर यासारखे सरसकट शुल्कांचे मॉडेल्स वापरण्याची शक्यताही पडताळून पाहता येईल. ज्यामुळे इंटरनेट वापरणाऱ्यांना स्वस्तात सामग्री मिळेल (मजकूर, प्रतिमा, व्हिडिओ, ऑडिओ, गेम्स आणि सॉफ्टवेअर) आणि संशोधकांना भारतातील सर्व इंटरनेट वापरणाऱ्यांकडून काही रॉयल्टी मिळण्याची खात्री असेल. अमेरिकेने कॉपीराईट अंमलबजावणीवर आधारित प्रस्थापित

केलेली नियंत्रण पद्धती नष्ट करण्यासाठी या मार्गाने अजून बरेच पुढे जावे लागणार आहे. खासगीपणाच्या अधिकाराचा प्रश्न येतो तेव्हा आपल्याला एका जागतिक दर्जाच्या खासगीपणासंबंधी कायदा करून स्वतंत्र, स्वायत्त आणि स्वयंप्रेरित आयुक्त नेमता येईल, जो खासगी आणि सरकारी कंपन्यांना थोड्याशा भाडेपट्ट्यावर ठेवू शकेल. त्यानंतर आपल्याला मानवी हक्क तत्वांचे पालन करणारी वैज्ञानिक, लक्ष्यित टेहळणी पद्धतीची गरज लागेल. यामुळे भारत एकाच वेळेस बौद्धिक संपदा आणि खासगीपणाचा अधिकार याबाबत स्वर्गवत ठरेल आणि त्याद्वारे खासगी कंपन्यांची मोठी गुंतवणूक आकर्षित करता येईल. तसेच जागतिक समुदाय व स्वायत्त माध्यमांची सदिच्छाही मिळवता येईल. सुरक्षेसाठी खासगीपणाचा अधिकार ही पूर्वअट आहे, हे लक्षात घेता सायबर सुरक्षेच्या परिप्रेक्ष्यातूनही भारत अत्यंत सुरक्षित बनेल. अर्थातच, देशातील विद्यमान परिस्थिती पाहता हे एक काल्पनिक स्वप्नरंजनच आहे, पण आपल्यासाठी पाठपुरावा करण्यास योग्य असे संभाव्य भविष्यही आहे.

**इंटरनेट अधिकाराची संधी:**

बहुभागधारक देश आणि बहुपक्षीय करार यांच्यातील तणावाचा एक भाग असा आहे की, इंटरनेट अधिकाराची एकच आणि जागतिक स्वीकारार्ह अशी व्याख्या नाही. इंटरनेट अधिकाराच्या ज्या काही सनातन व्याख्या आहेत त्या इंटरनेटचे महत्वपूर्ण स्त्रोत जसे डोमेन नेम, आयपी ॲड्रेसेस आणि सर्व्हर्स म्हणजे दुस-या शब्दात ICANN, IANA, रिजनल रजिस्ट्रीज आणि अन्य आय स्टार संस्था यांच्या व्यवस्थापनापुरत्याच मर्यादित आहेत. आणि इथेच अमेरिकन ऐतिहासिक वर्चस्व स्पष्ट होते. इथेच बहुभागधारक मॉडेल आतापर्यंत स्पष्टपणे मांडण्यात आले आहे आणि म्हणून सध्याची इंटरनेट अधिकाराची पद्धती उध्वस्त करताना आपल्याला काळजी घ्यावी लागेल. अमेरिकन वर्चस्व कमी करण्यासाठी ढोबळपणे चार भूमिका आहेत.

१. जागतिकीकरण (सध्याच्या बहुभागधारक देशांच्या पद्धतीत अधीन राहून इतर देशांना अमेरिकेच्या बरोबरीने भूमिका द्यावी.
२. आंतरराष्ट्रीयीकरण (ICANN, IANA चे कार्य, रजिस्ट्रीज आणि अन्य आय स्टार संस्थांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या नियंत्रणाखाली अथवा निरीक्षणाखाली आणणे)
३. IANA कार्यपद्धतीत देशांची भूमिका संपुष्टात आणणे, आणि
४. डोमेन नेम आणि नंबर व्यवस्थापनात स्पर्धकांना प्रवेश देणे.

एप्रिलमध्ये ब्राझिलमधील परिषदेत अंतिम तोडगा काहीही निघो, डोमेन नेम आणि आयपी ॲड्रेस वितरित करण्यावर ज्यांचे नियंत्रण असते ते भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर परिणाम करू शकतात, हे अगदी स्पष्ट आहे. भारतात मात्र तीन रुट सर्व्हर्स देशाच्या सीमांमध्येच आहेत, हे लक्षात घेता राष्ट्रीय सुरक्षेवर परिणाम अगदीच मर्यादित असेल आणि अमेरिकेसाठी भारतातील इंटरनेट बंद पाडणे जवळपास अशक्यच आहे.

अधिक विस्तारित व्याख्येसाठी इंटरनेट अधिकार अहवालावरील कार्यकारी गटाने सार्वजनिक धोरणात्मक मुद्यांवर चार वर्ग केले आहेत, जे इंटरनेट प्रशासनासाठी महत्वाचे आहेत.

अ) पायाभूत सुविधा आणि इंटरनेट स्त्रोत - डोमेन नेम व्यवस्था आणि इंटरनेट प्रोटोकॉल (IP) प्रशासन, रुट सर्व्हर व्यवस्थेचे प्रशासन, तांत्रिक दर्जा, इंटरकनेक्शन, नाविन्यपूर्ण व कन्व्हर्जंट तंत्रज्ञान, जाहिरातीसह दूरसंचार पायाभूत सुविधा याचे व्यवस्थापन. हे मुद्दे इंटरनेट प्रशासनासाठी थेट महत्वाचे आहेत आणि सध्याच्या संघटनांच्या परिघात त्यांची जबाबदारीही येते.
ब) स्पॅम, नेटवर्क सुरक्षा आणि सायबर गुन्हे यासह इंटरनेटच्या उपयोगाशी संबंधित मुद्दे. हे मुद्दे इंटरनेट अधिकाराशी थेट निगडित असले तरी जागतिक सहकार्याबाबत स्पष्टीकरण दिलेले नाही.
क) असे मुद्दे जे इंटरनेटसाठी महत्वाचे आहेतच पण त्यांचा परिणाम इंटरनेटपेक्षा व्यापक अर्थाने आहे व त्यासाठी विद्यमान संस्था जबाबदार आहेत म्हणजे बौद्धिक संपदा हक्क किंवा आंतरराष्ट्रीय व्यापार.
ड) इंटरनेट अधिकाराच्या विकासासंबंधी मुद्दे विशेषत: विकसनशील देशांची क्षमता वाढवणे.

यापैकी काही वर्गातील मुद्यांवर संयुक्त राष्ट्रसंघाशी संलग्न बहुपक्षीय संस्थांच्या प्रभावातून देशांनी केलेल्या कायद्यांच्या मार्गाने निवारण करण्यात आले आहे. जसे बौद्धिक संपदा हक्कांसाठी जागतिक बौद्धिक संपदा संघटना आणि दूरसंचार पायाभूत सुविधांसाठी आंतरराष्ट्रीय दूरसंचार युनियन आहे. इतर

धोरणात्मक मुद्दे उदा.-सायबर गुन्हेगारीवर बुडापेस्ट परिषदेसारख्या माध्यमातून अनेक देशांच्या सहभागातून तर द्विपक्षीय परस्पर कायदेविषयक सहकार्य करार करूनही मार्ग काढला जात आहे. स्पॅमचा मुद्दा खासगी क्षेत्र आपल्या स्वयंनियमनाच्या - जसे मेसेजिंग, मालवेअर आणि मोबाईल गैरवापर विरोधी कार्यकारी गटासारख्या प्रयत्नांच्या माध्यमातून हाताळला जात आहे. पिअरिंग व इंटरकनेक्शनसारख्या आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक सहकार्य अपुरे आहे, अशा मुद्यांवर खासगी व्यवस्था गोपनीय आहे आणि त्यात सार्वजनिक हिताचे पुरेसे संरक्षण केले जात आहे का, हे स्पष्ट झालेले नाही.

**इंटरनेटचा अधिकार नक्की कुणाचा-सारांश:**

त्यामुळे सारांश काढताना, खरोखर इंटरनेटवर अधिकार कुणाचा, हा प्रश्न उपयुक्त नाही. याचे कारण हे आहे की, इंटरनेटचे प्रशासन वास्तवात कुणीच करत नाही. विविध मानके (standards), तंत्र-ज्ञान, देश, विभिन्न असे स्तर आणि भौगोलिक स्थिती व सेवा यांचा इंटरनेट हा फैलावलेला समूह आहे. इंटरनेटचे विविध समूह - सरकार, खासगी क्षेत्र, नागरी समाज आणि तांत्रिक व शैक्षणिक समुदाय यांचे विविध मंच आणि अधिकार क्षेत्रांचा उदा. स्वयं नियमन, सहनियमन आणि सरकारी कायदे यांचा वापर करून नियमन करण्यात आले आहे. अधिक नियमन हे नेहमीच बरोबर उत्तर ठरते काय? बहुपक्षीयवाद आणि बहुभागधारक वाद यांच्यातून आपल्याला निवड करण्याची गरज आहे काय? प्रक्रियेसाठी आपल्याला स्थिर व्याख्यांची गरज आहे का? अधिकाराच्या विविध क्षेत्रांसाठी आपल्याला बहुभागधारकवादाच्या विविध आवृत्या हव्या आहेत का? याचे आदर्श उत्तर नाही, नाही, नाही आणि होय असे आहे. माझ्या मते इंटरनेट अधिकाराबाबत योग्य जागतिक व्यवस्था ही विकेंद्रित, वैविध्यपूर्ण किंवा बहुवचनी स्वरुपाची आणि तरीही राबवता येण्याजोगी, बहुपक्षीय आणि बहुभागधारक अशा दोन्ही संस्था व यंत्रणा असलेली आणि सार्वजनिक हिताचे अनियमन आणि नियमन करणारीही असेल.

**संदर्भसूची :**


१. Montevideo Statement on the Future of Internet Cooperation https://www.icann.org/en/news/announcements/announcement-07oct13-en.htm

२. अमेरिकन टेहळणीच्या विरोधातील सुरू असलेल्या लढ्यात जागतिक इंटरनेट शिखर परिषदेचा यजमानपद ब्राझिल भूषवणार आहे. http://rt.com/news/brazil-internet-summit-fight-nsa-006/

३. इन्फर्मेशन सोसायटीसाठी ट्युनिस अजेंडा http://www.itu.int/wsis/docs2/tunis/off/6rev1.html

४. Mumbai (I Root), Delhi (K Root) and Chennai (F Root). See: http://nixi.in/en/component/content/article/36-other-activities-/77-root-servers

५. इंटरनेट अधिकारावरील कार्यकारी गटाचा जागतिक इन्फर्मेशन सोसायटीच्या शिखर परिषदेच्या पूर्वतयारी समितीचे अध्यक्ष राजदूत जानिस कार्कलिन्स आणि वर्ल्ड समिट ऑन इन्फर्मेशन सोसायटीचे सरचिटणीस योशिओ उत्सुमी यांना १४ जुलै २००५ रोजी सादर करण्यात आलेला अहवाल http://www.wgig.org/WGIG-Report.html



*(**सुनील अब्राहम** - सेंटर फॉर इंटरनेट एंड सोसायटी बंगलोर या संस्थेचे कार्यकारी संचालक. माहिती व संवाद तंत्रज्ञानातील कमी खर्चात सहज प्रक्षेपणासाठी फ्री सॉफ्टवेयर विकसित करणाऱ्या 'माहिती' या सामाजिक संस्थेचे संस्थापक. संपर्कासाठी ईमेल- sunil@cis-india.org)*

**– भाषांतर: उमेश कुलकर्णी**



# शेतीतील पारंपरिक प्रथांचे जतन

– बाबा मायाराम

मध्यप्रदेश राज्याच्या सतना जिल्ह्यातील पिठुरागढ हे एक दुर्गम गाव. राष्ट्रीय गुन्हे नोंद शाखेच्या पाहणीनुसार २०१० वर्षाच्या तुलनेत शेतकऱ्यांच्या आत्महत्यांमध्ये पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झाल्याची नोंद असणाऱ्या पाच राज्यांमध्ये मध्यप्रदेश राज्याचा समावेश होतो. विसंगतीची गोष्ट अशी की, शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना आळा बसेल आणि शेतकऱ्यांच्या या भूमीत पुन्हा कृषी संस्कृती आणता येईल, असे उदाहरणही पिठुरागढ या गावातच पाहायला मिळते.

या गावाचे रहिवासी असलेले एक शेतकरी बाबुलाल दहिया हे आपल्या शेतात देशी बनावटीच्या बियाणांच्या वापराचे प्रयोग करतात. एवढेच नाही तर त्यांचे जतन आणि संवर्धना संबंधीत नव्या पद्धती शोधून काढून संकरित बियाणांच्या जाळ्यात फसलेल्या आपल्या साथी शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शन करतात.

पासष्ट वर्षीय बाबुलाल दहिया यांच्या घरी संवर्धित बियाणांचा साठा पाहायला मिळेल. यामध्ये बाबुलाल यांनी काळजीपूर्वक जतन केलेल्या अनेक प्रकारच्या धान्यांची बी बियाणे, गाईच्या शेणाने सारवलेल्या गोठ्यात कापणीच्या हंगामानंतर साठवलेल्या ढलप्या पीठं दळायची जाती इ. शेतीशी संबंधीत पारंपारिक गोष्टींचा खजिना आहे. शेतीचे जाणकार असलेले बाबुलाल स्वदेशी बियाणांचा वापर करण्याचे फायदे प्रत्येकाला सांगतात व गावोगाव भटकून गोळा केलेल्या आणि पूर्ण पारंपरिक व नैसर्गिक स्थितीत वाढवलेला सत्तर नमुन्यांचा आपला धान्य बियाणांचा साठा त्यांना भायला येणाऱ्यांना अभिमानाने दाखवतात. बाबुलाल यांच्यानुसार संकरित बियाणांच्या तुलनेत स्वदेशी भाताच्या बियाणांमुळे भाताला चांगली चव येते आणि त्यामुळे चांगली किंमतही मिळते. स्वदेशी बियाणांचे भात पिक गाईच्या शेणासारख्या खतांनी उत्तम वाढवता येते. याउलट संकरित किंवा खुरट्या पिकांसाठी रासायनिक खतांचा वापर अत्यावश्यक ठरतो. शिवाय उत्पादन खर्च वाढून जमिनीचा कसही कमी होतो.

बाबुलाल त्यांच्या मते, पिकाला हानिकारक ठरणाऱ्या कीटकांचा बंदोबस्त माशा, मधमाश्या, मुंग्या आणि इतर कीटके नैसर्गिकरित्या करतात. गांडुळे दिवसाला चोवीस तास काम करून मातीतील नापीक घटक खाऊन माती मऊ बनवतात व पिकाची जोमदार वाढ होण्यास हातभार लावतात. अधिक पाण्याची गरज असणाऱ्या संकरित बियाणांच्या तुलनेत देशी बियाणाच्या पिकांना कापणीयोग्य होण्यास कमी वेळ लागतो आणि ते ही नैसर्गिक प्रक्रियेतूनच होते.

बाबुलाल यांच्याकडे असलेल्या धान्य बियाणाच्या प्रत्येक नमुन्याची काही स्वतंत्र वैशिष्ट्ये आहेत. सरया, सिकिया, श्यामजीर, दिहुला आणि सारेखनी यासारख्या बियाणांची पिके सत्तर ते पंच्यहत्तर दिवसांत तयार होतात तर नेवरी, झालोर, करगी, मुनगर आणि सेकुरगार ही बियाणे शंभर ते एकशे वीस दिवसांत तयार होतात आणि बादल फूल, कोराकम्हा, विष्णुभोग, दिलबक्ष बियाणे पेरल्यानंतर एकशे तीस दिवसांनी तयार होते.

असंख्य प्रकाराच्या देशी बियाणांचे सौंदर्य आणि त्यांच्या विविध रंगांचे कौतुक करणारी पारंपरिक गीते व लोककथा हळूहळू काळाच्या पडद्याआड लोप पावत असतांनाच संकरित बियाणांशी लढाई जवळपास हरलेल्या देशी धान बियाणांच्या संवर्धनाची बाबुलाल यांना ओढ लागली व यातूनच शेतीच्या पारंपरिक पद्धतीचे संवर्धन आणि जतनाकडेच पर्यायाने कृषी संस्कृती जपण्याकडे ते ओढले गेले.

बाबुलाल सांगतात की पूर्वी जेव्हा हवामानाचा अंदाज सांगण्यास रेडिओ व दूरदर्शन नव्हते, तेव्हा शेती प्रक्रियेतील प्रत्येक टप्प्यासाठी आमच्या पूर्वजांच्या अनुभवाची मदत व्हायची. ढगांचा रंग, वाऱ्याचा ओघ आणि पाऊस पडण्याच्या पद्धतीवरून पूर्वज निसर्गाचा कल अजमावत असत. याबाबत त्यांना माहित असलेली एक जुनी म्हण- पूर्बा जो पुरवाई पाबे, सुखी नदीयाँ नाव चलाएँ, ते सांगतात. या म्हणीचा अर्थ असा की, पूर्वेच्या ताऱ्यांच्या दिशेने वारा वाहू लागला की एवढा प्रचंड पाऊस पडतो की कोरड्या नद्यांमध्येही नाव चालवता येईल. बाबुलाल सांगतात की पूर्वाजांनी अनेक म्हणी व लोकगीतांतून त्यांच्याजवळचा निसर्गासंबंधीत ज्ञानाचा वारसा येणाऱ्या पिढ्यांपर्यंत पोहचेल अशी योजना केली होती. म्हनी व लोकगीते हा नव्या पिढ्यांना पूर्वजांच्या ज्ञानाशी जोडणारा एक दुवाच मानला पाहिजे. परंतु अनेक लोकगीते म्हणी विस्मृतीत मागे पडत चालल्या असल्यामुळे दुर्दैवाने हा दुवाच आज तुटत चालला आहे.

बाबुलाल सांगतात जशी आमची देशी बियाणे नष्ट होत आहेत तसेच कृषी संबंधी शब्दसंपदाही आम्ही गमावत चाललो आहोत. शेतीची कामे आणि शेतकी जीवनव्यवस्थेभोवती फिरणाऱ्या आमच्या संपूर्ण संस्कृतीवरच घाला घातला गेला आहे. आता फक्त तांदूळ, गहू आणि डाळ या शब्दांवरच आम्ही भागवतो. पूर्वी आमच्याकडे डाळी आणि धान्याचे अनेक प्रकार असत. यामध्ये समा, कोडो, कटकी, मूंग, उडीद, ज्वार आणि तिल्ली अशी काही नावे सांगता येतील. शेतीची प्रत्येक पायरी, प्रत्येक अवस्था म्हणजे बियाणे पेरल्याच्या दिवसापासून ते पिकाच्या कापणीपर्यंत शेतकरी गुंतलेले असत, असे बाबुलाल सांगतात. त्यांच्याकडील शेतीच्या हंगामासंबंधी म्हणी आणि लोकगीतांचा अफाट संग्रह आता मध्यप्रदेश जैवविविधता मंडळाने 'सयानन के तथी' या पुस्तकातून प्रकाशित केला आहे.

पूर्वीच्या दिवसांत शेतीची कामे ही स्वयंपूर्ण असत. एक मिठाचा अपवाद सोडला तर शेतकरी आपल्या दैनंदिन गरजेसाठी लागणाऱ्या वस्तू गावातूनच मिळवीत असत. त्यांना आवश्यक असेल ते सर्व काही ते आपल्या शेतातून मिळवीत असत. अनेक धान्ये जसे ज्वारी, मूंग, उडीद, तूर, तिळ किंवा कोडो ते पिकवीत. संमिश्र शेती ही कल्पना ते राबवत असत. त्यातून गहू, तांदूळ आणि डाळ मिळत असे. तसेच गावचा लोहार शेतीसाठी आवश्यक औजारे बनवून देत असे. त्या बदल्यात तो कापणी झाल्यानंतर धान्यातील वाटा घेत असे. संपूर्ण गाव परस्परावलंबी होते. बाबुलाल येणाऱ्या प्रत्येकाला हेच कळकळीने सांगू इच्छितात की आपल्या देशातील शेतकरी मित्रांचा जीव वाचवायचा असेल तर आपल्या प्राचीन शेतीच्या पध्दती, परंपरा आणि सर्वाधिक महत्वाचे म्हणजे पारंपरिक शहाणपण जसे देशी बियाणे, बैलाने नांगरणी आणि गाईच्या शेणाचे खत यांकडे पुन्हा वळायला हवे!

**चरखा फिचर्स**

धनादेशाद्वारे(चेक) देणगी द्यायची झाल्यास ती चरखा या नावाने द्यावीत.

संपर्कासाठी पत्ता :
श्री.शंकर घोष अध्यक्ष,
चरखा डेव्हलपमेंट कम्युनिकेशन नेटवर्क डी- १९४७ पालम विहार; गुरगाव - १२२०१७, हरयाणा. www.charkha.org, email: charkha@bol.net.in

**– भाषांतर : उमेश कुलकर्णी**

## लेखक / वाचकांसाठी नम्र सूचना

प्रकाशन विभागाच्या 'इंडिया' (इंग्रजी) व 'भारत' (हिंदी) या वार्षिक संदर्भ ग्रंथांच्या प्रती केन्द्रीय सदन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, पिन ४००६१४ येथील कार्यालयात उपलब्ध आहेत. या प्रती संग्रही ठेवू इच्छिणाऱ्या लेखक वाचकांनी आपली मागणी yngovt.patika242@gmail.com या संकेतस्थळावर कृपया नोंदवावी.



# भारतीय अर्थव्यवस्थाः काल आज आणि उद्या

**– हेमंत देसाई**

जगातील अनेक उद्योन्मुख देशांच्या बाजारपेठा (इमर्जिंग मार्केटस) पुन्हा एकदा आपत्तीग्रस्त झाल्या आहेत. अर्जेंटिना व व्हेनेसुर सारख्या देशांना आपल्या चलनाचे विनिमयमूल्य घटवावे लागले आहे. तुर्कस्तानचा लिया आणि दक्षिण आफ्रिकेचा रॅड, अमेरिकन डॉलरच्या तुलनेत घटला आहे. तुलनेने रुपयाने आपले मूल्य ६० रुपये प्रति डॉलर एवढे टिकवून धरले आहे. ऑगस्ट २०१३ मध्ये रुपयाची घसरगुंडी सुरु होती. अमेरिकेच्या फेडरला रिझर्व्हने आपली रोखखरेदी कमी केल्यावर ब्राझील, इंडोनेशिया, तुर्कस्तान, द. अफ्रिका व भारत यांच्या चलनांचे मूल्य आटेल, असा कयास बांधला जात होता. चालू तुटीचा डोंगर परकीय भांडवलावरील भिन्न व पाचही देशांत होणाऱ्या संसदीय निवडणुका यामुळे तेथील आर्थिक त्सुनामी येईल, अशी भीती वर्तवली जात होती. भारतात तर १९८१ या वर्षी भारतात परकीय गंगाजळीची घागर रिकामी झाली होती त्यासारखे चलन संकट पुन्हा उद्भवेल, अशी शक्यता वर्तवली गेली वास्तवात तसे झालेले नाही.

डिसेंबर २०१३ पासून अमेरिकेने मासिक रोखे खरेदी कमी केली. त्यानंतरच्या तीन महिन्यांत इतर चार देशांच्या चलनांची दहा ते पंधरा टक्के घसरगुंडी झाली. परंतु, भारतीय रुपया फक्त तीन टक्यांनी उतरला. शेअर बाजारातील शेअर्सचे बाजारमूल्य तीस टक्क्यांनी वाढले सेन्सेक्स तर आता बावीस हजार अंशाच्याही वर गेला आहे.

हे सर्व कशामुळे घडले तर, चालू खात्यावरची तूट आपण लक्षणीयरित्या कमी केली. दुसरे म्हणजे रिझर्व्ह बँकेने परदेशस्थ भारतीयांच्या ठेवी आकर्षित केल्यामुळे चौतीस अब्ज डॉलर्स आपल्या गंगाजळीत आले. वास्तविक, गतवर्षी भारताची व्यापारी तूट लक्षणीयरित्या घटली. उद्योन्मुख बाजारपेठांतील तो एक विक्रमच ठरला. दरमहा १७ अब्ज डॉलर्सचा खड्डा पडत होता. आज हे प्रमाण दहा अब्ज डॉलर्सवर आले आहे. केंद्र सरकारने सुवर्ण आयातीवर निर्बंध आणले. तसेच रुपया घसरला होता त्यामुळे जागतिक बाजारातील आपली स्पर्धा वाढली व निर्यात फोफावली. देशांतर्गत नरमाईमुळे भांडवली माल व पोलादाचे भंगार वगैरे साहित्याची मागणी घटली. परिणामी देशाची आयात कमी झाली. मागील दशकांत भारतीय अर्थव्यवस्थेचे जागतिकीकरण झाले आहे. म्हणजे आयात निर्यात, विदेशी भांडवल, भारतीय बहुराष्ट्रीय कंपन्यांचे विदेशातील कर्तृत्व, त्रिखंडात जाऊन कामगिरी बजावणारे तंत्रज्ञ या सगळयातच वाढ झाली आहे.

त्यामुळे सर्वच बाबतीत नकारात्मकतेचा स्वर लावण्यात अर्थ नाही. सार्वत्रिक निवडणुकांत आरोप-प्रत्यारोप होतात. गेल्या दहा वर्षांत प्रगतीच झाली नाही, असे विरोधक म्हणतात. तर नेत्रदिपक विकास झाला असा दावा सत्ताधारी करतात. या दोन्हींच्या मध्ये कुठेतरी सत्य असते. प्रचाराची तीव्रता वाढली असल्यामुळे आपण वास्तव जाणून घेतले पाहिजे.

केंद्रिय अर्थमंत्री पी. चिदंबरम यांनी गेल्या आर्थिक वर्षाचा म्हणजे २०१३-१४ या वर्षाचा अर्थसंकल्प मांडताना एका देशी

उत्पादनाच्या (जीडीपी) पाच टक्के वित्तीय तूटीचे लक्ष्य समोर ठेवले होते. ते गाठण्यात त्यांनी यश मिळविले. तर वित्तीय तूट सहा टक्के पर्यंत राखण्याचे उद्दिष्टही मिळवले आहे. त्याकरिता सरकारने खर्चात कपात केली. मात्र ३५ हजार कोटी रुपयांच्या इंधन अनुदानाची तरतूद आगामी वर्षात ठरल्यामुळेही कमी खर्च दाखवणे त्यांना शक्य झाले आहे. पण त्यासाठी तरतूद केली असली तरी वित्तीय तूट फार तर ४.९ टक्के पर्यंत गेली असती. निवडणुकीचे वर्ष असूनही चिदंबरम् यांनी हंगामी अर्थसंकल्पात दिलेला वित्तीय शिस्तीवरचा भर स्वागतार्ह म्हणावा लागेल.

२००८ पासूनच्या जागतिक मंदीनंतरही भारताने आपला जीव वाचविण्यात यश मिळवले. मात्र २००९ व २०१० मध्ये फिस्कल कान्मगॉलिडेशन किंवा आर्थिक सुसूत्रीकरण करण्याचे टाळण्यात आले.

अर्थमंत्र्यांनी यंदाचा अर्थसंकल्प सादर करतांना तीन टक्के साधारण विकासात अपेक्षित आहे. याचा अर्थ असा की पुढील वित्तीय वर्षात चलन उतरवण्याचा दर सुमारे सात टक्के असेल. म्हणजे खरा विकासदर ६ टक्के असे असूनही चिदंबरम यांना वाटते की, ठोक दरमहसूल १९ टक्क्यांनी वाढेल. पुन्हा २०१४-१५ या वर्षात वित्तीय तूट फक्त ४.१ टक्के असेल असे त्यांना वाटते. सरकारला जर देशाच्या प्रगतीचर वेग वाढवायचा असेल तर त्याकरीता सार्वजनिक खर्च वाढवावा लागेल. तसे केले नाही, तर गुंतवणक होणार कशी ? पण सरकारचा या वर्षी जितका योजना खर्च होता, तेवढाच पुढल्या वर्षासाठी असणार आहे.

केंद्र सरकारने मागील वर्षी राष्ट्रीय कौशल्याविषयक प्रमाणपत्र व आर्थिक प्रोत्साहन योजनेस आरंभ केला. त्या अंतर्गत एक लक्ष ६८ हजार तरुणांनी अर्ज केला व त्यापैकी ७७ हजारांना प्रशिक्षण देण्यात आले. २४ क्षेत्रवार कुशल मंडळे ४२२ प्रशिक्षण भागीदार व १७ मूल्यमापन संस्थांचा कार्यक्रमात सहभागी झाले आहेत. ६८ व्या राष्ट्रीय नमुना पाहणी कार्यक्रमाच्या २०११-१२ च्या अहवालानुसार बेकारीचा वेग त्या आधीच्या पाहणीच्या तुलनेत १.२ टक्क्यांनी वाढून २.७ टक्के वर गेला आहे. शहरी बेरोजगारी ३.२ टक्के वाढली. म्हणजे मंदीचे काय परिणाम होतात ते बघा -देशाचा विकासदर एकेकाळी जो ९ टक्के होता तो साडे चार टक्केयांवर आला आहे.

आता सरकारने राष्ट्रीय उत्पादन धोरण आखले असून नऊ कुल ठोक उत्पादनातील २५ टक्के हिस्सा उत्पादन क्षेत्रातून यावा, हे उद्दिष्ट आहे. परंतु ही अपेक्षा आहे. आता २०१० ते २०१२ दरम्यान अनौपचारिक क्षेत्रात एक कोटी दोन लक्ष रोजगार निर्मिती झाली. परंतु त्यातील ८५ टक्के रोजगारांना सामाजिक सुरक्षिततेचे लक्ष मिळाले नव्हते, याकडे आंतरराष्ट्रीय मजूर संघटनेने लक्ष वेधले आहे.

भारताची अर्थव्यवस्था जीडीपीच्या संदर्भात जगात अकराव्या स्थानावर आहे. परंतु २०१६-१७ पर्यंत वित्तीय तूट तीन टक्क्यांपर्यंत आणण्याचे आपले उद्दिष्ट असून ते गाठणे आव्हानात्मक आहे. विदेशी भांडवल आकर्षित करुन चालू खात्यावरील तूटही मर्यादित ठेवायची आहे. किंमतस्थैर्य व विकास याबाबतीत संतुलन ठेवण्याची जबबादारी रिझर्व्ह बँकेस उचलावी लागेल.

देशाला पुढे नेण्यासाठी कोणत्या गोष्टी कराव्या लागतील ? वित्तीय क्षेत्राबद्दल वैधानिक सुधारणा समित्यांच्या शिफारसी राबवाव्या लागतील. पायाभूत सुविधांत वाढ करून कारखानदारी क्षेत्राचा विकास करावा लागेल. पायाभूत सुविधा निर्मितीकरिता सार्वजनिक खाजगी भागीदारी करावी लागेल. निर्यातीवरील सर्व कर मोडीत काढण्याची गरज असून देशी कारखान्यांना कोणतीही खास संरक्षणे देण्याची आवश्यकता नाही. त्यांना स्पर्धेस तोड दयायला लावणे आवश्यक आहे.

सरकारी अनुदानांना कठोरपणे कामी लावले पाहिजे. गॅस अनुदानाबद्दल जसा घोळ घातला गेला, तसा भविष्यात तरी घातला जाऊ नये. शहरांची पुनर्बांधणी करण्याची जरुरी आहे. देशात शहरीकरणाने वेग पकडला असून, म्हणून नवीन शहरे वसवावी लागतील. परंतु, नव्या शहरांत तरी झोपडपट्टया होणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल.

मागच्या दहा वर्षात आपण प्रत्यक्ष कर संहिता किंवा डीटीसी अंमलात आणू शकलो नाही. विमा दुरुस्ती कायदा संसद समंत करू शकली नाही. परदेशी गुंतवणूकीला परवानगी मिळाली, पण एका रुपयाची देखील नवी गुंतवणूक झालेली नाही. एका चॅनलने केलेल्या पाहणीनुसार देशातील बहुसंख्य शेतकऱ्यांच्या मुलांना शेती करायची नाही. कारण शेतीत फायदा कमी व कष्ट जास्त आहेत, असे त्यांना वाटते. शेतकरी शेती सोडून जाऊ लागल्यास भविष्यात आपण उत्पादनावरील स्वयंपूर्णता नष्ट होऊन आपण पूर्वीप्रमाणे परावलंबी होण्याची भीती आहे. म्हणून शेती व शेतकऱ्यांकडे विशेष लक्ष दिले पाहिजे.

भांडवलांचे व महानगरांचे जागतिकीकरण होण्याचे हे दिवस आहेत. शहरांचीच पुनर्रचना होत आहे. पुणे-मुंबईसारख्या शहरांत प्राइम एरियातील जमिनी कमी आहेत आणि विकासक व बिल्डर या

जमिनी मिळवण्यासाठी करण्यासाठी जमिन माफियांची मदत घेतात. केवळ मानेवर सुरा ठेवून कामे होत नाहीत. त्यासाठी राजकारणी व प्रशासकांची मदत लागते. ही मदत केल्याबद्दल त्यांना नरिमन पॉईंट, वान्द्रे इथले भूखंड दिले जातात. एस आर ए स्किममध्ये बोगस झोपडीवाल्यांची नावे घुसवून प्लॅट ढापण्याचे प्रकारही तेजीत आहेत.

मुंबई वित्तीय सेवांचे केंद्र करण्याच्या मागे सरकार असल्याने स्टॉक मार्केट, कमॉडिटी मार्केट, डेटा मार्केट, करन्सी मार्केट मध्ये अब्जावधी रुपयांची गुंतवणूक होत आहे. त्यामुळे जमिनी व प्लॅटसचे दर फक्त कॉर्पोरेट्सनाच परवडू शकतात. परिणामी हे महानगर असो वा पुणे, नाशिकसारखी शहरे असोत, ती मूळचे रहिवासी आणि तळागाळाचा वर्ग यांच्या कक्षेबाहेरची बनत चालली आहेत. वांद्रे मालाड येथील जुन्या बंगल्यांतील रहिवाशांना, कोळीवाडयातील कोळयांना हुसकावून लावण्यासाठी दहशतीचे मार्ग अवलंबिले गेले आहेत.

जागतिकीकरण व उदारीकरणामुळे महानगरांना आणि नागरी जमिनींना अधिक मागणी निर्माण झाली. याच काळात झोपडपट्टी पुर्नविकास योजनांमध्ये दाउद टोळीने पाचशे कोटी रुपये गुंतवले. झोपडपट्टी वाल्यांना हप्ता देऊन त्यांच्याकडून संमतीपत्र घेणे. त्यांना हाकलून झोपडया तिसऱ्याच्याच नावे ट्रान्सफर करणे, बिल्डरशी संगनगन करणे हे उद्योग सुरु झाले.

वीज, पाणी, शिक्षण, आरोग्य ही सर्वच क्षेत्रे टप्प्याटप्प्याने खाजगी क्षेत्राच्या हवाली करण्यात येऊ लागली. सरकारी व पालिका शाळांची वाताहत करण्याचा कट रचण्यात आला आणि अन्य शाळांनी बोगस पटनोंदणी दाखवून अनुदाने वाटली. नवमध्यम वर्ग आणि श्रीमंत वर्ग आपल्या पोरांना कॉन्हेंट व इंटरनॅशनल स्कूलांत घालू लागला. मोफत व सक्तीचे शिक्षण नावापुरते असून गोरगरिबांना शाळा परवडेनाशी झाली आहे. उदारीकरणानंर शिक्षणावरील सरकारी वर्चस्व नष्ट झाले. सार्वजनिक आरोग्यासाठी खाजगी-सरकारी भागीदारीच्या मुखवटयाखाली खाजगीकरण वाढले. त्यामुळे गरिबांना आजारी पडण्याचेही स्वातंत्र्य नाही. बडया खाजगी इस्पितळांत हजारो रुपये ॲडव्हान्स जमा केले नाहीत तर रुग्नाला दाखलच करुन घेतले जात नाही.

दर हजार लोकसंख्येमागे एक डॉक्टर असावा. अशी जागतिक आरोग्य संघटनेची (World Health Organization) सूचना आहे. प्रत्यक्षात तीस हजार लोक संख्येस सेवा पुरवण्याऱ्या प्राथमिक आरोग्यकेंद्रात फक्त दोन डॉक्टर असतात. कामगारांसाठी राज्य कामगार विमा योजना आहे. ती अशा रीतीने राबविली जाते की, आज ती ना कामगारांना हवी आहे ना मालकांना. आरोग्यावरील खर्च जीडीपीच्या तीन टक्के तर करण्याचे (आज एक टक्के आहे) वचन पूर्ण झालेले नाही.

विकासात समाविष्ट करून घेतला न गेलेला कनिष्ठ स्तर जगण्याचीच धडपड करतो आहे. नियंत्रित अर्थव्यवस्थेत भ्रष्टाचाराच्या विपुल संधी होत्या व उदारीकरणानंतरदेखील त्या वाटा कमी झाल्या. परंतु, गुंतवणूकीची गजबज निर्माण झाल्याने भ्रष्टाचार वाढला. राजकीय अभिजनांनी त्यांचे फायदे केले. मात्र प्रचंड प्रमाणात झालेल्य श्रमांच्या अनौपचारिककरणामुळे अत्यल्प वेतनावर बारा-बारा तास राबविण्याची संख्या फुगत गेली. संघटित क्षेत्राच्या वेतनात तुफान वाढ आणि असंघटितांचे मात्र जीणे हराम, हा विरोधाभास आहे. जागतिकीकरणानंतरही अस्मितांचे भावनाप्रक्षोभी राजकारण कमी झालेले नाही.

भांडवलशाही म्हणजे बेबंदशाही, असे मानून चालणाऱ्यांच्या वर्तमानामुळे जगभर इतका क्षोभ निर्माण झाला आहे की, या आर्थिक दहशतवादाविरुद्ध निषेध करण्यासाठी वॉल स्ट्रीट ताब्यात घ्या, असे नारे दिले जात आहे. दहशतवादी भीती कमी होण्याऐवजी गेल्या दोन दशकांतील ही स्थिती आहे की, जगण्यातील अनिश्चितता भीती आणि अनपेक्षितता मुळीच कमी झालेली नाही.

यूपीए सरकारने एक गोष्ट केली आहे व ती म्हणजे परदेशातील व्यक्तींना थेट भारतीय शेअर बाजारात गुंतवणूक करण्याची परवानगी दिली आहे. पूर्वी फक्त परदेशी संस्थापक गुंतवणूकदारांनाच ही गोष्ट करता येत होती. असंख्य परकियांना चांगल्या-चुंगल्या भारतीय कंपनीत पैसे टाकून उत्तम रिटर्न मिळवावा, असे वाटत असते. त्यांना हे शक्य होणार आहे.

जेव्हा सरकार अडचणीत असते, तेव्हाच महत्वाचे निर्णय होत असतात. काँग्रेस पक्षातून तीव्र विरोध असतानाच इंदिरा गांधींनी बँकांचे राष्ट्रीयकरण करण्याचा निर्णय घेतला, भारताला सोने गहाण ठेवण्याची पाळी आली होती. तिजोरीत डॉलर्स नव्हते, तेव्हाच उदारीकरणाचे पर्व सुरु झाले हाते.

मध्यंतरी डॉलरच्या तुलनेत रुपया १७ टक्केंनी घसरला. याचे कारण घटती भांडवलशाही आयात हेच होय. डॉलरची चणचण उत्पन्न झाल्याने रूपया हादरला.

रिझर्व्ह बँकेने जी आकडेवारी प्रसिद्ध केली आहे त्यानुसार भारताची चालू खात्यावरची तूट २०११-१२ या वर्षाची दुसऱ्या तिमाहीत एक राष्ट्रीय उत्पादनाच्या (जीडीपी) ३.७ टक्के इतकी आहे. त्यापूर्वीच्या वर्षात ती ४.३ टक्के होती. नवीन वर्षातील ही तरी चांगली बाब आहे.

मग प्रॉब्लेम कसला होता? भारताची निर्यात घसरली होती. युरोप-अमेरिकेतील

लोकांचे खिसे रिकामे होते. त्यामुळे ते पूर्वी इतका विदेशी माल घेत नव्हते.

२०११-१२ या वर्षाच्या दुसऱ्या तिमाहीत व्यापारी तूट ४४ अब्ज डॉलर्स होती. आधीच्या वर्षात ती ३७ अब्ज डॉलर्स होती. व्यापारी तूट म्हणजे आयात व निर्यात यांच्यातील फरक. आपली निर्यात मंदावल्याने तूट वाढली. भारतातील औद्योगिक उत्पादनही घटते म्हणून, नाहीतर या काळातल्या माल व सुटे भाग यांची आयातही वाढली असती. आयात खूप व निर्यात कमी म्हणजे वाटच लागते. वास्तविक, २०११ च्या तुलनेत २०१२ मध्ये निर्यात दुपटीने वाढली. पण मुळात निर्यातीचा वेग इतका खाली आला होता की, त्या तुलनेत ही वाढ होती हे, आपण मानले पाहिजे.

भारताच्या आयातीत पेट्रोल, तेल, आणि वंगणाचा वाटा प्रचंड आहे. एप्रिल ते सप्टेंबर २०११ या वर्षात ही आयात ७१ अब्ज डॉजर्सची होती. या आयातीत दिवसागणिक तुफान भर पडत होती. इतक्या आयातीसाठी परकीय चलन आणायचे कोठून? त्यासाठी निर्यात विकास व्हायला हवा पण जागतिक मंदी असताना हे कसे शक्य हाते? नोव्हेंबर २०११ मध्ये तर निर्यातचा वेग अवघ्या ४ टक्क्यांवर आला.

दुसरी बाब म्हणजे विदेशातील व्यापारी कर्जउभारणीत सारखी भर पडत आहे. जुलै ते सप्टेंबर २०११ दरम्यान एकूण वित्तीय खात्यावरच्या इतर गुंतवणुकीत विदेशात आपण जी व्यापारी कर्जे उभारली त्याचा वाटा होता ४२ टक्के. त्या आधीच्या तिमाहीपेक्षा ही वाढ खूपच म्हणायची.

त्यात आंतरराष्ट्रीय बाजाराप्रमाणे पेट्रोल डिझेलच्या किंमती ठरवण्यात आपल्याला तसे यश आलेले नाही. त्यामुळे सबसिडीवरच्या सरकारचा खर्च वाढतो. भारत व पाश्चात्य अर्थव्यवस्था यांच्यातील व्याजदरातील फरकामुळे विदेशात कर्ज उभारणी करणे आकर्षक ठरते. या दोन्ही गोष्टींमुळे बाहय क्षेत्राला झळ पोहचते.

म्हणजे विदेशातून भांडवल कमी येत आहे आणि नुसती कर्ज उभारणी मात्र वाढत आहे. दोन वर्षापूर्वी इथल्या शेअरबाजारातील एक अब्ज डॉलर्स इतकी गुंतवणूक तिथल्या लोकांनी वाढून घेतली.

भारतात डॉलर्सची भांडवलाची चणचण आहे आणि कर्ज उभारणीचा बोजा वाढतो आहे. केंद्रसरकारने याचा विचार करून योग्य ती पाऊले टाकली पाहिजेत.

परकीय भांडवल असे शब्द जरी उच्चारले तरी कम्युनिस्टांचा पोटझळ उठतो. वास्तविक पश्चिम बंगालचे माजी मुख्यमंत्री ज्योती बसू व बुध्ददेव भट्टाचार्य यांनी परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी विदेश दौरे केले हाते. लोकसभेचे माजी अध्यक्ष सोमनाथ चटर्जी यांनी प. बंगाल औद्योगिक विकास महामंडळाचे अध्यक्ष म्हणून काम करताना विदेशी भांडवलाचे समर्थन केले होते. परदेशात जाऊन नाकरी करणारे मल्याळीजन जे पैसे मायदेशी धाडतात त्यावर केरळची अर्थव्यवस्था चालते. फिडेल कॅस्ट्रोंचा क्यूबा, चार्वेझ यांच्या व्हिएतनाम आणि पुतिन यांच्या रशिया मध्येही विदेशी भांडवल आहे. २०१२ या वर्षी जगाच्या एकूण थेट विदेशी भांडवलात (एफ डी आय) चीनचा वाटा १८ टक्के होता. इकॉनॉमिस्टच्या अंदाजानुसार चालू वर्षात भारताच्या विकास ५.८ टक्के तर चीनच्या ५.५ टक्के असेल.

याचा अर्थ विदेशी निधीखेरीज राजकारण व अर्थकारण करता येत नाही, असे नव्हे परंतु भारतासारख्या विकसनशील देशात शहरे आणि मध्यम वर्ग झपाटयाने विस्तारित आहे. ग्रामिण भागात पायाभूत सुविधा निर्माण करण्याची गरज आहे. इन्फ्रास्टक्चरसाठी ५० लक्ष कोटी रुपये लागणार आहेत. तेवढे भांडवल आपल्याकडे नाही. अमेरिकेची अर्थव्यवस्था सुधारल्यामुळे आणि फडेरल रिझर्व्हच्या धोरणांमुळे तेथील ज्या विदेशी अर्थसंस्था भारतात निधी घेऊन आल्या होत्या, त्या मायदेशी परतल्या. गतवर्षी दोन महिन्यांत भारतीय शेअर बाजारातून १० बिलीयन डॉलर्स बाहेर निघून गेले. चालू तूट म्हणजेच आयात निर्यात उत्पन्नातील तफावत वाढणे. १९९१ मध्ये भारताकडे फक्त पंधरवडाभर पुरेल इतकेच परकीय चलन होते. ते आज सहा महिन्यांइतके आहे. परंतु, उदारीकरणानंतर देशाची परिस्थिती सुधारली आहे पण त्यामुळे गरजाही वाढलेल्या आहेत. त्यामुळे हा परकीय चलनसाठा पुरेसा नाही.

ही तूट ८५ बिलियन डॉलर्सची आहे. व्यापारी कर्जे, विदेशी कर्जे परदेशस्थ भारतीयांकडून येणारे निधी आणि एफ डी आय हे भांडवलाचे स्थिर स्त्रोत आहेत. त्यामधून ६० बिलियन डॉलर्स मिळाले. तर शेअर/रोखे बाजारातील पोर्टफोलिओ गुंतवणूकीत २०-२५ बिलियन डॉलर्स येतात. पण जरा खट्ट झाले तरी पोर्टफोलिओ गुंतवणूकदार पळून जातात. उलट, इथल्या कंपन्यात वा कारखान्यांत दीर्घकालीन निधी गुंतवणारे चंचल नसतात. त्यामुळे त्यांच्या कडून जास्तीतजास्त निधी येणे हे फायद्याचे असते. समजा चंचलता स्थिर दोन्ही प्रकारचे भांडवल आले नाही तर डॉलरची चणचण निर्माण होईल. त्यामुळे रुपया आणखी खलावेल. तसे झाल्यास कच्चे तेल, कोळसा, डाळी यांच्या आयातीवरचा खर्च वाढेल. जीवनावश्यक वस्तू, मालवाहतूक प्रवासखर्च सर्वकाही महागेल.

सरकारने नेमलेल्या अरविंद मायाराम समितीने १२ क्षेत्रांत विदेशी भांडवल गुंतवणुकीची मर्यादा वाढवण्याची शिफारस केली होते. सरकारने १२ क्षेत्रात ती वाढवली आहे. पेट्रोलियम नैसर्गिक वायू, कमॉडिटी एक्चैंज, पॉवर एक्सेंज, स्टॉक एक्सचेंज, डिपॉझिटरीज, असेट, रिकन्सट्रक्शन कंपनीज, क्रेडिट इन्फरमेंशन कंपन्या, सिंगल ब्रँड रिटेल, बेसिक व सेल्यूलर सर्व्हिसेस, कुरिअर सर्व्हिसेस, संरक्षणउत्पादन या क्षेत्रांना खुल्या धोरणाचा लाभ होणार आहे. काही क्षेत्रांची मर्यादा २५-५० टक्केंनी वाढवली आहे. तर काहींना परदेशी भांडवल आणताना सरकारच्या मंजुरीची गरज भासणार नाही. त्यांना ऑटोमॅटिक क्लीअरन्स मिळणार आहे. त्यामुळे भांडवलाची आवक व त्याची प्रत्यक्ष गुंतवणूक होऊन प्रकल्प सुरु होणे जास्त वेग येणार आहे.

साधे सेल्युलर फोनचे उदाहरण घेऊ. येथे भागभांडवलात ४९ टक्के वाटा विदेशी असल्यास आपोआप मंजुरी मिळणार तर ४९ ते १०० टक्के साठी फॉरिन इनव्हेस्टमेंट प्रमोशन बोर्डाकडे (एफ आय पी बी) कडे जावे लागेल. व्होडाफोन व रशियाची सिस्टेमा या कंपन्या याचा तात्काळ लाभ घेऊन १० हजार कोटी रुपये आणतील असा होरा आहे. टुजी घोटाळयानंतर १२२ परवाने रद्द केले गेले व दूरसंचार विस्तारच थांबला. भविष्यात स्पॅक्टम लिलावात जास्त भाव मिळेल या क्षेत्राची प्रगती होईल. संरक्षक उत्पादनात अत्याधुनिक तंत्रज्ञान आणण्यात येणार आहे. संरक्षण सामग्रीची भारत प्रचंड प्रमाणात आयात करतो व त्यावर बरेच चलन खर्च होते. परदेशी भांडवलाच्या बळाने देशांतर्गत उत्पादनास चालना मिळाली तर त्यात भारताचा लाभच आहे. विमा क्षेत्रातील परकीय भांडवलमर्यादा २६ टक्के वरुन ४९ टक्के पर्यंत नेण्यात आली असली तरी, त्यास संसदेची मान्यता मिळालेली नाही.

जगात चीननंतर विदेशी भांडवल आकर्षित करणारा देश म्हणजे अमेरिका. त्यानंतर जर्मनी, फ्रान्स, ब्रिटन, ब्राझील, सौदी अरेबिया. भारतात होणारी परदेशी पैशाची आवक अत्यल्प आहे. त्यामुळे साम्राज्यवादाचे कोणतेही आक्रमण भारतात येणार नाही.

अर्थात केवळ परकीय भांडवलामुळे खर्च समस्या सुटणार नाही १९८१ मध्ये वित्तीय पेचप्रसंग निर्माण झाल्यावर उदारीकरण स्वीकारून काही क्षेत्रे परकीय भांडवलास अंशतः खुली करण्यात आले. त्यामुळे भारतात क्रांती वगैरे काही झाली नाही. परंतु, देशात एक नवा मध्यमवर्ग निर्माण झाला. शिक्षणाचा विस्तार झाल्यामुळे शहरेच नव्हे तर खेडयापाडयातील गोरगरिबांच्या मुलामुलींना परदेशाचे तेथील वस्तूंचे सेवांचे आकर्षण निर्माण झाले आहे. विदेशात उच्च शिक्षण घेणारे तेथे नोकऱ्या मिळवणारे लक्षावधी तरुण आहेत. त्यांना तिथल्या सारखे रस्ते, पूल, विमानतळ, बंदरे, कारखाने, शांतीगृहे, गोदामे इथेही व्हावीत असे वाटते.

त्यांना आपल्या जीवनात सकारात्मक बदल व्हावा असे वाटते. देशांतर्गत अर्थव्यवस्था स्वबळावर गतिमान झाली तर ठीक नाहीतर इतर देशांची मदत होऊ अशी त्यांची भूमिका आहे. परंतु विदेशी निधी आला तरी सरकारी कारभार पूर्वी इतकाच ढिलपणाने व लबाडीने होत राहिल, तर ते भांडवल वाढणार नाही, अन्नधान्याप्रमाणे कुजतच राहील.

जवळपास दोन दशकांच्या घोळानंतर संसदेने दोन आठवडयांपूर्वी कंपनी विधेयक २०१२ मंजूर केल्याने एकदाचे गंगेत घोडे न्हाले! पूर्वीचा कंपनी कायदा १९५६ साली करण्यात आला होता. त्यानंतर लायसन्स परमिट राज आले आणि गेले. खाउजा म्हणजेच खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण आले. सार्वजनिक क्षेत्र आक्रस्तत जाऊन खाजगी उदयोगधंद्याचे साम्राज्य निर्माण झाले. काही बहुराष्ट्रीय कंपन्यांची उलाढाल लहान देशांच्या अर्थव्यवस्थांपेक्षा मोठी आहे. त्यामुळे कंपनी कायद्यात बदल आवश्यक होता. आपल्याकडच्या राजकीय धुमश्चक्रीत या कायद्याची पुरेशी दखल घेतली गेली नाही.

पूर्वीच्या कायद्यात ६७८ कलमे होती तर नव्या कायद्यात ४७० कलमे आहेत. एखाद्या कंपनीवर सामूहिक खटला (वटल्यास - ॲक्शन सूट) दाखल करण्याची तरतूद नव्हती. ती नव्या कायद्यात करण्यात आली आहे. मागच्या तीन वर्षांनी सरासरी दोन टक्के रक्कम सामाजिक उत्तरदायित्वासाठी (सी एस आर कार्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी) राखून ठेवावी लागणार आहे. आधी स्वतंत्र संचालकांची तरतूद नव्हती. आता संचालकांची संख्या १२ वरुन १५ वर नेण्यात आली आहे. व्हिडिओ कॉन्फरन्सिंग अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमातून संचालक मंडळाच्या बैठका घेता येतील. कंपनी लॉ बोर्ड आणि बोर्ड ऑफ इंडास्ट्रियल एन्ड फायनान्शिअल रिकन्सट्रक्शन (बी आय एफ आर ) ची जागा नॅशनल कंपनी लॉ ट्रायब्युनल घेईल.

१९५६ च्या कंपना कायद्यात समभाग व कर्जरोख्यांचे नियमन केले जात होते. आत सर्व प्रकारच्या सिक्यरिटीजचे नियमन केले जाईल. लेखा परिक्षकांवर पूर्वी निर्बंध नव्हते. आता दर पाच वर्षांनी लेखा परिक्षक बदलावा लागेल. त्यामुळे कंपनी व्यवस्थापनाशी साटेलोटे होऊन

सत्यम सारखे प्रकार घडण्याची शक्यता कमी असेल. लेखापरिक्षकास एका वेळी जास्तीत जास्त २० कंपन्यांचे काम हातात घेता येईल.

या कायद्याच्या पहिला मसुदा संसदेत २००८ साली सादर करण्यात आला होता. यूपीए सरकारला अहोरात्र गतिप्रदान करणाऱ्यांनाही या कायद्याबद्दल सरकारला धन्यवाद देण्यास हरकत नाही. या कायद्यामुळे कंपन्यांच्या व्यवस्थापनावर देखरेख ठेवण्याचा नियमांमध्ये सुसूत्रता येईल. तसेच भारतीय अर्थव्यवस्था नियंत्रित करण्याच्या संस्थात्मक रचनेच्या पुनर्बांधणीचे हे काम आहे व म्हणूनच ते महत्त्वाचे आहे. कोणत्याही बाजारचलित अर्थव्यवस्थेमध्ये खेळांचे योग्य नियम करण्याची आवश्यकता असते.

न्यायालयीन प्रक्रियेत न शिरता ताबा व विलीनीकरण प्रक्रिया सुलभ करण्यात आली आहे. समभागांची फेरखरेदी, कर्मचाऱ्यांसाठी स्टॉक ऑक्शन याचा कायद्यात व्यापक विचार करण्यात आला आहे. जगविख्यात व्यवस्थापन चिंतक पीटर ड्रकरच्या मते, कंपन्या या महत्वाच्या सामाजिक संस्था आहेत. त्यामुळे त्यांचे नियंत्रण कसे केले जाते, हे महत्वाचे ठरते. सामूहिक खटले, लेखापरिक्षकांची नियुक्ती, व स्वतंत्र संचालक यामुळे कॉर्पोरेट गव्हर्नन्स सुधारणार आहे.

भारतात ७५ ते ८० टक्के व्यवसाय कुटुंबकेंद्रित आहेत. अशावेळी भागधारकांना अधिक हक्क देणे, त्यांना कंपनीची जास्तीत जास्त माहिती देण्याचे व्यवस्थापनावर बंधन आणणे कंपन्यांवर नियंत्रणाचा दर्जा या कायद्याद्वारे गाठता येईल.

भारतातील बहुसंख्य कंपन्या संचालक मंडळावर होयबांची नियुक्ती करत असतात. आम्ही प्रोफेशनल आहोत, अशी टिपकी वाजवणाऱ्यांची हिच पद्धत असते. काही कंपन्यांचे विलीनीकरण वादग्रस्त ठरले. अशावेळी संचालक मंडळांनी मौन पत्करले. संचालकांनी कधी व्यवस्थापनाकडून अधिक माहिती मागविली आहे, असे अपवादानेच घडते. कारण त्यांना व्यवस्थापनास अडचणीत आणायचे नसते. संचालक म्हणून भत्ते मिळतात, सर्वच लाभ उपटता येतात. शिवाय जास्त पडून विचारले तर उगीच नारळ मिळेल, अशी भीती असते. वास्तविक, सामान्य भागधारकांचे हितरक्षण करणे, हे कंपनी संचालकांचे काम असते. परंतु, ते कोणा एका गटाचेच प्रतिनिधीत्व केल्यासारखे वागतात. स्वतंत्र संचालक नेमल्यामुळे हुजरेगिरी कमी होईल, अशा अपेक्षा आहे. अर्थात कंपन्यांची व्यवस्थापने कायद्याची डोळसपणे अंमलबजावणी कितपत कायद्यास वळसा घालण्याचे तंत्र या मंडळींना अवगत असेलच. उदाहरणार्थ दूरसंचार, वीज, इत्यादी क्षेत्रांसाठी नियामक प्राधिकरणे स्थापण्यात आली. त्यावर सरकारी प्रशासकांचीच खोगीरभरती झाली. ते सरकारचीच लाईन चालवतात. उद्या खाजगी कंपन्या स्वतंत्र संचालकांनाही आमिषे दाखवण्याचा प्रयत्न करतील, म्हणजे कायद्याच्या उद्देशास हरताळ न फासण्याची जबाबदारी उद्योगपतींची देखील आहे.

कंपन्यांवर सामाजिक कामे करण्याची जबाबदारी टाकल्यामुळे लगेच भारावून जाण्याचे कारण नाही. एकतर टेल्को, इन्फोसिससारख्या मोजक्या कंपन्यांनाच समाजकार्याची गुणवत्ता राखता येते. शिवाय सी एस आर च्या नावाखाली मालकाची कन्या, सुनबाई अशांच्या लाडक्या प्रकल्पावरच खर्च केला जाईल, त्यांना मिरवून घेण्याची हौस भागवून घेता येईल. उद्योगपती स्वत:च्या खिशातून समाजकार्य करण्याऐवजी कंपनीच्या खिशाला भोक पाडतील. पुन्हा त्याचा खर्च शेवटी ग्राहकाच्या डोक्यावरच टाकला जाईल.

सरकारने मोठेच पाऊल टाकले आहे, हे मात्र खरे. टाटा सन्स, आयडीएफसी, इंडिया पोष्ट, सूर्यमणी फायनान्सींग अशा एकूण २६ कंपन्यांना भारतात बँका स्थापन करायच्या आहेत. त्यासाठी त्यांनी रिझर्व्ह बँकेकडे अर्ज केला आहे. त्या पैकी मोजक्या कंपन्यांनाच परवाना मिळणार आहे. अगदी प्रत्येकाने मार्गदर्शक सूत्रांचे पाऊन कोठे तरी पण बँकिंग क्षेत्रात बदल होऊ घातले आहेत, हे मात्र नक्कीच.

बिर्ला, टाटा सन्स, बजाज, लार्सन एन्ड टुब्रो, अनिल अंबानिंची रिलायन्स कॅपिटल अशा अनेकांनी अर्ज केले आहेत. दोन म्युच्युअल फंड, चार शेअर दलाली फायनान्स कंपन्यांनी तर काही कंपन्यानी बिगर बँकिंग उप कंपन्यां मार्फतअर्ज केले आहेत. बँक सुरु करण्यासाठी जवळ पाचशे कोटी रुपयांची गंगाजळी हवी. ठेवींमधील २७ टक्के रक्कम रिझर्व्ह बँकेकडे रोखीत ठेवावी लागेल २५ टक्के शाखा ग्रामीण भागात उघडाव्या लागतील आणि ४० टक्के कर्जे प्राधान्य क्षेत्रासाठी म्हणजे शेती निर्यात लघुउद्योग यासाठी द्यावी लागतील.

अलिकडच्या काळात भ्रष्टाचाराची एकापाठोपाठ एक प्रकरणे बाहेर निघाली त्यामुळे प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवावे लागेल. अर्थात रिझर्व्ह बँक कुठल्याच दबावास बळी पडत नाही, हे वाय. व्ही. रेड्डी व डी. सुब्बाराव यांच्या गव्हर्नरपदाच्याकाळात सिध्द झाले. परंतु केंद्रिय अर्थखाते तसेच बँकिग विभागाचा काय भरवसा? शिवाय सूर्यमणी, इनमॉक्स मॅनेजमेंट सर्व्हिसेस लेखापरिक्षण करणारी कंपनी तसेच नोयडाची

स्मार्टग्लोबल व्हॅंचर्स ही नावे फारशी कुणाला ठाऊक नाहीत. या उलट महिंद्रा अॅंड महिंद्र फायनान्सचा ग्रामिण भागात घसारा आहे. तिने बँकिगमध्ये प्रवेश करण्यात उत्सुकता दाखवली होती. पण रिझर्व्ह बँकची मार्गदर्शक सूत्रे अव्यवहार्य वाटली. एखादी बिगर बँकिंग कंपनी आणि त्याच समूहातील बँक यांचे सहअस्तित्व सर्वांना फायदेशीर ठरणारे आहे, असे काही प्रवर्तकांचे म्हणणे असले तरी हे रिझर्व्ह बँकेस मंजूर नाही. निधीचा इकडून तिकडे फेरफार होऊ नये यासाठी दक्षता घेतलीच पाहिजे.

नवीन बँकांना आपला आर्थिक सर्वसमान रकमेचा बिझिनेस प्लॅन सादर करावा लागणार आहे आणि ही नसती कटकट आहे, असे बऱ्याच अर्जदारांना वाटते.

तरी सुद्धा बँकिगमध्ये तऱ्हे तऱ्हेच्या कंपन्यांना इतका रस वाटण्याचे कारण काय? एकतर देशात प्रत्येकी तीन व्यक्तींमागे दोघांकडे मोबाईल असतो. पण तीनपैकी एका पर्यंतच बँकिंगच्या सुविधा पोहोचलेल्या आहेत. म्हणजेच ६७ टक्के लोकांचा बँकेशी संबंधच आलेला नाही. त्यामुळे बाजारपेठ प्रचंड आहे. इतर वस्तू लोक एक दोनदाच घेतात. पण बँकेत एकदा खाते उघडले की ते बंद केले जात नाही अगदी मरेपर्यंत! एच डी एफ सी बँकेने पंधरा वर्षांत एकदाच स्वत:चे बाजारमूल्य हासिल केले, हे उदाहरण सगळयांसमोर आहे. पुन्हा राष्ट्रीयीकरण होण्यापूर्वी तुमच्याकडे बँकिंगचा परवाना असणे, हे प्रतिष्ठेचे मानले जाईल हे विसरु नये.

उदारीकरणानंतर १९९४ पासून (राष्ट्रीयकरणास पंचवीस वर्षे लोटल्यानंतर) बँक परवाने देण्याचे धोरण खुले झाले. तेव्हा हिंदुजाच्या इंड्सइंड बँकेस परवानगी देण्यात आली. तरीही नवीन पिढीतील सहाच खाजगी बँका अस्तित्वात आहेत. २००३ या वर्षी येस बँकेस परवाना मिळाल्यावर एकाही नवीन बँकेस मंजुरी दिली गेली नाही.

आता ज्यांनी अर्ज केले आहेत, त्यांच्यापैकी कुणाची निवड केली जाईल, ते रिझर्व्ह बँकेच्या उच्च स्तरीय समितीच्या निर्णयावर अवलंबूल असेल. एकदा मंजुरी मिळाली की प्रवर्तकांना दीड वर्षांत सर्व प्रक्रिया पूर्ण करुन बँक सुरु करावी लागेल. प्रथम भांडवलाची व्यवस्था करावी लागेल. नॉन-ऑपरेटिंग होल्डिंग कंपनीकडे आर्थिक व्यवसाय सुपुर्द करावा लागेल आणि बँकिंगच्या पायाभूत तांत्रिक सुविधां निर्माण कराव्या लागतील.

बँकिंग हे खायचे काम नाही त्यात विश्वासार्हता व सेवेची गुणवत्ता हे महत्वाचे घटक असतात. एकदा विश्वासास तडा गेला तर लोक भराभर ठेवी काढून घेतात व बँक बुडते. त्यामुळे ज्यांनी कंपन्यांच्या ठेवीदार, भागधारक, रोखधारक व ग्राहक यांना बनविण्याचे काम केले अशांना कोणत्याही परिस्थितीत बँकिंगचे परवाने दिले जाता कामा नयेत.

ज्या उद्योगपतींनी राष्ट्रीयकृत बँकाची हजारो कोटी रु. ची कर्जे बुडवली त्यांनी उद्या स्वत:चीच बँक काढून जनतेच्या ठेवी डुबवल्या तर काय करायचे ! म्हणून सावधगिरी बाळगावी लागेल. फक्त भरपूर भांडवल असणे पुरेसे नाही त्यांनी गोरगरीबांपर्यंत वित्तीय सेवा पोहचविण्याचे काम केले आहे काय, तशी प्रवर्तकाची तयारी आहे काय, हे बघीतले पाहिजे. ठेवी संकलनाचे काम कार्यक्षमतेने करणाऱ्या आणि पत असलेल्या वा पत नसूनही खात्रीपूर्वक कर्ज परत फेडतील अशांनाच कर्ज वाटप करण्याचा अनुभव असलेल्या कंपन्यांची निवड करणे उचीत होईल. ज्यांना परवाना मिळेल त्या कंपन्यांनी आपल्याच समूहातील दुसऱ्या कंपन्यांना कर्जे देऊन चालणार नाही.

आपल्याकडे ठेवीदार ग्राहकांचे संरक्षक कवच तरतूद असल्यामुळे रिझर्व्ह बँक नवीन खेळाडूंना परवाना द्यायचे टाळत होती. आता हे परवाने दिल्यावर या बँकावी प्रभावी देखरेख ठेवावी लागेल. उद्योग समूहांच्या बँकांनी आपल्याच गोतावळयातील कंपन्यांना कर्जे देऊन ती बुडाली व बँक दिवाळखोर ठरली आणि ती वाचविण्यासाठी सरकारने मदत केली तर ते अयोग्य ठरेल. अमेरिकेतील प्रत्येक गोष्टींचे अनुकरणे करण्याचे कारण नाही.

इंदिरा गांधीनी बँक राष्ट्रीयीकरण केल्या नंतरच बँकाचा पसारा खेडयापाडयापर्यंत विस्तारला परंतु तरीसुद्धा बहुसंख्य जनतेला बँक म्हणजे काय तेच ठाऊक नाही. म्हणजे राष्ट्रीयीकरणाच्याही मर्यादा आहेत. भारतात बँकिग क्षेत्रात कित्येक वर्षे स्पर्धाच नव्हती. विदेशी बँका, खाजगी बँकाचा प्रवेश मर्यादित हाता. भविष्यात नवीन बँका येतील, त्यांनी नफा जरूर कमवावा परंतु, ग्रामीण भागकडेही लक्ष द्यावे. आज तेथेही बँकिगचे मार्केट आहे. पण ही मोकळीक देतानाच बँक ग्राहक फसवला जाणार नाहीत, वाटेल तशी सेवामूल्ये आकारली जाणार नाही, हे पाहायला हवे. बँक ग्राहक संरक्षणार्थ एक स्वतंत्र विधायक यंत्रणा तसेच रेझोल्यूशन कॉर्पोरेशनची स्थापना (बँकांचा बोजा करदात्यांवर फार पडू नये हे बघण्यासाठी) करावी, अशी सूचना प्रस्तावित करण्यात आली आहे. ती अमलात आणणे योग्य ठरेल. देशाची अर्थव्यवस्था स्थित्परावस्थेत आहे त्यात सुधारणा घडवण्याचे आव्हान आपल्याला पेलवायचे आहे.

*(**हेमंत देसाई** - जेष्ठ विचारवंत, लेखक आणि राजकीय विश्लेषक)*




# रोजगारनिर्मितीविना विकास

– आर्तिका वत्स

विकासाच्या मार्गावरील भारताच्या वाटचालीची गेल्या दशकभरातील आकडेवारी विस्तृत स्वरूपात उपलब्ध आहे. १९९० च्या दशकाच्या सुरूवातीला धोरणात झालेल्या बदलांपासून विकासदर, उत्पन्नातील वाढ, बचत आणि गुंतवणूक यांतील वाढ, थेट परकीय गुंतवणूक आणि परदेशी वित्तीय संस्थांच्या गुंतवणुकीचा ओघ या सर्वांचा व्यापक अर्थाने सकारात्मक दिशेने प्रवास सुरू होता. दुसऱ्या बाजूला वाढती विषमता, सामाजिक अस्वस्थता, प्रचंड प्रमाणात झालेले विस्थापन आणि रोजगारनिर्मितीचा अभाव असलेला विकास या स्वरूपात मोजावी लागलेली जागतिकीकरणाची किंमत अधोरेखित करणारी विस्तृत प्रमाणातील आकडेवारी आणि संशोधनात्मक माहितीदेखील उपलब्ध आहे. या दोन्ही बाजूंची पाठराखण करणारी मोठ्या प्रमाणातील आकडेवारी, अनुभव आणि प्रयोगावर आधारित मुद्दा सिद्ध करणारा पुरावा आणि निर्दोष तार्किक आणि वाचकांना मान्य करायला लावणारी स्पष्ट मांडणी उपलब्ध आहे. या संदर्भातील एका दृष्टिकोनावर लक्ष केंद्रीत करणे आवश्यक आहे तो म्हणजे, रोजगार निर्मिती. सुधारणांमुळे नवे रोजगार उपलब्ध झाल्याचा आनंद सुधारणांचे पाठीराखे व्यक्त करत असतात. तर काहींच्या मते वाढत्या खासगी गुंतवणूकीचा थेट संबंध रोजगार निर्मितीशी असतो. या मुद्द्यांवर समाजातील मध्यमवर्ग समाधानी असल्याचे स्पष्टपणे दिसते. भ्रष्टाचार आणि वशिलेबाजी यामुळे नोकरी मिळू न शकणारा गरीब, कष्टाळू तरूण हा आता बॉलीवूडमधील चित्रपटांच्या केंद्रस्थानी दिसत नाही. मध्यमवर्गाच्या आकांक्षा, यश आणि श्रीमंती यांचे प्रतिबिंब आता या चित्रपटांमध्ये पहायला मिळते. चित्रपट हे समाजाचे प्रतिबिंब असते असे जर मानले तर मध्यमवर्गाने गेल्या २०-३० वर्षात अनुभवलेले नेमके बदल त्यात प्रकर्षाने दिसून येतात. उद्योग जगताला पर्यवेक्षक किंवा व्यवस्थापक सामान्यपणे मध्यम वर्गातूनच मिळतात. अंगमेहनती, कुशल आणि अकुशल कामगार यांच्यासंदर्भात विकासाची वाटचाल अगदी अशीच झाली असल्याचे कोणी छातीठोकपणे सांगू शकेल का? कामगारांच्या संघटनांचे संप आता बॉलीवूडमधील चित्रपटांतून आणि कमी-अधिक प्रमाणात प्रत्यक्ष जीवनातून देखील गायब झाले आहेत. मात्र, हे खरे मानायचे का की, कामगार वर्ग समाधानी आहे आणि त्यांना संप करण्याची आवश्यकता भासत नाही किंवा प्रचंड प्रमाणात असंतोष असूनही संप होणार नाहीत याची आपण प्रत्यक्ष किंवा प्रत्यक्षपणे खबरदारी घेतली आहे, त्यामुळे संप गायब झाले आहेत.

**परिणाम :**

वाढत्या मध्यमवर्गामुळे अर्थव्यवस्थेच्या वाढीला अनेक मार्गांनी चालना मिळेल अशी अपेक्षा होती. नॅशनल कौन्सील ऑफ अल्पाईड इकोनॉमिक रिसर्च या संस्थेने केलेल्या बाजारातील माहितीबाबत घरांमध्ये जाऊन केलेल्या सर्वेक्षणानुसार, 'भारतातील महान मध्यमवर्गाच्या संख्येत वाढ झाल्याने' जीवनावश्यक वस्तूंच्या

मागणीत लक्षणीयरित्या वाढ होईल अशी अपेक्षा होती. मध्यमवर्गीयांची संख्या वाढल्याने आर्थिक उलाढाल विस्तृत स्वरूपात वाढेल आणि अंतिमत: त्याचा फायदा समाजातील गरीबातील गरीबांपर्यंत पोहचेल अशी कल्पना होता. व्यवसाय आणि उच्च उत्पन्न गटांना करांमध्ये सवलती आणि अन्य फायदे देण्यामागे हेच मुख्य सूत्र होते. जागतिकीकरण झालेल्या अन्य बहुतेक देशांप्रमाणे भारताने गुंतवणुकीसाठी विविध प्रकारे प्रोत्साहन देऊ केले आहे. यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे त्यामागचा मूलभूत विचार गुंतवणुकीमुळे विकासाला चालना मिळेल, त्यातून उत्पन्नात मोठी वाढ होईल, अधिक नोकऱ्या निर्माण होतील, सरकारच्या उत्पन्नात मोठी वाढ होईल (करांच्या रूपाने), मोठ्यात प्रमाणात बचत होईल (जी पुन्हा गुंतवली जाते) आणि विकासाच्या प्रक्रियेला चालना मिळेल असाच आहे. तथापि, प्रत्यक्षात अशी सुखावह परिस्थिती निर्माण होणे किंवा न होणे हे अनेक घटकांवर अवलंबून असते. खासगी गुंतवणूकीला प्रोत्साहन दिल्यानंतर गुंतवणूकीचा ओघ कामगार पूरक तंत्रज्ञानाऐवजी भांडवली तंत्रज्ञानाकडे वाढला. करातील सवलती, अनुदाने, वजावट भत्ता या सर्वांची सांगड, निर्माण करण्यात आलेल्या रोजगारांच्या संख्येशी न घालता गुंतवणूक केलेल्या रकमेशी घातली गेली. तरीही, विविध उदाहरणांवरून असे दिसून येते की, गुंतवलेल्या रकमेचा आणि रोजगार वाढीचा परस्पर संबंध फार मोठ्या प्रमाणात नव्हता किंवा किमान पुरेसा नव्हता. आर्थिक परिभाषेत असे म्हणता येईल की, परिपूर्ण रोजगारासाठी ती अट आवश्यक असेल परंतु पुरेशी नसेल.

यामुळेच विकासाच्या संदर्भातील अत्यंत महत्त्वाच्या पैलूकडे- 'रोजगाराशिवाय विकास' या मुद्द्याचा विचार करू. २००४-०५ आणि २००९-१० या दरम्यानच्या काळात विकासाचा दर उच्च पातळीवर असताना देखील कामगारांच्या एकूण संख्येत केवळ ०.३ टक्के वाढ झाली. काही अर्थतज्ज्ञांच्या मतानुसार, उच्च विकास दराचा संपूर्ण सकारात्मक परिणाम दिसून येण्यासाठी आपल्याला 'दीर्घकाळ' वाट पहावी लागणार आहे.

सोनल डे देसाई यांनी, 'भारतातील मध्यमवर्ग' या आपल्या लेखात राष्ट्रीय नमुना पाहणीतील निरिक्षणांवर केलेल्या विश्लेषणात म्हटले आहे की, गेल्या वीस वर्षात समाजातील सर्व घटकांचा लाभ होत असतानाच, व्यावसायिक आणि सरकारी अधिकारी / व्यवस्थापक यांचा सर्वाधिक विकास झाला आहे. इतरांच्या तुलनेत डॉक्टर्स, इंजिनिअर आणि वकील अशा उच्चस्तरातील व्यावसायिकांच्या, ५००० रूपये आणि त्यापेक्षा जास्त असलेले कौटुंबिक मासिक खर्चाचे प्रमाण अतिशय वेगाने वाढले आहे. १९८३ मध्ये कौटुंबिक मासिक खर्च ५००० रूपये आणि त्यापेक्षा जास्त असलेल्यांच्या श्रेणीत एक-तृतीयांशपेक्षा थोड्या कमी कुटुंबांचा समावेश होता. तर इ.स. २००० पर्यंत निम्म्याच्या जवळपास व्यावसायिकांच्या कुटुंबाचा मासिक खर्च ५००० रूपये आणि त्यापेक्षा जास्त होता. याच्या उलट अंगमेहनती कामगार आणि कारागिरांना फारसा लाभ झाला नाही तर शेतकरी आणि स्वयंरोजगार कमावणाऱ्या व्यावसायिकांना मर्यादित स्वरूपात लाभ झाला. शेतकरी, स्वयंरोजगार असलेले अल्पकालीन व्यावसायिक, अंगमेहनती कामगार, कारागीर यांचे आपल्या लोकसंख्येतील प्रमाण प्रचंड आहे. त्याचबरोबर, समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांमध्ये त्यांचा समावेश होत असल्याने त्यांचे कल्याण हा सरकारी धोरणे आखताना एक कळीचा मुद्दा असलाच पाहिजे.

रोजगारनिर्मितीशिवाय विकास ही स्थिती केवळ भारतातच आहे असे नाही. यू.एन.सी.टी.ए.डी. च्या न्यूयॉर्कमधील कार्यालयातील कार्यालयीन प्रमुख मुस्सी डेलीलेगन यांनी नमूद केल्याप्रमाणे, या देशांच्या (अत्यल्प विकास झालेले देश किंवा एल.डी.सी.च्या संदर्भाने) धोरणांमध्ये आमुलाग्र बदल झाले आहेत. १९८० च्या दशकात त्यांच्यापैकी अनेकांनी संरचनात्मक पुनर्रचना कार्यक्रम राबवले. त्यात हे गृहित धरण्यात आले होते की विकासाच्या हातात हात घालून रोजगारनिर्मिती आणि गरीबी निर्मूलन होईल, पण प्रत्यक्षात ते झाले नाही.

सर्व देशांपैकी यूनायटेड स्टेट्ससह अत्यंत उदारमतवादी आणि अतिशय विकसित देशांमध्ये अशाच प्रकारची समस्या प्रकर्षाने समोर आली. डेली न्यूज या अमेरिकन वृत्तपत्रातील परिपूर्ण रोजगार विरूद्ध रोजगारनिर्मितीविना विकास या लेखात हरमन डॅली म्हणतात, १९४६ चा परिपूर्ण रोजगार कायदा असे घोषित करतो की, परिपूर्ण रोजगार हे अमेरिकी धोरणाचे महत्त्वाचे ध्येय असेल. परिपूर्ण रोजगाराचे ध्येय गाठण्यासाठीचे साधन म्हणून आर्थिक विकासाकडे तेव्हा बघितले जात होते. आज ते समीकरण विपरित झाले आहे. आर्थिक विकास हेच ध्येय झाले आहे आणि ते ध्येय गाठण्यासाठीची साधने स्वयंचलित यांत्रिकीकरण, परदेशगमन, अनिर्बंध स्थलांतर असतील तर त्याची परिणती बेरोजगारीत होणार. एकूण देशांतर्गत उत्पादनाच्या वाढीचे प्रशंसनीय ध्येय गाठण्यासाठी देशाला त्याची ही किंमत मोजावीच लागेल.

त्यामुळे हा ज्वलंत मुद्दा केवळ भारतापुरताच मर्यादित नाही. हा जगभरात सर्वत्र व्यापक स्वरूपात येणारा अनुभव आहे. देशाच्या धोरणांबाबत विचारविनिमय करत असताना आणि ती निश्चित करत असताना सरकारने हे घटक विचारात घेण्याची आवश्यकता आहे.

**भवितव्य :**

संपूर्ण जगभरातील आर्थिक विकासाचा दर फार मोठ्या प्रमाणात कमी होण्याची शक्यता ही अधिक चिंताजनक बाब आहे. मध्यमवर्गाला मिळालेले लाभ आणि त्याचे फायदे थोड्याफार प्रमाणात का होईना निम्न वर्गापर्यंत झिरपण्याने होणारा परिणाम आगामी वर्षांमध्ये कमी होऊ शकतो. भारताचा विकास आता दोन वर्षापूर्वी असलेल्या ८-९ टक्के दराऐवजी सुमारे ५ टक्के दराने होणे अपेक्षित आहे. अर्थव्यवस्थेला चालना देणारा अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणून ज्याच्याबद्दल अपेक्षा बाळगली जाते तो मध्यमवर्ग ग्राहककेंद्रीत अर्थव्यवस्था टिकवून ठेवण्यासाठी आवश्यक गतीने वाढू शकणार नाही.

विकासामुळे रोजगारनिर्मितीला चालना मिळाली नसल्याचा मुद्दा या लेखात प्रामुख्याने मांडण्यात आला आहे, त्याबाबत काही जण असा प्रश्न उपस्थित करतील. अर्थव्यवस्थेची गती मंदावत असल्याबद्दल मग चिंता करण्याचे कारण काय? सरकारच्या प्रतिनिधींनी नमूद केल्याप्रमाणे, २००८ मधील आर्थिक संकटाच्या काळात जर रोजगार, नोकया गमवाव्या लागल्या असतील तर त्यातून हे सिद्ध होते की आर्थिक विकासामुळे रोजगार निर्माण झाले होते. त्यांचा मुद्दा हा होता की विकासामुळे रोजगारनिर्मिती झाली नाही या म्हणण्याला काही अर्थ नाही.

रोजगारनिर्मिती शिवाय विकास याचा अर्थ असा नाही की कोणतेही नवीन रोजगार निर्माणच झाले नाहीत. रोजगारात वाढ याचा अर्थ बाजारातील एकूण रोजगारांमध्ये पडलेली भर. म्हणजेच, नव्याने निर्माण झालेल्या रोजगारांची संख्या वजा पूर्वीपासून उपलब्ध असलेल्या रोजगारांच्या संख्येमध्ये झालेली घट (संरचनात्मक बदल, 'अधिक चांगल्या' आणि अधिक भांडवलपूरक तंत्रांचा वापर, स्पर्धा वाढल्यामुळे बंद पडलेले 'अकार्यक्षम' कारखाने, करमुक्त आयात, अनुदान काढून घेणे इत्यादी कारणांनी). सर्वसामान्यपणे, नंतरच्या मुद्द्यांबाबतची आकडेवारी म्हणजे गमावलेल्या रोजगाराबाबतची आकडेवारी कोणत्याही स्वरूपात ठेवली जात नाही, तर अगोदरच्या मुद्द्याबाबतची म्हणजे नव्याने निर्माण झालेल्या रोजगाराबाबतची आकडेवारी विस्तृत स्वरूपात उपलब्ध असते. तथापि, यापूर्वी उल्लेख केल्याप्रमाणे एकूण देशांतर्गत उत्पादनाचा विकासदर चांगला असण्याच्या कालावधीत (२००४-०५ आणि २००९-१० दरम्यानचा कालावधी) उच्च विकासदर असताना देखील रोजगार मिळणाऱ्यांच्या एकूण संख्येत केवळ ०.३ टक्के वाढ झालेली दिसून आली. स्वयंरोजगारात मात्र प्रत्यक्षात घट झाली होती.

**उपाययोजना :**

अत्यल्प विकास झालेल्या देशांबाबतच्या (एल.डी.सी.) यू. एन.सी.टी.ए.डी. च्या अहवालात, रोजगारनिर्मितीबाबत अत्यल्प विकास झालेल्या देशांना तोंड द्याव्या लागणाऱ्या आव्हानांवर प्रकाश टाकण्यात आला आहे. त्यात असे नमूद करण्यात आले आहे की, पुरेसे दर्जेदार रोजगार निर्माण करण्याचे ध्येय गाठण्यासाठी अत्यल्प विकास झालेल्या देशांनी गुंतवणूक-विकास-रोजगारनिर्मिती यांच्यातील परस्परसंबंधांच्या माध्यमातून उत्पादन क्षमतांच्या विकासावर आधारित रोजगार निर्मिती करण्याची गरज आहे. असा परस्पर संबंध निर्माण करण्यातील सुरवातीचा कळीचा मुद्दा म्हणजे- गुंतवणूक. या अहवालात रोजगारनिर्मितीचा विचार करून गुंतवणूक निश्चित करण्यावर भर देण्यात आला आहे. सरकारची धोरणे, करातील सवलती इत्यादींचा आधार, निर्माण होणाऱ्या रोजगारांची संख्या हा असावा आणि एकूण गुंतवणुकीची रक्कम हा नसावा. गुंतवणूक आणि रोजगारनिर्मिती यांच्यातील परस्परसंबंध चांगले ठेवण्याचा हा एक मार्ग असू शकतो.

याच्या अगदी विरूद्ध टोकाचा मार्ग, असीम श्रीवास्तव आणि अशोक कोठारी यांनी त्यांच्या चर्निंग दी अर्थ या पुस्तकात मांडला आहे. ज्यात, सरकारकडून अत्यल्प मदत घेऊन अल्पकालीन गट कसे स्वावलंबी झाले याचे दाखले दिले आहेत. लघु विकेंद्रीत आर्थिक आणि सामाजिक उपक्रमांतून रोजगार आणि उपजीविकेच्या संधी कशा निर्माण करता येतात याची उदाहरणे त्यात देण्यात आली आहेत. चिंतेची बाब अशी की, खासगी गुंतवणूक आणि एकूण देशांतर्गत उत्पादन वाढीसाठी केल्या जाणाऱ्या प्रयत्नांप्रमाणे या उपक्रमांना सरकारकडून पाठिंबा मिळत नाही. २००६ साली नोबेल शांतता पुरस्कार मिळालेले मुहम्मद युनूस यांनी त्यांच्या बँकर टू दी पूअर या पुस्तकात, गरीबातील गरीबांना दिलेल्या अत्यंत अल्प कर्जाऊ रकमेचा उपयोग त्यांना लहान गावांत व्यवसाय सुरू करण्यासाठी आणि दारिद्र्यातून स्वत:ची मुक्तता करून घेण्यासाठी कसा झाला, यावर भर दिला आहे.

श्रमिकांची एकूण संख्या सुमारे ५० कोटी आहे आणि त्यातील ९० टक्क्यांपेक्षा जास्त असंघटित क्षेत्रात काम करत आहेत असे गृहित धरले तर यापैकी कोणताही एक दृष्टिकोन परिपूर्ण रोजगाराचे ध्येय साध्य करण्यात सक्षम ठरू शकणार नाही. देशात उद्योग-व्यवसायासाठी पोषक वातावरण निर्माण करण्याचाच दृष्टिकोन असला पाहिजे, ज्यामुळे लहान व्यावसायिक आणि स्वयंरोजगार असलेल्या व्यक्तींना देखील आपला व्यापार-उदीम सहजपणे करता येईल. आर्थिक फायद्यांचा संबंध गुंतवणूक करण्यात येणाऱ्या एकूण रकमेपेक्षा रोजगारनिर्मितीशी जास्त प्रमाणात जोडला पाहिजे. यंत्रांसाठी गुंतवणूक केलेल्या रकमेपेक्षा कायमस्वरूपी कर्मचारी म्हणून दिलेल्या नोकऱ्यांच्या संख्येवर करांमधील सवलती (वजावट भत्ता इत्यादी मार्गांनी) अवलंबून ठेवता येऊ शकतात. या आणि यासारख्या उपायांची मदत अधिक रोजगारनिर्मिती करणारी गुंतवणूक व्हावी यासाठी होऊ शकते. असे असले तरी, आपल्या देशातील बहुसंख्य जनता आजही खेडेगावांमध्ये रहात असल्याने सरकारने खेडेगावांना आणि आदिवासी जमातींना मदत देण्याची नितांत आवश्यकता आहे. या लेखात यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे, आर्थिक आणि अन्य स्वरूपात केलेल्या छोट्याशा मदतीमुळे लोक स्वयंरोजगार मिळवू लागले आहेत आणि स्वावलंबी झाले आहेत याची असंख्य उदाहरणे आहेत. केंद्र आणि त्याचबरोबर अनेक राज्य सरकारांनी त्यासाठी काही स्वरूपात पुढाकार घेतला आहे. तरी देखील अजून खूप काही करण्याची आवश्यकता आहे.

**संदर्भसूची :**


१. दी ग्रेट इंडियन मार्केट, रिझल्ट्स फ्रॉम एन.सी.ए.ई.आर.स् मार्केट इन्फॉर्मेशन सर्व्हे ऑफ हाऊसहोल्ड्स: http://www.ncaer.org/downloads/PPT/thegreatindianmarket.pdf

२. http://articles.economictimes.indiatimes.com/2013-10-24/news/43365770_1_greenfield-plant-600-bottles-investment-plans

३. अमित भादुरी, दी फेस यू वेअर अफ्रेड टू सी, पान १३९

४. दी टाईम्स ऑफ इंडिया, २२ एप्रिल २०१३, http://articles.timesofindia.indiatimes.com/2013-04-22/india/38735264_1_employment-labour-nsso

५. मिडल क्लास इन इंडिया, सोनलडे देसाई, http://www.sonaldedesai.org/indian_middle_class.pdf

६. इंटर प्रेस सर्व्हिस न्यूज एजन्सी, http://www.ipsnews.net/2013/11/jobless-growth-21st-century-condition/

७. दी डेली न्यूज, फूल एम्प्लॉयमेंट व्हर्सेस जॉबलेस ग्रोथ, हरमन डॅली: http://steadystate.org/full-employment-versus-jobless-growth/

८. यू.एन.सी.टी.ए.डी. - लिस्ट डेव्हलप्ड कंट्रीज रिपोर्ट २०१३ - http://unctad.org/en/pages/PublicationWebflyer.aspx?publicationid=700

९. चर्निंग दी अर्थ, दी मेकींग ऑफ ग्लोबल इंडिया, २०१२, असीम श्रीवास्तव आणि आशिष कोठारी, पेंग्विन विकींग.

१०. बँकर टू दी पूअर, मुहम्मद युनूस विथ अँलन जोलीस, पेंग्विन बुक्स इंडिया, २००७.



(*आर्तिका वत्स - मैत्रयी कॉलेज दिल्ली विद्यापीठ येथे अर्थशास्त्र विभागाच्या सहप्राचार्या. संपर्कासाठी ईमेल - artikavats7@gmail.com*)

**– भाषांतर : रवींद्र जोशी**


## आगामी अंक

**मे, २०१४**
**'उर्जा सुरक्षा'**
**या विषयावर असेल.**

---

**जून, २०१४**
**'भारतातील कृषी क्षेत्र'**
**या विषयावर असेल.**



# भारताचे हरवलेले आर्थिक परिवर्तनः भारतीय अर्थव्यवस्थेचा विकास अणि संरचनात्मक बदल

– कुणाल सेन

**विकास आणि संरचनात्मक बदल:**

स्वातंत्र्योत्तर काळातल्या गेल्या सहा दशकांत भारतीय अर्थव्यवस्थेत अनेक संरचनात्मक बदल करण्यात आले. १९५५ साली कृषीक्षेत्राचे उत्पादन ५७ टक्के होते. २००८ साली हे उत्पादन केवळ १९.८ टक्के एवढे झाले. १९५५ साली तयार उत्पादन क्षेत्राचा सकल राष्ट्रीय उत्पादनातील वाटा ९.९ टक्के एवढा होता. २००८ साली हाच आकडा वाढून १०.६ टक्क्यांपर्यंत पोहचला. संघटित किंवा अधिकृत उत्पादन क्षेत्राचा विकास या कालावधीत ४.९ टक्क्यांवरुन १०.६ टक्क्यांवर पोचला या क्षेत्राच्या योगदानामुळे तयार उत्पादनाच्या एकूण विकासदरात वाढ झाली. मात्र भारतीय अर्थव्यवस्थेच्या संरचनात्मक परिवर्तनाचे सर्वात लक्षणीय वैशिष्ट्य म्हणजे, सकल राष्ट्रीय उत्पादनात, सेवा क्षेत्राचा वाढलेला वाटा. १९५५ साली, सेवा क्षेत्राची टक्केवारी १९.५ एवढी होती, तीच २००८ सालापर्यंत ४०.७ टक्के एवढी झाली. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाची पद्धत एकसारखी नाही, हे तर सर्वश्रुत आहे. हे लक्षात घेता सेवा क्षेत्राचा एकूण उत्पादनातील वाटा अपेक्षेपेक्षा कितीतरी जास्त आहे. १९९३ ते २००४ या कालावधीत देशात व्यवसाय क्षेत्र (२४.३ टक्के) आणि दळणवळण क्षेत्र (२०.३ टक्के) या सेवा क्षेत्रांचा अत्यंत जलद गतीने विकास झाला. दळणवळण किंवा दूरसंवाद क्षेत्राच्या विकासात मोबाईल तंत्रज्ञानाचा महत्त्वाचा वाटा आहे. सरकारने, दूरसंवाद क्षेत्रावरची आपली मक्तेदारी संपवून हे क्षेत्र खाजागी कंपन्यांसाठी खुले केले, त्यामुळे दूरसंवाद क्षेत्राचा विकास झाला. (कोतवाल, २०१०). सरकारच्या अर्थिक सुधारणांचाही अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला. सेवा क्षेत्रात परदेशी वित्तीय संस्थांना गुंववणुकीची मर्यादा शिथिल केल्यामुळे सेवा क्षेत्राच्या विकासावर त्याचा थेट सकारात्मक परिणाम झाला. १९९० च्या दशकाच्या सुरुवातीला १०.५ टक्के असलेली गुंतवणुकीची मर्यादा नंतर ३० टक्क्यांपर्यंत वाढवण्यात आली. याचा परिणाम म्हणून माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील भारतीय उत्पादनांची निर्यात १९९२ नंतर सहा पटीने वाढली

उत्पादन क्षेत्रासंदर्भात सांगायचे झाल्यास, या क्षेत्राचे एक वैशिष्ट्य म्हणजे, या क्षेत्रात दोन परस्परविरोधी गोष्टी एकत्र झाल्या आहेत - एका बाजूला तुलनेने छोटे असलेले संघटित क्षेत्र, ज्या अंतर्गत अनेक संघटीत आणि संरक्षित कामगारांचा वर्ग तर दुसरीकडे अनेक छोट्या उद्योग संस्थांचे असंघटित क्षेत्र, ज्यामधील कामगारांना तुलनेने सामाजिक सुरक्षा, रोजगाराची निश्चिती आणि इतर सुविधा मिळत नाहीत. (मुझुमदार आणि सरकार २००८) संघटित आणि असंघटित या दोन्ही क्षेत्रात कामगारांची उत्पादकता आणि कामगारांना मिळणारा रोजगार यात मोठी तफावत आहे. असंघटित

क्षेत्रातल्या उत्पादकतेच्या तुलनेत संघटित क्षेत्राची उत्पादकता २८ पट अधिक असते तर, संघटित क्षेत्रातील कामगारांना मिळणारा रोजगार २००५-२००६ साली असंघटित कामगारांच्या तुलनेत ५ पट अधिक होता. अधिक लक्षवेधक गोष्ट म्हणजे, दोन्ही क्षेत्रातील उत्पादकतेतील तफावत दिवसेंदिवस वाढते आहे. १९८४-१९८५ मध्ये संघटित क्षेत्रातील कामगारांची उत्पादकता असंघटित क्षेत्रापेक्षा ५ टक्के अधिक होती. सकल राष्ट्रीय उत्पादनात, विशेषत: १९८० सालापासून संघटित क्षेत्राचा वाटा वाढला आहे. मात्र स्वातंत्र्यानंतरच्या ६० वर्षात असंघटित क्षेत्राचा विकासदर मात्र सकल राष्ट्रीय उत्पादनाच्या तुलनेत पाच टक्के एवढा कायम राहिला आहे. एकूण उत्पादन क्षेत्रात असंघटीत क्षेत्राचं महत्व घटत असलं, तरीही उत्पादन क्षेत्रात रोजगार निर्मीती करण्याचं या क्षेत्राचं काम इतक्या कालावधीत अबाधीत राहिलं आहे. १९८४ ते ८५ या काळात एकूण अत्पादन क्षेत्रात, असंघटीत क्षेत्रातील रोजगार निर्मीती ८३% एवढी होती. २००५-२००६ या काळात या टक्केवारीत किंचीत म्हणजे ८० टक्क्यांपर्यंत घट झाली. तयार उत्पादन क्षेत्राचे असलेले हे दुहेरी रूप आणि असंघटीत क्षेत्रांमधील कमी उत्पादन (आणि कमी रोजगार) या समस्या कायम राहिल्याने, देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्वाचे आणि जलदगतीनं बदल होत असतांनाही, या समस्या धोरणात्मक चिंतेचा विषय बनल्या आहेत. या समस्यांमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होतो, दारिद्रय निर्मूलनातही त्यामुळे अडथळे येतात.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या पद्धतीचे आणखी एक व्यवच्छेदक लक्षण म्हणजे, कृषी क्षेत्रातील कामगारांचे/मजूरांचे उत्पादन आणि सेवा क्षेत्रांमधे हळूहळू होणारे स्थलांतर. जसजसा देशाचा विकास होतो, आणि तो कृषीक्षेत्रापासून इतर व्यवसायांकडे वाटचाल करतो, तसतसे मजूरही कमी उत्पादन देणाऱ्या कृषीक्षेत्राकडून, अधिक तयार उत्पादने आणि सेवा अशा अधिक अशा अधिक रोजगार देणाऱ्या क्षेत्रांकडे वळतात. मजूरांचे कृषी क्षेत्राकडून उत्पादन आणि सेवाक्षेत्राकडे जितके जलद स्थित्यंतर होते, तेवढा अर्थव्यवस्थेचा विकासदर वाढतो. चीनच्या तुलनेत, भारतात, मजूरांचे कृषीक्षेत्राकडून उत्पादन आणि सेवा क्षेत्राकडे होणारे स्थित्यंतर मंदगतीने होते. १९८० साली कृषीक्षेत्रातील रोजगाराचा दर ६८.७ टक्क्के होता. चीनमधे ही त्या काळात हा दर साधारण तेवढाच, म्हणजे, ६८.१ टक्के असा होता. मात्र, या काळात हा दर उच्च म्हणजे ५९.३ टक्के एवढाच कमी झाला. (कोच्चर- २००६). तसेच, कृषीक्षेत्रातील मजुरांचे स्थित्यंतर मुख्यत: सेवाक्षेत्राकडे झाले. त्यामुळे १९८३ साली सेवाक्षेत्रात रोजगारनिर्मितीचा असलेला २० टक्के दर २००४ पर्यंत वाढून २९ टक्के झाला. त्या उलट, या काळात उत्पादन क्षेत्रातल रोजगारनिर्मितीच्या दरात कहीही विशेष बदल झाला नाही. १९८३ साली १०.६ टक्के असलेला हा दर २०० ४ सालापर्यंत केवळ ११.७ टक्क्यांपर्यंत वाढला. अतिशय उत्तम विकासदर असलेल्या उत्पादन आणि सेवा क्षेत्रांमधे, रोजगार निर्मिती मात्र नगण्य तसेच क्षीण होती. याचा परिणाम रोजगार निर्मिती करण्याच्या आर्थिक विकासाच्या क्षमतेवर झाला.

त्यामुळेच, भारताच्या अर्थव्यवस्थेचा उच्च विकासदर रोजगारनिर्मिती करणारा नाही. उत्पादनामागची रोजगाराची लवचिकता - म्हणजे सकल राष्ट्रीय उत्पादनातील रोजगाराचे प्रमाण जे १९८३८-९३ या काळात एक टक्का होते, ते घटून ०.४० टक्का एवढे झाले, तर १९९३ ते २००४ ते अधिकच कमी - म्हणजे ०.२९ टक्का एवढे झाले. रोजगार वृद्धी ही १९९३ ते २००४ या काळात १.७९ टक्के होती तर १९९० च्या दशकात आर्थिक वृद्धीचा दर उत्तम असतांनाही रोजगार वृद्धी मात्र केवळ १.९९ टक्क्यांपर्यंत वाढली होती. ९० च्या आणि २००० च्या दशकात रोजगार निर्मितीचा सरासरी दरही कमीच असला तरीही कामगारांना रोजगार मिळण्याच्या पद्धतीत बदल झाला. म्हणजे अकुशल कामगारांसोबतच, कुशल कामगारांनाही रोजगार मिळू लागला. दारिद्रय निर्मूलनाच्या दृष्टीकोनातून रोजगार निर्मितीच्या पद्धतीकडे बघायचे झाल्यास, या काळात अकुशल कामगारांना रोजगार मिळू लागला. कोतवाल (२०१०) यांनी नमूद केल्याप्रमाणे १९८० च्या दशकात, ज्या उत्पादन क्षेत्रांचा जलद गतीने विकास झाला, त्या क्षेत्रांमधे अकुशल कामगारांना मात्र, रोजगार मिळत नसे. किंबहुना, अनेक क्षेत्रात त्यांना डावलले जात असे. मात्र, १९९० सालानंतर ही परिस्थिती बदलली. त्यानंतर अनेक क्षेत्रांमध्ये अकुशल कामगारांनाही पुरेशा प्रमाणात रोजगार मिळू लागला. विशेषत: व्यापार आणि बांधकाम या दोन्ही जलद गतीने वाढणार्या क्षेत्रात, अकुशल मनुष्यबळाची मागणी वाढू लागली. यानंतर, १९९० च्या सुरुवातीला सकल राष्ट्रीय उत्पादनात त्यांचा वाटाही लक्षणीयरित्या वाढला. १९९० नंतर मजूरांना कामावरून कमी करण्याच्या प्रमाणातही घट झाली. बिगर कृषी क्षेत्रातील रोजगार निर्मितीतही

वाढ झाली. १९८३-९३ या कालावधीत ३५.९ दशलक्ष कामगार बिगर कृषी क्षेत्रात होते, ते १९९३-२००४ या काळापर्यंत ६०.२ दशलक्ष एवढे झाले.

**परिवर्तन: जे कधीच नव्हते.**

भारतीय अर्थव्यवस्थेत विकासदर अतिशय उत्तम असतांनाही रोजगारनिर्मितीचा दर मात्र कमीच आहे. त्यामुळे हा प्रश्न कायमस्वरूपी राहतोच की असे का होते? या प्रश्नाचे उत्तर शोधायचे असल्यास आपल्याला हे लक्षात घ्यावे लागेल, की भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाची एक ठराविक साचेबद्ध पद्धत नाही. इतर अर्थव्यवस्थांमधे विकासाचा जो एक प्रमाणित मार्ग आपल्याला दिसतो, तसा मार्ग भारतात नाही. आशियातील इतर अर्थव्यवस्था उदाहरणार्थ, जपान, कोरिया, सिंगापूर, तायवान, चीन आणि व्हिएतनाम यांच्यात बदल झाला असून आर्थिक विकासाचा रोख, निर्मितीक्षम विकासाच्या काही वर्षात, या देशांतील अर्थव्यवस्थांमधे उत्पादन क्षेत्राचा विकास रोजगाराभिमुख होता. या सर्व देशांमधल्या अर्थव्यवस्था जसजशा जागतिक बाजारपेठेत शिरकाव करायला लागल्या, तसतशी तिथल्या अर्थव्यवस्थेचा कल, कृषी आधारित उत्पादनांकडून, इतर तयार उत्पादन क्षेत्रांकडे झुकला. कृषीक्षेत्रात अधिक प्रमाणात असलेल्या कामगारांना, मोठ्या संख्येने उत्पादन क्षेत्रात रोजगार मिळू लागला. आणि कामगाराधिष्ठीत उत्पादन क्षेत्राच्या व्यापक विस्तारामुळे या देशांच्या अर्थव्यवस्थेचा विकासदर मोठ्या प्रमाणात वाढला. मात्र, भारतात असे घडले नाही. भारतात कामगाराधिष्टीत उत्पादन क्षेत्र आर्थिक विकासाचे इंजिन झाले नाही. किंबहुना, इथे ज्ञानाधिष्ठीत सेवा क्षेत्र आणि मोठ्या भांडवलाची निर्मिती करणारे काही उद्योग यांच्या हातात विकासाची दोरी होती. आणि ही दोन्ही क्षेत्रे रोजगाराभिमुख नव्हती. कृषीक्षेत्रात थोडीबहुत रोजगार उपलब्धता होती, मात्र तिथे मानधन अतिशय कमी होते. काही असंघटित सेवा क्षेत्रांमधेही उदाहरणार्थ व्यापार, हॉटेल, उपहारगृहे, अशा ठिकाणीही रोजगार होता, मात्र अशा क्षेत्रातही मजुरी कमीच मिळे. आणि या सर्व असंघटित सेवा क्षेत्रांची प्रगती ही इतर क्षेत्रांच्या विकासावर अवलंबून असते, ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे ही क्षेत्रे विकासाची पथदर्शक ठरु शकत नाहीत. त्यामुळेच कृषीक्षेत्रात असलेल्या मजुरांना अधिकाधिक रोजगार पुरवण्यात त्यांच्यावर साहाजिकच मर्यादा आहेत.

गेल्या काही काळात उत्पादने आणि रोजगार या दोन्हीमधे एक साचलेपण आले आहे. तसेच, संघटित आणि असंघटित अशा दोन्ही सेवा क्षेत्रांमधे एकूण रोजगारात वाढ झाली आहे. एकूण उत्पादन आणि एकूण रोजगार या दोन्ही क्षेत्रात साचलेपण तर आले आहेच, शिवाय, संघटित उत्पादन क्षेत्रातील रोजगाराभिमुख क्षेत्रही आता तुलनेने कमी झाले आहे. असे का झाले? याची अनेक कारणे आहेत. पहिले कारण म्हणजे, भारतातील उद्योग क्षेत्राचा दृष्टीकोन हा आजही भांडवलाधिष्ठीत उत्पादनाचा आहे. भांडवली वस्तू आणि मध्यम स्तरातील वस्तू उत्पादन क्षेत्रात सुधारणा झाल्याने त्यांना मिळणारे संरक्षण कमी झाले असले तरीही भांडवलधार्जीणा दृष्टीकोन अद्याप कायम आहे. आशिआई प्रदेशाचा विचार केल्यास तुलनेने भारतात दर आजही जास्त आहेत. (अथुकोराला २००९) यात भर म्हणून, १९९६ ते २००० या काळात मध्यम प्रतीची उत्पादने आणि भांडवली वस्तू या दोन्ही क्षेत्रांचा वाटा अनुक्रमे २८ आणि ३० टक्के एवढा होता. (दास २००३) दुसरे कारण म्हणजे, रोजगार संरक्षण विषयक असलेले कठोर कायदे - जे जगातील बहुतांश संघटित क्षेत्रातील कामगारांसाठी अहेत - त्यांच्यामुळे उद्योगांचा नफा तुलनेने कमी झाला आहे. विशेषत: रोजगार संरक्षण कायद्यांतर्गत उद्योजकांना कामगारांना कायमस्वरूपी करारावर रोजगार द्यावा लागतो. त्यामुळे उद्योगधंद्यांचा कल भांडवलाभिमुख उत्पादनाकडे अधिक असतो. (डॉर्थी २००८) यांच्या मते मोठ्या उद्योगधंद्यात म्हणजे असे उद्योग ज्यात १०० किंवा त्याहुन अधिक कामगार रोजगारावर आहेत आणि त्यापैकी जवळपास सगळे हे कंत्राटी कामगार आहेत - असे कामगार जे कंत्राटदारांकडून कामावर आले आहेत आणि त्यांना रोजगार संरक्षण कायद्याचे काहीही लाभ मिळत नाहीत - मात्र अशा उद्योगांमधे कायमस्वरूपी कामगारांची संख्या वाढली आहे. रोजगार संरक्षण कायदा हा अशा उद्योगधंद्यांना लागू आहे, जिथे १०० हून अधिक कामगार आहेत. त्यामुळे, यातून हेच स्पष्ट होते की कामगार कायद्यांमुळे उद्योजक कायमस्वरुपी कामगारांना घेण्यापेक्षा कंत्राटी स्वरुपाच्या कामगारांना अधिक पसंती देतात. तर दुसरीकडे १०० पेक्षा कमी कामगार असलेल्या उद्योगक्षेत्रांमधे कायमस्वरुपी कामगारांचे प्रमाण वाढले आहे. गुप्ता (२०१३) यांच्या मते, ज्या राज्यात कठोर कामगार कायदे आहेत, त्या राज्यात कामगारभिमुख उद्योगक्षेत्रांचा सर्वसाधारण विकासदर तुलनेने कमी आहे आणि रोजगार वृद्धीचा सर्वसाधारण दरही मंदावलेला आहे.

सह्रा, सेन आणि मैती (२०१३) यांच्या अध्ययनानुसार, कायमस्वरुपी कामगारांना प्राधान्य देणारे कायदे ज्या राज्यात आहेत, त्या राज्यातला विकासदर कंत्राटी कामगार राज्यांपेक्षा अधिक आहे.

रोजगाररहित वृद्धीमागचे तिसरे कारण म्हणजे, संघटित उत्पादन क्षेत्रांसमोर पायाभूत सुविधांबाबत असलेले अनेक अडथळे. (विशेषत: वीजेची उपलब्धता) आणि स्वयंउद्योजक तसंच लघु उद्योजकांना येणाऱ्या अडचणी. (उदा. उद्योगांना अधिकृत परवाने मिळवण्यासाठी द्यावे लागणारे अधिक शुल्क इ.) त्याशिवाय लघु उद्योग आरक्षणाचे धोरण, ज्यामुळे मोठ्या उद्योगांना कामागाराभिमुख उद्योगक्षेत्रात उद्योग सुरु करण्यास मज्जाव (जोशी २०१०). अशा विविध अडथळ्यांमुळे, रोजगार निर्मितीत वाढ होत नाही. आणि शेवटी परदेशातून स्वस्त भांडवली वस्तूंचा पुरवठा करण्यास परवानगी देणारी अर्थव्यवस्था, आर्थिक सुधारणांमुळे वाढलेल्या स्पर्धात्मक वातावरणामुळे देशातील उद्योगधंद्यांमधील कौशल्य आणि भांडवल क्षमता निश्चितच वाढली आहे. अगदी असंघटित क्षेत्रातील उद्योगंमध्येही हा परिणाम दिसतो. कारण त्यांनाही शेवटी परदेशी उत्पादनांशी स्पर्धा करायची आहे.

या संपूर्ण लेखाचा निष्कर्ष काढायचा झाल्यास, आपण हे लक्षात घेतले, की विकसनशील देश, विशेषत: जे आशिया खंडातील देश आहेत, त्यांच्या विकासाच्या मार्गापेक्षा भारताचा विकासाचा मार्ग काहीसा वेगळा आणि ओबडधोबड आहे. अनेक जण या पद्धतीवर टीकाही करतात. कारण भारतात सध्या असलेला ज्ञानाधिष्ठीत सेवाक्षेत्र आणि भांडवलाधिष्ठीत उत्पादन क्षेत्र यावर आधारलेला विकासदर दीर्घकालासाठी देशाच्या अर्थव्यवस्थेला हितकारक ठरणार नाही. या पद्धतीमधे कामगारांच्या हिताला प्राधान्य दिले जात नाही. आणि ते देशाच्या क्रयशक्तीसाठी किंवा समानतेच्या दृष्टीनेही योग्य नाही. कारण भारतातील अकुशल कामगांरांना केंद्रीभूत असलेल्या उत्पादन क्षेत्राने जो विकासाचा पाया रचला आहे, त्यावर ही रचना आधारलेली नाही. त्यामुळेच या पद्धतीद्वारे दारिद्रय निर्मूलनही होणे कठिण आहे. (सेन २००८) स्पष्ट सांगायचे झाल्यास, भारताला जर भविष्यात आपला विकासदर कायम ठेवायचा असेल आणि त्याचवेळी समताधिष्ठीत विकासाचे धोरणही राबवायचे असेल तर कृषीआधारित अर्थव्यवस्थेकडून उत्पादनाधिष्ठीत व्यवस्थेकडे परिवर्तीत होण्याची गमावलेली क्षमता भारताला पुन्हा मिळवावी लागेल.

*(**कुणाल सेन** - मेनचेस्टर विद्यापीठ, युनायटेड किंगडम (यूके) येथील इंस्टिट्यूट ऑफ़ डेवलपमेंट पॉलिसी एंड मैनेजमेंट येथे डेवलपमेंट इकोनॉमिक्स या विषयाचे प्राचार्य. ब्रूक्स वर्ल्ड पावर्टी इंस्टिट्यूट या संस्थेत जेष्ठ अभ्यासक म्हणून कार्यरत. संपर्कासाठी ईमेल- Kunal.Sen@manchester.ac.uk)*

**– भाषांतर : राधिका अघोर**

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. प्रेस इन द नॉर्थ इस्ट (इंग्रजी) ₹ १४५/-

२. बी.आर. आंबेडकर (इंग्रजी) ₹ १२५/-

३. इंडिया : बिफोर अँड आफ्टर द म्युटीनी (इंग्रजी) ₹ १००/-

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

१. बेगम हझरत महल (हिंदी)

२. रझिया सुलतान (हिंदी)

३. परियावरण संगरक्षण : चुनौतिया और समाधान



# भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचे योगदान

– नितीन चौधरी

भारतीय अर्थव्यवस्था ही न्यूनतम उत्पन्न असणारी विकससनशील अर्थव्यवस्था आहे साधारणत: अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल होत असतांना अर्थव्यवस्थेचा विकास होत आहे असे म्हटले जाते. संरचनात्मक बदल म्हणजे देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा कमी होत जाणे व कृषी क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्या लोकसंख्येत घट होणे होय. यात तिळमात्रही शंका नाही की, भारतात लोकसंख्येचा मोठा भाग गरीबीमध्ये उदरनिर्वाह करीत आहे. भारतात असणारी गरीबी ही चिरस्थाई असून ती पूर्वापार चालत आलेली आहे. आज गरीबी कमी होत असली तरीही त्याचे प्रमाण अतिशय कमी आहे. स्व. बकीमचंद्र चटोपाध्याय यांनी त्यांच्या वंदे मातरम गीतात भारताच्या भूमीचे 'सुजलाम् सुफलाम् मलयज शीतलाम्', सस्यश्यामलाम् मातरम् या शब्दांत केलेले वर्णन आपण अभिमानाने गातो. याच भारतभूमीच्या अर्थव्यवस्थेला सुस्थितीत आणण्याचे प्रयत्न आज करावे लागत आहेत. भारतीय अर्थव्यवस्थेचे अध्ययन करतांना विविध आर्थिक बाजूंचे अध्ययन करणे गरजेचे आहे.

### भारतीय अर्थव्यवस्थेचा प्रवास

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ८ एप्रिल १९४८ या दिवशी भारताचे पहिले औद्योगीक धोरण जाहिर झाले. त्यावेळी आपल्या देशात मुक्त अर्थव्यवस्थेऐवजी मिश्र अर्थव्यवस्था स्वीकारली होती. मिश्रअर्थव्यवस्थेत सार्वजनिक क्षेत्र व खाजगी क्षेत्र दोन्हींचे सहअस्तित्व असते. ३० एप्रिल, १९५६ मध्ये भारताचे दुसरे औद्योगीक धोरण मांडण्यात आले. त्यावेळी पंडीत जवाहरलाल नेहरुंच्या नेतृत्वाखाली भारताने रशीयातील तीव्र आर्थिक विकासाने प्रभावित होवून मिश्रअर्थव्यवस्थे ऐवजी नियोजित (ओदशात्मक) अर्थव्यवस्थेचा स्वीकार केला. त्यानंतर २४ जुलै १९९१ मध्ये मांडण्यात आलेल्या नवीन औद्योगिक धोरणामध्ये भारताने आदेशात्मक नियोजनाऐवजी सुचकात्मक नियोजनाचा अवलंब केला. १९९१ नंतर खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणास सुरवात झाली. भारतीय अर्थव्यवस्थेने मुक्त अर्थव्यवस्थेकडे वाटचाल सुरू केली.

### भारतीय अर्थव्यवस्था : काही प्रमुख वैशिष्टे

भारतीय अर्थव्यवस्थेत प्रामुख्याने तीन क्षेत्रांचा अभ्यास केला जातो. १) प्राथमिक क्षेत्र, २) द्वितीयक क्षेत्र आणि ३) तृतीय क्षेत्र. या तीन्ही क्षेत्रांचा विकास पर्यायाने देशाची आर्थिक प्रगती दाखवतो. भारतच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात नियोजनाच्या सुरवातीला १९५१ या वर्षी शेती क्षेत्राचा म्हणजेच प्राथमिक क्षेत्राचा वाटा ५५.४ टक्के होता. या काळात उद्योग व सेवा क्षेत्राचा फारसा विकास न झाल्याने उद्योग क्षेत्र व सेवा क्षेत्राचा जी.डी. पी. मधील वाटा अनुक्रमे १४.८ व २९.८ टक्के होता. आज या स्थितीमध्ये बदल झाल्याचे दिसून येते. भारताची आर्थिक पाहणी २०१२-१३ च्या अहवालानुसार १९५०-५१ ते २०१२-१३ पर्यंत विविध क्षेत्रांचा जी.डी.पी मधील वाटा खालील सारणीत दर्शविण्यात आला आहे.

**स्थूल राष्ट्रीय उत्पन्नातील (जी.डी.पी) विविध क्षेत्रांचा वाटा**

| वर्ष / क्षेत्र | १९५०-५१ | १९६०-६१ | १९७०-७१ | १९८०-८१ | १९९०-९१ | २०००-०१ | २०१०-११ | २०१२-१३ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कृषी क्षेत्र | ५५.४% | ५४.८% | ४६.३% | ३९.२% | ३२.२% | २४.०% | १७.२% | १३.७% |
| उद्योगक्षेत्र | १४.८% | २८.६% | ३२.१% | ३६.६% | ४०.६% | ४९.३% | ५६.४% | ५९.३% |
| सेवा क्षेत्र | २९.८% | १६.६% | २१.६% | २३.७% | २७.२% | २६.७% | २६.४% | २७.०% |

- स्त्रोत : भारतातील आर्थिक पाहणी २०११-१२, २०१२-१३

जी.डी.पी मधील विविध क्षेत्रांचा वाटा पाहता शेती क्षेत्राचा वाटा सातत्याने कमी होऊन उद्योग क्षेत्राबरोबरच सेवा क्षेत्रात जलदगतीने वाढ होत आहे.

**कृषी क्षेत्र/प्राथमिक क्षेत्र :**

कृषी भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. किंबहुना भारताची अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान अर्थव्यवस्था मानली जाते. मागील काही दशकात औद्योगीकरणातील प्रगतीमुळे कृषीक्षेत्राचे भारतीय अर्थव्यवस्थेतील महत्त्व कमी झालेले नाही. आजही कृषी व्यवसाय हा देशातील सर्वात मोठा उद्योग असून शेती हे देशातील ६५ टक्के लोकसंख्येच्या उदरनिर्वाहाचे साधन आहे. केंद्रीय सांख्यिकी संघटनेद्वारा प्राप्त आकडेवारीनुसार भारतात १९५०-५१ या वर्षामध्ये देशाच्या जी.डी.पी मध्ये कृषीक्षेत्राचा वाटा ५५.४० टक्के होता. परंतु औद्योगीकरण आणि आर्थिक विकासाच्या प्रक्रीयेने जशी गती प्राप्त केली तसतसा कृषीचा जी.डी.पी मधील वाटा घटत जाऊन तो २०१२-१३ या वर्षात १३.७ टक्के एवढा कमी झाला.

१९७९ मध्ये थिओडोर शुल्स यांना विकासात्मक अर्थशास्त्रासाठी नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांनी विकासाचा महत्वाचा पाया म्हणून कृषी क्षेत्राच्या महत्वाची जाणीव करून दिली होती. भारतातील जी.डी.पी च्या क्षेत्रीय रचनेवरून भारत विकसनशील देश असण्याचा निष्कर्ष निघतो. अमेरिका, जपान, नॉर्वे, इंग्लंड या विकसित देशांमध्ये कृषी क्षेत्राचा जी.डी.पी मधील वाटा सरासरी दोन टक्के आहे. भारतात कृषी क्षेत्राचा जी.डी.पी मधील वाटा कमी असला तरी कृषी क्षेत्रावर अवलंबून असणाऱ्यांची संख्या पासष्ट टक्के आहे. हेच प्रमाण अमेरिकेत केवळ दोन ते तीन टक्के आहे तर फ्रान्स मध्ये सात टक्के, ऑस्ट्रेलिया मध्ये सहा टक्के आणि अल्पविकसित व मागासलेल्या देशात हे प्रमाण मोठ्या प्रमाणात म्हणजेच नेपाळ मध्ये त्र्याणऊ टक्के, बांग्लादेशात पन्नास टक्के तर चीन मध्ये अडुसष्ट टक्के आहे.

भारत हा कृषी प्रधान देश असल्यामुळे भारतातील कार्यकारी लोकसंख्येचा मोठा भाग कृषी क्षेत्रावर काम करतो. १९५०-५१ या वर्षामध्ये देशात एकूण लोकसंख्येपैकी सत्तर टक्के लोकसंख्या कृषी क्षेत्रामध्ये कार्यरत होती. २०१२-१३ या वर्षामध्ये यात बदल होऊन एकूण कार्यकरी लोकसंख्येपैकी चोपन्न टक्के लोकसंख्या कृषी क्षेत्रात कार्यरत आहे. यात तीस टक्के लोकसंख्या शेतकरी आहेत तर पंचवीस टक्के लोक शेतमजूर आहेत. भारतात कृषी आणि गैर कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या श्रमिकांच्या सरासरी उत्पन्नातील अंतर वाढत आहे. हीच भारतातील धोरण निर्धारणातील प्रमुख समस्या आहे.

भारतात औद्योगिकीकरणला जोम मिळाला त्यामध्येही कृषीचे योगदानही महत्वपूर्ण आहे. भारतात प्रमुख उद्योगांना कच्चा माल पुरविण्याचे महत्वपूर्ण कृषीक्षेत्राकडून होते. जसे वस्त्र उद्योग, साखर, वनस्पती उद्योग इत्यादी. त्याच प्रमाणे लघू व कुटीर उद्योगांचा प्रमुख आधारही कृषीच आहे.

भारतीय शेतीचे आंतरराष्ट्रीय व्यापारातही महत्वपूर्ण योगदान आहे. भारतातून निर्यात केल्या जाणाऱ्या वस्तूंमध्ये चहा, तंबाखू गरम मसाले, फुले, फळे, इत्यादींचा समावेश होतो. भारताच्या एकूण निर्यातीत कृषी वस्तूंचा अनुपात १९५०-५१ मध्ये सत्तर टक्के एवढा होता. आज औद्योगीकरण आणि सेवा क्षेत्राच्या विकासामुळे यात घट झाली असली तरी तो २०११-१२ मध्ये हा दर १२ टक्के होता.

आज भारतातील शेती क्षेत्राने जी प्रगती केली आहे त्यात प्रमुख स्थान पहिल्या हरितक्रांतीला जाते. १९६६ च्या काळापासून भारतात खऱ्या अर्थाने शेतीच्या विकासाला प्रोत्साहन मिळाले. भारतात आज दुसऱ्या हरितक्रांतीची घोषणा जरी करण्यात आली नसली तरी भारतातील

२००४ नंतरच्या शासकीय कृषी विषयक धोरणांचा रस्ता दुसऱ्या हरितक्रांतीकडे जातांना दिसतो. याचाच परिणाम भारतातील निर्यातीत कृषी क्षेत्राचे स्थान महत्वपूर्ण आहे.

**उद्योग क्षेत्र/द्वितीय क्षेत्र :**

भारतातील अर्थव्यवस्थेत उद्योग क्षेत्रात सर्वप्रथम जमशेदजी टाटांनी १८७७ या वर्षी सुरूवात केली. अमेरिकेतून यंत्रे व इजिप्त मधून कापूस आयात करून त्यांनी मुंबईत स्पीनिंग कंपनी सुरू केली. १८५४ मध्ये महाराष्ट्रात मुंबई येथे पहिली कापड गिरणी सुरू झाली. तर १८५४ मध्ये कोलकत्याजवळ 'रिश्रा' या ठिकाणी पहिली ताग-गिरणी सुरू झाली. १९७० मध्ये पहिला पोलाद उद्योग पश्चिम बंगालमध्ये सुरू करण्यात आला आणि भारताच्या औद्योगीकरणाला सुरवात झाली.

स्वतंत्र भारतात उद्योग क्षेत्रात विशेष लक्ष देणे गरजेचे होते. पाश्चिमात्य देशांनी अगोदरच औद्योगिकरणाला सुरवात केली होती. देशात गरीबी, अन्नधान्याची कमतरता, आरोग्य, यांच्या सोबतच, उद्योग, पायाभूत सुविधा, शिक्षण, विज्ञान व तंत्रज्ञान याकडे विशेष लक्ष देण्याची गरज भासू लागली. त्यामुळे भारतात ८ एप्रिल १९४८ मध्ये श्री. श्यामप्रसादजी मुखर्जी यांनी पहिले औद्योगिक धोरण जाहीर केले. त्यांनतर ३० एप्रिल १९५६ मध्ये दुसरे औद्योगिक धोरण जाहीर करण्यात आले. या धोरणांतर्गत भारतातील सार्वजनिक क्षेत्राचा अधिक विस्तार करण्यात आला. तसेच औद्योगिक विकेंद्रीकरणावर भर देऊन लघु उद्योग, खादी व ग्राम उद्योगांना महत्त्वाचे स्थान देण्यात आले.

१९६९ मधील औद्योगिक धोरणाला परवाना धोरण असेही म्हटले जाते. खाजगी क्षेत्राच्या एकाधिकारशाहीला नियंत्रित करण्यासाठी एमआरटीपी (Monopolies & Restrictive Trade Practices-Act) हा कायदा पास करण्यात आला. १९७३ मध्ये जे औद्योगिक धोरण जाहीर झाले त्यामध्ये शासकीय व खाजगी क्षेत्राच्या एकत्र गूंतवणुकीस प्रोत्साहन देण्यासाठी संयुक्त क्षेत्र स्थापन करण्यास परवाना देण्यात आला. तसेच परकीय चलनाच्या नियमनासाठी FERA (Foreign Exchange Regulation–ACT) कायदा पास करण्यात आला. १९७७ च्या औद्योगिक धोरणात विकासाला प्रोत्साहन देण्याकरिता 'जिल्हा उद्योग केंद्राची' (DIC-District Industrial Center) स्थापना करण्यात आली.

भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाला कलाटणी देणाऱ्या औद्योगिक धोरणांची सुरवात २४ जुलै १९९१ पासून झाली. भारतीय उद्योगांना जागतिक स्पर्धेत टिकता यावे यासाठी नवीन औद्योगिक धोरणात मूलभूत बदल करण्यात आले. या धोरणात जागतिकीकरण, उदारीकरण आणि खाजगीकरणावर विशेष भर देण्यात आला. म्हणून या धोरणाला खा.उ.जा. (LPG-Liberalizations, Privatizations & Globalizations) धोरण असेही म्हणतात. या धोरणानानुसार केंद्रशासनाच्या अखत्यारित असणारी उद्योगांची संख्या कमी करून (८) करण्यात आली. या नवीन धोरणात परकीय थेट गुंतवणूकीस प्रोत्साहन देण्यात आले. उद्योगांवरील नियंत्रणे शिथील करून बाजारात टिकाव धरण्यासाठी 'मुक्त व लवचीक' अर्थव्यवस्था निर्माण करण्यावर भर देण्यात आला. या धोरणाद्वारे भारताची अर्थव्यवस्था मिश्र अर्थव्यवस्थेकडून मुक्त अर्थव्यवस्थेकडे जाण्यास सुरवात झाली. भारतातील सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना १) महारत्न उद्योग (५ कंपन्या) २) नवरत्न उद्योग(१५ कंपन्या) आणि ३) मिनीरत्न उद्योग (६१ कंपन्या) असा दर्जा देण्यात आला आहे.

भारतात मोठ्या उद्योगातील कापड उद्योग ज्याचा भारताच्या जीडीपी मध्ये चार टक्के वाटा आहे तर निर्यातीत १३.५ टक्के वाटा आहे. तसेच रोजगार निर्माण करण्यात मोठा वाटा असून हा महत्वपूर्ण उद्योग आहे. तसेच देशातील अर्थव्यवस्थेच्या विकासाचा व औद्योगिकीकरणाचा पाया म्हणजे लोह उद्योग हा एक महत्वपूर्ण उद्योग असून इतर सर्व उद्योगांना लागणारे पोलाद या उद्योगापासून तयार होते. भारतात स्वातंत्र्याप्राप्तीनंतर लोह उद्योगाने जलद गतीने प्रगती केली. ९५०-५१ मध्ये देशात दहा लाख टन लोह उत्पादनाची क्षमता होती. आज २०११-१२ मध्ये ही ७३४ लाख टन एवढी वाढली आहे. तरीही आपणास पोलादाची आयात करावी लागते. भारताने २००५-०६ या वर्षांत २०२४३ करोड रुपये पोलादाची आयात केली होती.

साखर उत्पादनाच्या बाबतीत भारत जगात प्रथम क्रमांकाचा देश आहे तर उपभोगाच्या बाबतीतही प्रथम क्रमांचा देश आहे. जगातील २२ टक्के साखरेचे उत्पादन एकट्या भारतात होते. या उद्योगाद्वारे सरासरी ३.२५ लाख लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे. भारतात १९५०-५१ मध्ये ११ लाख टन साखरेचे उत्पादन होत होते तर २०११-१२ मध्ये यात वाढ होऊन २७४ लाख टन एवढे उत्पादन व उपभोग होते. भारतात सर्वाधिक साखरेचे उत्पादन महाराष्ट्रात होते. देशातील एकूण उत्पादनापैकी ९०.९५ (३२.१ टक्के) लाख टन साखर महाराष्ट्रात उत्पादित होते.

भारतात ताग (ज्यूट) उद्योगाची सुरवात १८८५ या वर्षी झाली. तागाच्या एकूण जागतिक उत्पादनाच्या ३० टक्के उत्पादन एकट्या भारतात होते. २.५ लाख लोकांना प्रत्यक्ष तर चाळीस लाख लोकांना अप्रत्यक्ष रोजगार पुरविणारा हा उद्योग आहे. या उद्योगाद्वारे देशातून मोठ्या प्रमाणात निर्यात होत असल्यामुळे विदेशी मुद्रा संग्रह करण्यात ताग उद्योगाचे विशेष महत्त्व आहे. १९५०-५१ मध्ये भारतात ८९० टन तागाचे उत्पादन होत होते. तर त्यापैकी ७९० टन तागाची भारत निर्यात करीत असे. २०११-१२ मध्ये १५३५ टन तागाचे उत्पादन होत असून २०१ टन तागाची निर्यात होते. तर १३८२ टन उपभोग होतो. असे असले तरी कच्च्या मालाची समस्या, आधुनिक तंत्रज्ञान जास्त किंमती अशा अनेक समस्यांना ताग उद्योगाला आज सामोरे जावे लागत आहे. तरी भारतीय अर्थव्यवस्थेत या उद्योगाचे महत्व असामान्य आहे.

भारतात सिमेंट उद्योगाची सुरूवात गुजरात मधील पोरबंदर येथे १९१४ पासून झाली. देशाचा पायाभूत विकास साधण्यासाठी या उद्योगाचे स्थान महत्वाचे आहे. १९५०-५१ मध्ये देशात २७ लाख टन उत्पादन होत होते. तर २०११-१२ मध्ये त्यात मोठ्या प्रमाणात वाढ होऊन २२३५ लाख टन एवढे उत्पादन होते.

भारतीय अर्थव्यवस्थेत उद्योग क्षेत्र एक महत्वपूर्ण क्षेत्र असून देशात पायाभूत सुविधा निर्माण करून कृषी क्षेत्र व सेवा क्षेत्राच्या विकासाला गती प्रदान करण्यात या क्षेत्राची भूमिका महत्वपूर्ण आहे. आज देश औद्योगीकीकरणाच्या दिशेने वाटचाल करीत असतांना उद्योग क्षेत्र देशातील गरजेबरोबर जागतिक गरज पूर्ण करण्यात आपली मोठी भूमिका बजावित आहे.

**सेवा क्षेत्र / तृतीय क्षेत्र :**

भारताच्या जीडीपीमध्ये सेवा क्षेत्राचा वाटा २०१२-१३ नुसार ५९.३ टक्के आहे. संपूर्ण विश्वात सेवा क्षेत्राचे स्थान अर्थव्यवस्थेच्या विकासाकरिता अत्यंत महत्वपूर्ण मानले जाते. २०११ या वर्षामधील जगाच्या एकूण ७०.२ ट्रिलीयन डॉलर पैकी सेवा क्षेत्राचा वाटा ६५.५ टक्के होता. या स्थितीत भारताचा व विश्वाचा जीडीपी विचारात घेतल्यास सर्वोच्च पंधरा देशात भारत नवव्या क्रमांकावर असून सेवा क्षेत्राच्या वाट्याचा विचार केल्यास भारत दहाव्या क्रमांकावर होता.

भारतासारख्या विकसनशील देशात सेवा क्षेत्राचे महत्व विचारात घेता सेवा क्षेत्रातील विविध सेवांचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरते. द नॅशनल अकाउंटस् च्या वर्गीकरणानुसार भारतात सेवा क्षेत्रामध्ये व्यापार, हॉटेल, रेस्टॉरंट, वाहतूक, साठवण, दळणवळण, वित्तीय सेवा, वैयक्तिक सेवा इत्यादींचा समावेश होतो. जागतिक व्यापार संघटना तसेच भारतीय रिझर्व बँकेने सेवा क्षेत्रात वरील सेवांबरोबर बांधकाम सेवेचाही समावेश केला आहे. २०११-१२ व २०१२-१३ या वर्षामध्ये विविध सेवांचा एकूण जीडीपीमधील वाटा तसेच या सेवांचा आर्थिक वृद्धीदराचा तपशील खालील सारणीत दिला आहे.

**विविध सेवांचा GDP मधील वाटा व वृद्धीदर २०११-१२ व २०१२-१३**

| सेवा | २०११-१२ | | २०१२-१३ | |
|---|---|---|---|---|
| | वाटा | वृद्धीदर | वाटा | वृद्धीदर |
| व्यापार, हॉटेल व रेस्टॉरंट | १८% | ६.२% | २५.१% | ५.२% |
| वाहतुक, साठवण व दळणवळण | ७.१% | ८.४% | -- | -- |
| वित्तसेवा, विमा, रिअल इस्टेट व व्यवसाय सेवा | १६.६% | ११.७% | १७.२% | ८.६% |
| सामाजिक व वैयक्तिक सेवा | १४% | ६% | १४.३% | ६.८% |
| एकूण सेवा क्षेत्र | ५५.७% | ८.२% | ५६.५% | ६.६% |
| बांधकाम क्षेत्र | ८.२% | ५.६% | ८.२% | ५.९% |
| एकूण सेवा क्षेत्र (बांधकामक्षेत्रासह) | ६३.९% | ७.९% | ६४.८% | ६.५% |

- स्त्रोत : भारतातील आर्थिक पाहणी, २०१२-१३

सारणीवरून असे स्पष्ट होते की, सेवांपैकी सर्वाधिक वाटा व्यापार, हॉटेल व रेस्टॉरंट सेवांचा (२०११-१२ मध्ये १८.२ टक्के व २०१२-१३ मध्ये २५.१ टक्के) आहे. २०११-१२ जीडीपी वृद्धीदर ६.२ टक्के असतांना सेवाक्षेत्राचा वृद्धीदर ८.२ टक्के होता. २०१२-१३ मध्ये जीडीपी वृद्धीदर पाच टक्क्यांच्या जवळपास असतांना सेवाक्षेत्राचा वृद्धीदर ६.६ टक्के होता. बँकिंग, वीमा, रिअल इस्टेट व व्यवसाय सेवांचा वार्षिक वृद्धीदर जास्त आहे.

भारतात आंतरराष्ट्रीय व्यापार व परकीय गुंतवणूक आकर्षित करण्यात या क्षेत्राचे योगदान महत्वपूर्ण आहे. आंतरराष्ट्रीय सेवा व्यापारात भारताच्या सेवा व्यापाराचा वाटा १९९० मध्ये ०.६ टक्के होता. तो २००० या वर्षात एक टक्का आणि त्यानंतर २०११ मध्ये ३.३ टक्के वाढलेला आहे. भारतात २०००-०१ ते २०१०-११ या काळात सेवांची निर्यात २३.४ टक्कयांनी वाढली आहे, तर २०११-१२ मध्ये सर्वाधिक ३४.२ टक्के सेवा व्यवसायात आयात झालेली आहे.

२००९-१० या वर्षातील आकडेवारीनुसार ग्रामीण भागातील एक हजार रोजगार प्राप्त लोकांचा विचार करता ६७९ व्यक्ती कृषी क्षेत्रात, २४१ व्यक्ती सेवा क्षेत्रात तर ८० व्यक्ती उद्योग क्षेत्रात काम करीत आहेत. त्याच प्रमाणे शहरी भागातील एक हजार रोजगार प्राप्त व्यक्तींपैकी पंच्याहत्तर व्यक्ती कृषी क्षेत्रात, सहाशे त्र्याऐंशी व्यक्ती सेवा क्षेत्रात तर दोनशे बेचाळीस व्यक्ती उद्योग क्षेत्रात काम करीत आहेत. भारतात क्षेत्रनिहाय रोजगारीच्या प्रमाणाचा विचार केल्यास २००९ या वर्षामध्ये ५३.२ टक्के कृषी क्षेत्रात, २१.५ टक्के उद्योग क्षेत्रात तर २५.३ टक्के सेवाक्षेत्रात आहेत. तर २०११ या वर्षात ५३ टक्के लोक कृषी क्षेत्रात, २१ टक्के उद्योग क्षेत्रात तर पंचवीस टक्के लोक सेवाक्षेत्रात आहेत.

भारतीय अर्थव्यवस्थेत विकासात सातत्य टीकवून ठेवायचे असेल तर या तिन्ही क्षेत्रांच्या विकासाच्या गतीत सातत्य ठेवणे आवश्यक आहे. त्यासाठी अनेक स्तरांवर प्रयत्न करावे लागतील. भारतीय अर्थव्यवस्थेला नव्याने गती प्रदान करणारा आणखी एक महत्वपूर्ण क्षेत्र म्हणजे माहिती तंत्रज्ञान क्षेत्र होय. या क्षेत्राच्या आधारे देशात कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राच्या विकासाला गती प्रदान करता येऊ शकते. अर्थव्यवस्थेत भूमी, श्रम, भांडवल आणि संयोजक याबरोबरच उत्पादनाचा महत्वाचा पाचवा घटक म्हणजे माहिती तंत्रज्ञान हा होय. भारतातील सर्वप्रकारचे व्यवसाय आज या क्षेत्रासोबत जोडल्या गेलेले आहे. भारताच्या जीडीपी मध्ये या क्षेत्राचे योगदान १९९४-९५ या वर्षात ०.६३ टक्के होते, २०११-ल१२ या वर्षात त्यामध्ये वाढ होऊन ते ६.८ टक्के झाले. २०१२-१३ ते प्रमाण ८ टक्के झाले.


**समारोप:**

भारतासारख्या विकसनशील देशात अर्थव्यवस्थेत संरचनात्मक बदल घडत असतांना अर्थव्यवस्थेचाही विकास होत आहे. भारतीय अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र, उद्योग क्षेत्र व सेवा क्षेत्रांचे अत्यंत महत्व असून हे तिन्ही क्षेत्र एकमेकांच्या विकासाकरिता परस्परपूरक मदत करीत आहेत. 'सेबर वर्ल्ड इकॉनॉमिक लीग' या इंग्लंडमधील संस्थेने त्यांच्या २०१३ मधील लीग टेबलमध्ये भारत आर्थिक स्थितीत सध्या अकराव्या स्थानावर असून 'प्रादेशिक स्थिती आणि आर्थिक विकास यामुळे भारताचे स्थान उंचावत जाईल आणि २०१८ या वर्षी भारत जगात तिसऱ्या क्रमांकाची आर्थिक महासत्ता होईल,' असे भाकीत केले आहे.

**संदर्भसूची :**

१. देसले डॉ. किरण, स्पर्धा परीक्षा-१, दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव, २०१३
२. देसले डॉ. किरण, स्पर्धा परीक्षा-१, दीपस्तंभ प्रकाशन, जळगाव, २०१३
३. देसाई डॉ. व भालेराव डॉ., भारतीय अर्थव्यवस्था, निराली प्रकाशन, पुणे, २०१३
४. दत्त व महाजन, दत्त एवं सुन्दरम भारतीय अर्थव्यवस्था, एस, चांद एण्ड कंपनी प्रा. लि., नई दिल्ली, बावनवा संस्करण २०१४
५. भारत २०१३, प्रकाशन विभाग सूचना और प्रसारण मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली, २०१३
६. भारतीय अर्थव्यवस्था, प्रतियोगीता दर्पण, आगरा, २०१२
७. मिश्र व पुरी, भारतीय अर्थव्यवस्था, हिमालया पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २००७
८. Economy Survey of India 2012-13
९. NAASCOM. IT Industry India
१०. www.indiabudget.nic in

*(**नितीन चौधरी** सीताबाई कला महाविद्यालय, अकोला येथे सहाय्यक प्राध्यापक संपर्कासाठी ई-मेल : ndchaudhari1981@gmail.com)*



# उच्च कार्यक्षमतेचा सुटसुटीत स्टोव्ह

– व्ही. जयप्रकाश

केरळमधील त्रेचाळीस वर्षीय व्ही. जयप्रकाश या संशोधकाने एक सुटसुटीत पण कामचलाऊ स्टोव्ह केला. या स्टोव्हमध्ये न जळलेले जैविक द्रव्य व हाइड्रोकार्बन यांच्या पुनर्ज्वलनासाठी आणखी एक कक्ष असल्यामुळे चुलीची औष्णिक क्षमता वाढून प्रदूषणही कमी होते.

बेताची आर्थिक परिस्थिती असलेल्या कुटुंबात जन्मलेल्या व्ही. जयप्रकाश यांना लहान वयात अनेक आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागले. ते सांगतात, दोन वेळेच्या जेवणाचीही भ्रांत असायची म्हणूनच की काय शाळेत जाण्याचे मुख्य कारण, दुपारच्या जेवणाची भ्रांत मिटावी हेच होते. असे असले तरीही त्यांना मुळात शिक्षणाची आवड होती. ते एक चांगले विद्यार्थी होते. विज्ञान व संशोधनात त्यांना विशेष रस होता. शालेय पातळीवर होणाऱ्या विज्ञान प्रदर्शनात ते शाळेतर्फे नियमितपणे सहभागी होत असत. त्यांनी पूर्वी केलेल्या काही प्रयोगात कप्पीच्या सहाय्याने वजन विशिष्ट उंचीवर उचलता येणे, तसेच खेळातली छोटीशी मोटरबोटने काही अंतरापर्यंत जाऊन स्वतःच परत येणे अशा प्रयोगांचा समावेश आहे.

शालांत परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना पुढच्या शिक्षणासाठी विज्ञान शाखेत प्रवेश मिळाला नाही. तसेच जास्त फी असल्यामुळे विमानविद्या पदविका अभ्यासक्रमातही त्यांना प्रवेश घेता आला नाही. बारावीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर कोईमतूरला वडिलांच्या कामाच्या ठिकाणी जाऊन ते रोजंदारीवर कामगार म्हणून रुजू झाले. या कामामुळे पैसे कमावून आपले शिक्षण चालू ठेवता येईल असे त्यांना वाटत होते. परंतु एका दुर्दैवी घटनेत त्यांनी त्यांची सगळी प्रमाणपत्रे गमावली आणि त्यांच्या शिक्षणाच्या उरल्यासुरल्या आशाही संपुष्टात आल्या. त्यानंतर वर्षभराने म्हणजे १९८९ या वर्षी आपल्या मूळ गावी परतून तिथे त्यांनी फळांचा छोटा व्यवसाय सुरू केला.

### चिकन आणि स्टोव्ह यांचा संबंध

आपल्या नव्या व्यवसायाचा जम बसवत असताना त्यांनी केरळ शास्त्र साहित्य परिषदबद्दल (केएसएसपी- विज्ञान, साहित्य आणि माहिती यांसंबंधीचे स्थानिक मंडळ) आणि त्यांनी लोकप्रिय केलेली अत्यल्प किंमतीतील धूरविरहित चूल या दोन्हीबद्दल ऐकले. यामुळे कुतूहलापोटी त्यांनी धूररहित चूल करणाऱ्या अनर्टशी (अपारंपरिक ऊर्जा व ग्रामीण तंत्रज्ञान यांची एजन्सी - अपारंपरिक उर्जेसंदर्भात काम करत असलेली केरळ शासनाची संघटना) संपर्क केला. चूल तयार करण्याच्या व्यवसायाविषयी आवश्यक माहिती मिळवून हा व्यवसाय सुरू करण्याचे त्यांनी ठरवले. या व्यवसायाची सुरूवात करतांना जयप्रकाश यांना एका एका इस्पितळासाठी सामुदायिक चूल तयार करून दिली. या चुलीचे परिक्षण करत असतांना अवघ्या १० मिनिटांच्या वापरानंतर त्यांना धुराड्याजवळ अचानक ज्वाला दिसू लागल्या. यामुळे आश्चर्य वाटून त्यांनी ताबडतोब अनर्टच्या तज्ज्ञांना कळवले. त्याबद्दल तज्ज्ञांनी असे सांगितले की, अपूर्ण दहन झालेले कार्बन

कण धुराड्याच्या शिरोभागी असलेल्या ऑक्सीजनच्या संपर्कात येऊन त्यांनी पेट घेतल्यामुळे ज्वाला निर्माण होतात. या माहितीच्या आधारे जयप्रकाश यांनी जेथे दोन पातळ्यांवर ज्वलन होऊ शकेल अशा प्रकारच्या चुलीचे प्रतिमान करण्याचा विचार सुरू केला. या संशोधनात्मक प्रयोग करतांना त्यांनी नंतरचे कित्येक महिने अनेक चुली तयार केल्या व तोडल्या, मोडल्या व पुन्हा तयार केल्या. याशिवाय हवेच्या हालचालींचे निरीक्षण करण्यासाठी निरनिराळ्या प्रकारचे स्टोव्ह तयार केले. जयप्रकाश यांची चिकाटी व नेटाने केलेले प्रयास अखेर कामी आले व त्यांच्या प्रयत्नांना यश आले. त्यांनी दोन पातळ्यांवर लाकडांचे धूररहित संपूर्ण दहन केले. नंतर पल्या प्रयोगाचे प्रात्यक्षिक त्यांनी केरळ शास्त्र साहित्य परिषदेने आयोजित केलेल्या कार्यशाळेला सादर केले. परिषदेने त्यांच्या स्टोव्हची चाचणी केली तेव्हा, ती ३० टक्क्यांहून अधिक कार्यक्षम असल्याचे दिसून आले. याउलट इतर धूररहित चूली २० टक्क्यांपेक्षाही कमी कार्यक्षम असतात, असे स्पष्ट झाले. नंतर आपल्या यंत्रणेत अधिक आणखी सुधारणा करून त्यांनी त्याची विक्री करण्यास सुरुवात केली.

## चूल

जयप्रकाश यांनी कल्पकतेने तयार केलेली चूल दोन कक्षाची असून कार्यक्षम व सुटसुटीत आहे. ही चूल सुरुवातीला सामुदायिक स्वयंपाकासाठी वापरली जात होती. त्यात नारळाच्या करवंट्या किंवा लाकूड यांचा इंधन म्हणून वापर करता येतो.

ही चूल विटा, सिमेंट, माती, बीड यांपासून निर्माण केलेली असून त्यात १०० किलोपर्यंत अन्न शिजवण्याची क्षमता आहे. चुलीचा सगळ्यात खालचा कक्ष लोखंडी जाळीचा असून त्यावर इंधन ठेवण्याची व्यवस्था आहे, त्याखाली हवेसाठी कक्ष आहे. इंधन जळल्यानंतरचा धूर, न जळलेल्या हायड्रोकार्बनबरोबर एकत्र होऊन वरच्या कक्षात जातो. तिथे हवेसाठी बारीक छिद्रे केलेली आहेत. या कक्षात संपूर्ण दहन घडते, व दुसऱ्या कक्षात असणाऱ्या स्वयंपाकाच्या भांड्याला उपलब्ध असलेली पूर्ण उष्णता मिळते. इंधन कक्ष समोरच्या बाजूने इंधन भरवण्यासाठी खुला ठेवण्यात आला असून त्याचे नियमन करण्याकरता शटर पुरविण्यात आले आहे. ह्या शटरने हवेचा प्रवाहही नियंत्रित करता येतो, जी हवा दहनाच्या वेळी खुल्या कक्षातून वाहते. यामुळे कार्बन कणांचे पुनर्दहन होते, त्यातील न जळालेले कण, जादा हवेच्या सहाय्याने जळून जातात.

या कार्यतत्परतेशिवाय कमी किंमत व हस्तवाह्यता (हाताने वाहून नेण्याजोगे असणे) ही या चुलीची आणखी काही महत्त्वाची वैशिष्ट्ये आहेत. लाकडाचा इंधन म्हणून वापर करते वेळी त्याची दहन क्षमता ३७.६७ टक्के व नारळाच्या करवंट्यांचा वापर करताना २९.४८ टक्के इतकी असते. इंटिग्रेटेड रूरल टेक्नॉलॉजी सेंटर, मंधूर, पलक्कड येथील चाचणी निकालानुसार व आयआयटी गुवाहाटीमध्येही झालेल्या चाचणीनुसार चुलीची औष्णिक क्षमता २९.२८ टक्के इतकी नोंदवली गेली. अनर्टने दिलेल्या माहितीनुसार, कालिकतमधील एका हॉटेलात, जेथे या चुलीचा वापर केला जातो. तिथे ३० रुपये दराने मिळणाऱ्या ७५ नारळाच्या करवंट्यांच्या सहाय्याने ४० किलो तांदूळ शिजवला जातो. याच्या अगदी विरुद्ध एलपीजी गॅसमध्ये तितकाच तांदूळ शिजवण्यासाठी १०किलो इंधनाची गरज असते, ज्याची किंमत ४०० रुपये इतकी होते. कार्यक्षमता, किंमत, हस्तवाह्यता या तीनही गोष्टींचा विचार करता ही एक दुर्मिळ रचना असून यासाठी या रचनेकरता जयप्रकाश यांना नॅशनल इनोवेशन फाउंडेशन (एनआयएफ) या संस्थेने (१५८२ सीएचई २०११) सुटसुटीत लाकडी स्टोव्हचे पेटंट मिळवून दिले व मायक्रो व्हेंचर इनोव्हेशन फंडमधून या स्टोव्हचा व्यापार करण्यासाठी निधीही पुरवला. जयप्रकाश यांनी गेल्या दोन वर्षांत शंभराहून अधिक स्टोव्हची विक्री केली असून महाविद्यालये, इस्पितळे व पालिकांमधून त्यांना अजूनही मागण्या येत आहेत. आज त्यांच्याकडे ५०० च्या आसपास स्टोव्हच्या मागण्या प्रलंबित आहेत. व्यवसायवृध्दीसाठी स्वतंत्र निर्मिती शाखेची व या तंत्रज्ञानासाठी जयप्रकाश यांना परवानाधारक इच्छुक व्यावसायिकांची आवश्यकता आहे. जेणेकरून विक्रीचे काम त्यांच्यावर सोपवून ते स्वत: संशोधन व विकासात लक्ष घालू शकतील. वापरकर्त्यांच्या सूचनांना त्यांच्या लेखी अत्यंत महत्त्व आहे कारण ते त्यांना मौल्यवान सल्ला देतात असा त्यांना विश्वास वाटतो. त्यांनी माहिती दिली की, अनेक महिला ग्राहकांनी त्यांना स्टोव्ह वापरून

मोलाची अंतर्दृष्टी दिली आहे. एकीने त्यांना दोन बर्नरचा स्टोव्ह करण्यास सुचवले आहे.

हस्तवाह्य लाकडी चुलीशिवाय ते धूररहित व सामुदायिक चुलीदेखील तयार करतात. त्यासाठी लागणारी प्रमाणपत्रे व अनुज्ञप्ती अनर्टकडून दिली जाते. त्यांनी आतापर्यंत चार हजाराहून अधिक धूररहित चुली व सातशेच्या आसपास सामुदायिक चुली विकल्या आहेत.


या व्यवसायाव्यतिरिक्त जयप्रकाश अनेक सामाजिक सम्मेलनांना भेटी देऊन तिथे आपले अनुभव कथन करतात. २००९ साली त्यांनी तिरुअनंतपुरम इथे भरलेल्या केरळ राज्य विज्ञान तंत्रज्ञान व पर्यावरण परिषदेत बायोमास स्टोव्हचा विकास व मूल्यांकन या विषयावर प्रात्यक्षिक करून दाखवले. ऊर्जा संवर्धन व व्यवस्थापनासाठी त्यांना केरळ सरकारचा ऊर्जा संवर्धन पुरस्कार २००८ मिळाला आहे. एनआयएफने त्यांना राष्ट्रपती भवनात मार्च २०११ या वर्षी भरलेल्या संशोधन प्रदर्शनात बोलावले होते. तो आपल्या आयुष्यातील सर्वात अविस्मरणीय दिवस असल्याचे जयप्रकाश सांगतात. २०१२ या वर्षी एनआयएफने नवी दिल्लीतील राष्ट्रपती भवनात आयोजित केलेल्या सहाव्या राष्ट्रीय पुरस्कार सोहळामध्ये जयप्रकाश यांना राष्ट्रीय पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला.

**– भाषांतर : रूची आडकर**

## प्रकाशन विभागाची नवी पुस्तके

| | | |
|---|---|---|
| १. | **स्वामी विवेकानंद (हिंदी)** | ₹ १८०/- |
| २. | **उपेंद्रनाथ अशक (हिंदी)** | ₹ १६०/- |
| ३. | AESTHATICIANS | ₹ ९०/- |
| ४. | WHO IS WHO OF INDIAN MARTYRS (I, II, III) | ₹ ८५०/-(D) |

## CONDOLENCES



Yojana condoles the demise of its founding Editor Khushwant Singh. An author of repute, illustrious editor and a popular columnist, he is considered a doyen of Indian journalism. 'Yojana, like the plans themselves will endeavour to embrace the entire field of development, economic, educational, social and cultural'. Writing in the inaugural issue of Yojana in January 1957, he had set the tone of the magazine. His words of wisdom still inspire us

# तुम्हाला हे माहीत आहे का ?
# प्रभावी अंमलबजावणीसाठी नियोजन आयोगाचा नवा प्रकल्प
# इंडिया बॅकबोन इम्प्लीमेंटेशन नेटवर्क (आय.बी.आय.एन.)

बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये काही धोरणे आणि योजना यांच्या अंमलबजावणीत सुधारणा होण्याची नितांत आवश्यकता आहे, असे आढळून आले. ही सुधारणा घडवून आणण्यासाठी १९ एप्रिल, २०१३ रोजी नियोजन आयोगातर्फे 'भारतीय आधारभूत अंमलबजावणी यंत्रणा' (India Backbone Implementation Network) प्रकल्पाची सुरुवात झाली. सर्वसमावेशक विकासाला जलद गतीने चालना देणे, हे या प्रकल्पाचे अंतिम उद्दिष्ट आहे. जिल्हा, राज्य आणि केंद्र पातळीवर बऱ्याच प्रकल्प आणि योजनांच्या अंमलबजावणीत अनेक त्रूटी आहेत, त्या कशा प्रकारे दूर करता येतील यावर विचार होऊन, आय.बी.आय.एन. कल्पनेचा जन्म झाला. आरोग्य, शिक्षण आणि इतर सार्वजनिक सेवांचा दर्जा निकृष्ट राहण्याला संस्थांमधील समन्वयाचा अभाव, अंमलबजावणीतील ढिसाळपणा आणि सदोष वितरण पध्दती कारणीभूत आहेत, असा ठपका ठेवण्यात आला. या सर्व दोषांमधून बाहेर पडण्यासाठी गोंधळाचे समन्वयात, वादविवादाचे सर्वांचा सहभाग वाढण्यात आणि योजनांच्या उद्दिष्टांचे प्रत्यक्ष अंमलबजावणीत रुपांतर होण्याची गरज व्यक्त करण्यात आली.

आय.बी.आय.एन.ची कल्पना जपानमध्ये अतिशय यशस्वी ठरलेल्या 'संपूर्ण गुणवत्ता चळवळ' (Total Quality Movement) यावर आधारित आहे. १९६० आणि ७०च्या दशकात, जपानमध्ये या चळवळीमुळे खाजगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील संस्थांच्या क्षमतांमध्ये मोठे परिवर्तन घडून आले. विद्यापीठ आणि उत्पादक यांच्या सहभागातून तांत्रिक कौशल्ये आणि पद्धतींमध्ये मोठया सुधारणा घडून आल्या. गुणवत्ता आणि कार्यक्षमतेवर भर दिला गेल्याने सर्व पातळ्यांवरील वितरण पद्धतीमध्ये जपानचे एक आगळेवेगळे स्थान निर्माण झाले. भारतातील आय.बी.आय.एन.पद्धतीमध्ये सहभाग, समन्वय आणि अंमलबजावणी याचा वापर करण्यात आला आहे. या चळवळीचे परिणाम दिसून येण्यासाठी काही कालावधी जाण्याची शक्यता आहे, तरीही हा एक धाडसी आणि अत्यंत आवश्यक असा उपक्रम आहे.

जपानमधील गुणवत्तेवर आधारित या चळवळीने कामाच्या प्रक्रियेमध्ये जलद गतीने सुधारणा घडून येण्यासाठी संस्थेअंतर्गत आणि संस्थांतील परस्पर सहकार्य वाढावे म्हणून तेथील चमूंना तंत्र कौशल्यांचे प्रशिक्षण आणि साधने पुरवली. भारतातील नियोजन आयोगाने याप्रकारची यंत्रणा आपल्या देशात प्रभावीपणे राबवण्यासाठी जपानबरोबरच कोरिया, ब्राझील, मलेशिया आणि जर्मनी या देशांमधील समन्वय आणि अंमलबजावणी यंत्रणांमधील चांगल्या उपक्रमांचाही अभ्यास केला गेला.

बाराव्या पंचवार्षिक योजनेमध्ये नियोजन, संवाद आणि अंमलबजावणीसाठी अनेक अभिनव उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. भारतीय प्रशासकीय कर्मचारी महाविद्यालय (ॲडमिनिस्ट्रेटिव्ह स्टाफ कॉलेज ऑफ इंडिया), भारतीय व्यवसाय विद्यालय (द इंडियन स्कूल ऑफ बिझनेस), संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (यू.एन.डी.पी.), जागतिक बँक (वर्ल्ड बँक) आदी संस्थांच्या सहभाग, समन्वय आणि नियोजनातून निर्माण करण्यात आलेल्या माहिती जालातून (नेटवर्क) काही महत्त्वाच्या क्षेत्रातील राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ही चळवळ तंत्र आणि कौशल्यांचा प्रसार करणार आहे.

भारतामध्ये प्रचंड सुप्त क्षमता आहेत. मात्र, त्यांचा विकास होण्यामध्ये अनेक अडथळे निर्माण होत आहेत. व्यवस्थांमध्ये रुजलेल्या अनेक अडचणींमुळे अंमलबजावणीत अपयश येत आहे. म्हणूनच या प्रक्रियेत आणि व्यवस्थेत काम करणाऱ्यांनी आपली दूरदृष्टी आणि भूमिकेची स्पष्टता राखणे महत्वाचे आहे. त्याचबरोबर आपल्या विचारांची देवाण-घेवाण करणे गरजेचे आहे. जपानमधील 'संपूर्ण गुणवत्ता चळवळीच्या' धर्तीवर आपल्याकडील या आय.बी.आय.एन. चळवळीचा मुख्य उद्देश नेटवर्कच्या माध्यमातून शिकण्याची प्रक्रिया वाढीस लागून क्षमतांचा विकास व्हावा आणि त्यामुळे कर्मचाऱ्यांचा सहभाग वाढून प्रभावी अंमलबजावणी होऊन ही एक व्यापक चळवळ व्हावी, असा आहे. योजनांचा लाभ सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांच्याशी संवाद साधण्याची समाज विज्ञानाची तंत्र कौशल्ये आणि गुणवत्तापूर्ण साधने यांचा मेळ या 'भारतीय आधारभूत अंमलबजावणी यंत्रणे' च्या नेटवर्कमधून साधला जावा, हीच अपेक्षा आहे.

**– रोहीणी पेठे**

**FORM IV**

**Statement about ownership and other particulars about Yojana (Marathi)**
*to be published in the first issue every year after the last day of February*

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | Place of publication | : | Mumbai |
| 2. | Periodicity of its Publication | : | Monthly |
| 3. | Printer's name | : | IRA JOSHI |
| | Nationality | : | Indian |
| | Address | : | Soochna Bhavan<br>Publications Division<br>New Delhi – 110003 |
| 4. | Publisher's name | : | IRA JOSHI |
| | Nationality | | Indian |
| | Address | | Soochna Bhavan<br>Publications Division<br>New Delhi - 110003 |
| 5. | Name of the Editor | : | Abhishek Kumar (Officiating/ In-charge) |
| | Nationality | | Indian |
| | Address | | Yojana (Marathi)<br>701- B Wing, 7th Floor<br>Kendriya Sadan, CBD Belapur<br>Navi Mumbai – 400614 |
| 6. | Names and addresses of Individuals who own the newspapers and partners or shareholders holding more than one per cent of the total Capital. | : | Ministry of Information & Broadcasting<br>Govt. of India<br>New Delhi 110 001 |

I, Ira Joshi, hereby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

21/2/14

( Ira Joshi )
Additional Director General (I/c)

**Dated:____________ 2014**

IRA JOSHI
Addl. Director General (I/c)
Publications Division
M/o Information & Broadcasting
Soochna Bhawan, CGO Complex,
Lodhi Road, New Delhi-03

**Yojana Marathi** (Monthly) **April 2014**
**RNI No. MAHMAR/2009/32156**
Reg No. G/NMD/137/2013-15
Published Date : 12th April, 2014
Date of Posting : 16th April, 2014


# शिवतेज बुक डेपो आयोजित स्पर्धापरीक्षा पुस्तकांचे कायमस्वरुपी प्रदर्शन व सवलतीच्या दरात विक्री

MPSC, UPSC, स्टाफ सिलेक्शन, सेट-नेट, शिक्षणाधिकारी, कृषिधिकारी, व्यक्तिमत्व विकास, चालू घडामोडी, पोलीस भरती, जनरल नॉलेज, प्र.दर्पण हिंदी/इंग्रजी, योजना मराठी/हिंदी/इंग्रजी, कुरुक्षेत्र हिंदी/इंग्रजी, लोकराज्य, बँकिंग सर्व्हिस, सर्वप्रकारची मासिके, मुलाखतीसाठी आवश्यक अशा अनेक स्पर्धापरीक्षांकरिता लागणारी हजारो पुस्तके तसेच निवडक कथा व कादंबऱ्या होलसेल दरात मिळणारे एकमेव ठिकाण

## वाचनालय, अभ्यासिका, सहकारी संस्था यांच्यासाठी प्रदर्शनस्थळी विशेष सवलत




**Bulletin of UNIQUE academy**
**UPSC MPSC**
अभ्यासाठी अपरिहार्य मासिकाचे अधिकृत विक्रेते




**शिवतेज बुक डेपो**
स्पर्धा परीक्षा पुस्तकांचे माहेरघर

**शिवतेज बुक डिस्ट्रीब्यूटर्स**
स्पर्धा परीक्षा पुस्तके व मासिके होलसेल मिळण्याचे ठिकाण

२६ बुधवार पेठ, आप्पा बळवंत चौक, पुणे २ संपर्क : **9850602149**

**भांडेकरी न्यूजपेपर एजन्सी**
एस. टी. बुकस्टॉल, स्वारगेट, पुणे
संपर्क : **8600723093**

* न्युजपेपर, साप्ताहिके मासिके यावर सवलत नाही, क्षमस्व


Chief Editior **Rajeshkumar Jha**
Printed and Published by **IRA JOSHI,** Additional Director General (I/C), on behalf of Publication Division and Printed at **Onlooker Press**, 16, Sasoon Dock, Mumbai - 400 005. Phone : 22183544/2939
Published at - B-701, Kendriya Sadan, C.B.D. Belapur, Navi Mumbai - 400 614.